











Government of Telangana

**Department of Women Development & Child Welfare - Childline Foundation**

When abused in or out of school.

To save the children from dangers and problems.

CHILD LINE 1098 NIGHT & DAY

24 HOUR NATIONAL HELPLINE

When the children are denied school and compelled to work.

When the family members or relatives misbehave.

**1098 (Ten...Nine...Eight) dial to free service facility.**

प्रकाशन
तेलंगाना सरकार, हैद्राबाद

तेलंगाना सरकार व्दारे मोफत वितरण

गणित इयत्ता 6 वी

FREE

# गणित

## इयत्ता 6 वी

**MATHEMATICS** Class VI
(Marathi Medium)












प्रकाशन
तेलंगाना सरकार, हैद्राबाद

तेलंगाना सरकार व्दारे मोफत वितरण

SCERT TELANGANA

# अपेक्षित शैक्षणिक क्षमता

## गणित वर्ग ६ वा

**विद्यार्थी श्रवण (प्रशिक्षण)**

* इंडो - अरबिक, आंतरराष्ट्रीय पध्दतीने मोठ्या संख्याना वाचने आणि त्याची तुलना करणे.
* दैनंदिन जिवनामध्ये ल.सा.वी. आणि म.सा.वी. चा वापर करणे.
* पुर्ण संख्याचे गुणधर्म स्पष्ट करणे. शुन्यचे महत्व देखील स्पष्ट करणे.
* पुर्णांकाची बेरीज आणि वजाबाकीच्या समस्याचे निराकरण करणे.
* वास्तविक जिवनातील घटनांमध्ये गुणोत्तर आणि प्रमाणात वापरुन समस्याचे निराकरण करतो.
* अपुर्णांक आणि दशांश यांची बेरीज आणि वजाबाकीचा वापर रोजच्या जिवनातील समस्यांचे निराकरण करतो.
* रोजच्या जिवनात दिलेल्या परिस्थितीमध्ये स्वरुपात संबंध व्यक्त करते.
* बिंदु, रेषाखंड, सरळ रेषा, किरण आणि वक्र या सारख्या भौमितीक कल्पनांची समज व्यक्त करते.
* साध्या बंद केलेल्या आकृत्यांना ओळखणे, गणिताच्या नोट्समधील आकृतीचे कोन, शिर्षक आणि बाजु व्यक्त करणे.
* वर्तुळ आणि त्याचे भाग ओळखतो( केंद्र, व्यास, त्रिज्या, आर्क आणि सेक्टर ) स्पष्ट करतो.
* दिलेल्या पालीगोनची परिमीती आणि आयताचे क्षेत्रफळ काढणे हे एक विशिष्टता आहे.
* दैनंदिन जिवनातील निगडीत घटनांशी संबंधीत विविध प्रकाराची माहिती गोळा करुन सारणीच्या रुपात, स्तंभालेखाच्या रुपात आणि अन्य मार्गाने स्पष्ट करतो.
* ३ डी आकृत्या जसे गोलाकार, घन, इष्टीकाचिती, सिलेंडर, शंकु चा वापर करुन दैनंदिन जिवनात गणिताच्या मुलभुत पध्दतीत वापरणे.
* संख्यामध्ये सममिते रेषेचा वापर करुन सममिती प्रात्यक्षिक रेषा काढणे.
* जेथे शक्य असेल तेथे समिती रेषेवर आकडेवारी रेखांकीत करतो.

## Literacy Rate in India: Census 2011

| State/UT Code | India/State/UT | Literate Persons (%) | Males (%) | Females (%) |
|---|---|---|---|---|
| 01 | Jammu & Kashmir | 68.74 | 78.26 | 58.01 |
| 02 | Himachal Pradesh | 83.78 | 90.83 | 76.60 |
| 03 | Punjab | 76.68 | 81.48 | 71.34 |
| 04 | Chandigarh | 86.43 | 90.54 | 81.38 |
| 05 | Uttarakhand | 79.63 | 88.33 | 70.70 |
| 06 | Haryana | 76.64 | 85.38 | 66.77 |
| 07 | NCT of Delhi | 86.34 | 91.03 | 80.93 |
| 08 | Rajasthan | 67.06 | 80.51 | 52.66 |
| 09 | Uttar Pradesh | 69.72 | 79.24 | 59.26 |
| 10 | Bihar | 63.82 | 73.39 | 53.33 |
| 11 | Sikkim | 82.20 | 87.29 | 76.43 |
| 12 | Arunachal Pradesh | 66.95 | 73.69 | 59.57 |
| 13 | Nagaland | 80.11 | 83.29 | 76.69 |
| 14 | Manipur | 79.85 | 86.49 | 73.17 |
| 15 | Mizoram | 91.58 | 93.72 | 89.40 |
| 16 | Tripura | 87.75 | 92.18 | 83.15 |
| 17 | Meghalaya | 75.48 | 77.17 | 73.78 |
| 18 | Assam | 73.18 | 78.81 | 67.27 |
| 19 | West Bengal | 77.08 | 82.67 | 71.16 |
| 20 | Jharkhand | 67.63 | 78.45 | 56.21 |
| 21 | Orissa | 73.45 | 82.40 | 64.36 |
| 22 | Chattisgarh | 71.04 | 81.45 | 60.59 |
| 23 | Madhya Pradesh | 70.63 | 80.53 | 60.02 |
| 24 | Gujarat | 79.31 | 87.23 | 70.73 |
| 25 | Daman & Diu | 87.07 | 91.48 | 79.59 |
| 26 | Dadra & Nagar Haveli | 77.65 | 86.46 | 65.93 |
| 27 | Maharashtra | 82.91 | 89.82 | 75.48 |
| 28 | Andhra Pradesh | 67.66 | 75.56 | 59.74 |
| 29 | Karnataka | 75.60 | 82.85 | 68.13 |
| 30 | Goa | 87.40 | 92.81 | 81.84 |
| 31 | Lakshadweep | 92.28 | 96.11 | 88.25 |
| 32 | Kerala | 93.91 | 96.02 | 91.98 |
| 33 | Tamil Nadu | 80.33 | 86.81 | 73.86 |
| 34 | Pondicherry | 86.55 | 92.12 | 81.22 |
| 35 | Andaman & Nicobar Islands | 86.27 | 90.11 | 81.84 |
| | **INDIA** | 74.04 | 82.14 | 65.46 |

SCERT TELANGANA

# गणित
## इयत्ता 6 वी

# Mathematics
## Class-VI (Marathi Medium)

### पाठ्यपुस्तक विकास आणि प्रकाशन मंडळ

| | | |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | : | श्रीमती.बी.सेशु कुमारी<br>संचालक., एस.सी.ई.आर.टी.,हैद्राबाद |
| कार्यकारी मुख्य संघटक | : | श्री.बी.सुधाकर<br>संचालक शासकिय पाठ्यपुस्तक मुद्रणालय, हैद्राबाद |
| प्रभारी संघटक | : | डॉ.एन.उपेद्र रेड्डी<br>प्रोफेसर, Curriculum & Text Book Department,<br>एस.सी.ई.आर.टी.,हैद्राबाद,आंध्र प्रदेश |
| सहायक प्रभारी संघटक | : | श्री.के.यादगीरी<br>प्राध्यापक, एस.सी.ई.आर.टी.,हैद्राबाद |



तेलंगाना सरकार द्वारे प्रकाशीत,
हैद्राबाद.

कायद्याचा मान राखा
हक्क हस्तगत करा.

शिक्षणाने मोठे व्हा
वर्तणुक नम्र ठेवा

SCERT TELANGANA

© Government of Telangana, Hyderabad.

*First Published 2013*
*New Impressions 2014, 2015, 2016, 2017, 2018, 2019,2020*

All rights reserved.

No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system, or transmitted, in any form or by any means without the prior permission in writing of the publisher, nor be otherwise circulated in any form of binding or cover other than that in which it is published and without a similar condition including this condition being imposed on the subsequent purchaser.

The copy right holder of this book is the Director of School Education, Hyderabad, Telangana.
We have used some photographs which are under creative common licence. They are acknowledged at later (page vii).

This Book has been printed on 70 G.S.M. Maplitho,
Title Page 200 G.S.M. White Art Card

**तेलंगाना शासनाव्दारे मोफत वितरण 2020-21**

*Printed in India*
at the Telangana Govt. Text Book Press,
Mint Compound, Hyderabad,
Telangana.

# पाठ्यपुस्तक विकास सदस्य मंडळ

**Writers**

Sri. Dr. P. Ramesh, Lecturer, Govt. IASE, Nellore
Sri. M. Ramanjaneyulu, Lecturer, DIET, Vikarabad, Ranga Reddy
Sri. T.V. Rama Kumar, HM, ZPHS, Mulumudi, Nellore
Sri. P. Ashok, HM, ZPHS, Kumari, Adilabad
Sri. P. Anthoni Reddy, HM, St. Peter's High School, R.N.Peta, Nellore
Sri. S. Prasada Babu. , PGT, APTWR School, Chandrashekarapuram, Nellore
Sri. K. Rajender Reddy, SA, UPS Thimmapur, Chandampet, Nalgonda
Sri. G.V.B.Suryanarayana Raju, SA, Municipal High School, Kaspa, Vizianagaram
Sri. S. Narasimha Murthy, SA, ZPHS, Mudivarthipalem, Nellore
Sri. P. Suresh Kumar, SA, GHS, Vijayanagar Colony, Hyderabad
Sri. K.V. Sunder Reddy, SA, ZPHS, Thakkasila, Alampur Mdl., Mababoobnagar
Sri. G. Venkateshwarlu, SA, ZPHS, Vemulakota, Prakasham
Sri. Ch. Ramesh, SA, UPS, Nagaram (M), Guntur.
Sri. P.D.L. Ganapathi Sharma, SA, GHS, Jamisthanpur, Manikeshwar Nagar, Hyderabad

**Co-ordinators**

Sri. K.K.V. Rayalu, Lecturer, Govt., IASE, Masabtank, Hyderabad.
Sri. K. Rajender Reddy, SA, UPS Thimmapur, Chandampet, Nalgonda

**Editors**

Sri. K. Bramaiah, Professor, SCERT, A.P., Hyderabad
Sri. P. Adinarayana, Retd., Lecturer, New Science College, Ameerpet, Hyderabad

**Chairperson for Position Paper and Mathematics Curriculum and Textbook Development**

Professor V. Kannan, Dept. of Mathematics and Statistics, University of Hyderabad

Chief Advisor

Dr. H. K. Diwan , Education Advisor, Vidya Bhavan Society, Udaipur, Rajasthan.

**Acadamic Support Group Members**

Smt. Namrita Batra, Vidyabhavan Society Resource Centre, Udaipur, Rajasthan
Sri. Inder Mohan, Vidyabhavan Society Resource Centre, Udaipur, Rajasthan
Sri. Yashwanth Kumar Dave, Vidyabhavan Society Resource Centre, Udaipur, Rajasthan
Smt. Padma Priya Sherali, Community Mathematics Centre, Rishi Vally School, Chttoor
Kumari. M. Archana, Dept. of Mathematics & Statistics, University of Hyderabad
Sri. Sharan Gopal, Dept. of Mathematics & Statistics, University of Hyderabad
Sri. P. Chiranjevi, Dept. of Mathematics & Statistics, University of Hyderabad

**Illustration & Design Team**

Sri. Prashanth Soni, Artist, Vidyabhavan Society Resource Centre, Udaipur, Rajasthan
Sri. S.M. Ikram, Operator, Vidyabhavan Society Resource Centre, Udaipur, Rajasthan
Sri. R. Madhusudhana Rao, Computer Operator, SCERT, A.P., Hyderabad.

**मराठी अनुवादासाठी:**

**समन्वयकर्ता** : बी.आर.जगदीश्वर गौड, M.Sc., M.Ed, Principal Govt.DIET.आदीलाबाद
**सहाय्यक समन्वयकर्ता:** बी.राजेश्वर, M.A., M.Ed Lecturer, Govt.DIET.आदीलाबाद.

**मराठी अनुवादक :**

श्री.नागेश चनमनवार, एस.ए.,जिल्हा परिषद हाय स्कुल, इंद्रवेल्ली आदीलाबाद जिल्हा
श्री.प्रशांत भोयर, एस.ए., गव्हर्नमेंट गझीटेड हाय स्कुल नंबर-1 आदिलाबाद
श्री.सुभाष मुसळे, मंडळ परिषद अप्पर प्रायमरी स्कुल,मुतनुर, आदीलाबाद जिल्हा

**मराठी डी.टी.पी :**

**राजेश दानका,** आदित्या प्रिटर्स, आदिलाबाद

SCERT TELANGANA

# प्रस्तावना

स्टेट करीकुलम फ्रेमवर्क (SCF-2011) शिफारशीनुसार शाळेतील विद्याथ्यांचे जीवन शाळाबाह्य जीवनाशी निगडीत असावे. दी राईट टु एज्युकेशन ऍक्ट (RTE-2009) नुसार शाळेतील सर्व 14 वर्षापर्यंतचे सर्व विद्यार्थी निर्देशीत सर्व कौशल्यांना संपादन केले पाहीजेत.सर्व वर्गातील सर्व विषयासाठी विशिष्ट शालेय प्रमाण ठरवुन दिले गेले आहेत.सर्व वर्गाचे अभ्यासक्रम व पुस्तके नेशनल करीकुलम स्टेट करीकुलम फ्रेमवर्क (PSCF-2011) च्या निर्देशांना पालन करीत हे पुस्तक तयार करण्यात आले आहे.

प्राथमिक शिक्षण संपल्यावर निद्यार्थी उच्च प्राथमिक शिक्षणात प्रवेश घेतात.शिक्षणाचा प्राथमिक स्तर हा शालेय शिक्षण सुरु ठेवण्यासाठी दुवा म्हणुन कार्य करतो. विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य आणि वेळ दिल्यास नवी ज्ञान निर्मिती करतात.असे करत असतांना वयसंकांनी शिकलेल्या गोष्टींचा उपयोग होतो.जर विद्यार्थी शिक्षण ग्रहण करण्यात सक्रिय भाग घेत असेल तरच त्यात सृजनात्मकता कौशल्य निर्माण होते.आवड, आतुरता, प्रश्न विचारणे, कारणे सांगणे, प्रत्येक गोष्टीस पुरावा मांगणे, आव्हान स्विकारणे, इत्यादी.गुण या टप्प्यात विद्यार्थ्यात असतात.म्हणुन गणित शिकवण्याने विद्यार्थी प्रश्न सोडविण्याचे नवे मार्ग हसत खेळत शोधुन काढतात.

आम्ही कार्यक्रम तयारीची सुरुवात केली आहे जेनेकरुन विद्यार्थी गणिताच्या कल्पीत गुणाची ओळख होते, जसे - संख्या प्रणाली, बीजगणित, भूमिती, महत्वमापण,आणी आकडे शास्त्र, या विषयाचा अभ्यास केल्यामुळे निर्देशित कौशल्य अवगत होतात.जसे- प्रश्न सोडवीणे, तार्कीक विचार, गणितीय भाव प्रकट करणे, दतांशाला वेगवेगळया रुपात दर्शविणे, गणिताचा दैनंदीन जीवनात उपयोग करणे.

ह्या पुस्तकात विद्यार्थ्यांना खोल विचार करता येईल, आश्चर्य प्रकट करता येईल, लहान समुहात चर्चा करता येईल, या सर्व गोष्टींना चालना मिळेल अशी काळजी घेण्यात आली आहे. **हे करा, प्रयत्न करा, प्रकल्प कार्य,** द्वारे वरील गोष्टी साध्य करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या सर्व गोष्टींसाठी शिक्षकांचे सहाकार्य आवश्यक आहे, या व्यतीरिक्त आम्ही उदाहरणे, स्वतःहून प्रश्न तयार करणे, वैगेच्या सुद्धा समावेश केला आहे.

या पुस्तकात विद्यार्थ्यांचे मन शिकण्यात सतर्क राहील याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच विद्यार्थी अनावश्यक संकीर्ण शब्दांत, अंकात न अडकता गणितीय कल्पनांचा, रचनांचा वापर करेल. याचा प्रयत्न करण्यात आला आहे. धड्यांच्या विशिष्ट क्रमात रचना केल्याने शिक्षकांना विद्याथ्यांचे सर्व क्षेत्राचे मुल्यमापण, आकलन, प्रगती या सर्व गोष्टीचे निरंतर बहुव्याप्ती (समग्र) मुल्यमापण *(Comprehensive Evalution)* करणे सोपे झाले आहे.

ह्या पुस्तकाच्या तयारीत खुप अनुभवी शिक्षकांचा समावेष आहे. तसेच वर्षानुवर्षापासुन अभ्यासक्रमाची रचना करीत आलेल्या शिक्षकांचा, गणितांच्या संशोधकांचा समावेष आहे. या सर्वांना या पुस्तकाद्वारे विद्यार्थ्यातील गणित विषयाबद्दलची भिती काढण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

हे पुस्तक तयार करण्यासाठी मदत केलेल्या राष्ट्रीय तज्ञांना, संशोधकांना, NGO's ना, अभ्यासकांना, लेखकांना, ग्राफिक डिझायरांना आणि मुद्रक यांना मनपुर्वक धन्यवाद!

अशा पाठ्यपुस्तक तयार करण्याची प्रक्रिया निरंतर चालु आहे, सर्वोतोपरी उत्कृष्ट कार्य करण्याचा प्रयत्न करण्यासाठी SCERT, चा एक संघ जवाबदार आहे. हा संघ पद्धतशीर सुधारणा आणि गुणवत्ता उत्पादनाची प्रगती करण्याचा प्रयत्न करतो.म्हणुन हा संघ या पुस्तकाबद्दल सुचनांचे, तृटीचे स्वागत करते.

*B. Seshu kumari*
**डायरेक्टर**
SCERT, हैद्राबाद

दिनांक: 28-1-2012
स्थान: हैद्राबाद

SCERT TELANGANA

# गणित

## इयत्ता 6 वी


| क्र.सं | विषयानुक्रमणिका | अभ्यासक्रम संपवयाचा कालावधी | पृष्ठ संख्या |
|---|---|---|---|
| 1. | आपल्या संख्यांची ओळख | जुन | 1 - 14 |
| 2. | पुर्ण संख्या | जुलै | 15 - 27 |
| 3. | संख्यांशी खेळ | जुलै | 28 - 47 |
| 4. | भूमीतीय मूलभूत संकल्पना | ऑगस्ट | 48 - 59 |
| 5. | रेषा आणि कोनाचे मापन | ऑगस्ट | 60 - 71 |
| 6. | पुर्णांक | सेप्टेंबर | 72 - 83 |
| 7. | अपुर्णांक आणि दशांश | सेप्टेंबर/ऑक्टोंबर | 84 - 105 |
| 8. | माहीती हाताळणे | ऑक्टोंबर | 106 - 117 |
| 9. | बिजगणिताचा परिचय | नोव्हेंबर | 118 - 129 |
| 10. | परिमीती आणि क्षेत्रफळ | नोव्हेंबर/डिसेंबर | 130 - 143 |
| 11. | गुणोत्तर आणि प्रमाण | डिसेंबर | 144 - 156 |
| 12. | सम्मीती - सममिती | जानेवारी | 157 - 166 |
| 13. | प्रत्यक्ष भूमीती | फेब्रुवारी | 167 - 176 |
| 14. | 3D आणि 2D आकारास समजणे | फेब्रुवारी | 177 - 184 |
| 15. | उजळणी | फेब्रुवारी/मार्च | 177 - 184 |


SCERT TELANGANA

# आपले राष्ट्रगीत

*- रवींद्रनाथ टागोर*

जन-गण-मन अधिनायक जय हे
भारत भाग्य विधाता,
पंजाब, सिंधू, गुजरात, मराठा
द्राविड, उत्कल, वंगा,
विंद्य हिमाचल, यमुना गंगा
उच्छल जलधी तरंग
तव शुभ नामे जागे
तव शुभ आशीष मागे
गाहे तव जय गाथा,
जन गण मंगल-दायक जय हे,
भारत भाग्य विधाता,
जय हे , जय हे ,जय हे
जय जय जय जय हे.

# प्रतिज्ञा

**- पैडिमर्री व्यंकटा सुब्बाराव्**

"भारत माझा देश आहे,सारे भारतिय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे,आणि माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे.त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणुन मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा,गुरूजनांचा आणि वडिलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देश बांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे.

त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यातच माझे सौख्य सामावले आहे."

SCERT TELANGANA

# आपल्या संख्यांची ओळख



## 1.1 प्रस्तावना

लता आणि उमाने 6 व्या वर्गात प्रवेश केला. शाळेच्या पहिल्या दिवशी त्यांच्या गणिताच्या शिक्षकाने,नुकतेच पार पाडलेल्या जनगणनेनुसार भारताची,राज्यांची आणि जिल्ह्यांची लोकसंख्या यावर चर्चा केली. उमाला त्यातले आकडे समजले नाहीत.जेंव्हा उमा घरी परत आली तेंव्हा ती लोकसंख्येच्या बाबतीत लता ला विचारली.



उमा : आपल्या गावाची लोकसंख्या तुला माहीत आहे का ?

लता : होय, मला माहीत आहे.

उमा : तुला कसे माहीत आहे ?

लता : मी ते पंचायत कार्यालयाच्या भींतीवर पाहीले होते.

उमा : त्या भींतीवर कोण-कोणती माहीती लिहुन आहे.

लता : त्या भींतीवर आपल्या गावाची सर्व माहीती लिहुन आहे.मुख्यत: आपल्या गावाची लोकसंख्या,स्त्री-पुरुष, आणि मुलांची संख्या, पक्कया-कच्च्या घरांची संख्या, इत्यादी.

उमा : त्या जागेवर आता आपण जाऊ या का ?

लता : ठीक आहे ,जाऊ या.

लता आणी उमा दोघेही पंचायत कार्यालयात पोहोचले आणि तिथे भिंतीवर लिहिलेल्या माहितीचे निरीक्षण करु लागले.

| | | |
|---|---|---|
| ग्रामपंचायतचे नाव | : | गुम्मडीदला |
| जिल्हा | : | संगारेड्डी |
| पुरुष लोकसंख्या | : | 8,032 |
| स्त्रियांची लोकसंख्या | : | 4,065 |
| मुलांची संख्या | : | 3,867 |
| एकुण घरे | : | 967 |
| पक्के घर | : | 2,017 |
| कच्चे घर | : | 55 |

भींतीवर लिहिलेली माहिती उमाने वाचली व त्यातील आकडे समजुन घेतले. तीने लताला लक्ष आणि कोटी बाबत विचारले. कारण शिक्षकांनी वर्गात लोकसंख्या लक्ष आणि कोटीबद्दल सांगीतले होते का ? तुमच्या मित्रासोबत चर्चा करा.

SCERT TELANGANA

आधीच्या वर्गात आपण हजार पर्यंत संख्या शिकलो होतो. आपण संख्यांना ब-याच प्रकारे वापरु शकतो, त्यांची तुलना करतो. त्यांना चढत्या आणि उतरत्या क्रमात मांडतो, बेरीज आणि वजाबाकी करतो. असे पाच संदर्भ सांगु शकाल जिथे आपण संख्यांना हजारामध्ये उपयोग करतो ?
उदाहरणार्थ : एका दुरदर्शनाची किंमत 12,500.

तर आता आपण पुर्वीच्या वर्गात शिकलेल्या संख्यांची उजळणी करु आणि मोठ्यातल्या मोठ्या संख्येंचा आनंद घेऊ

## 1.2 संख्याची तुलना करणे आणि अंदाज लावणे.

चला खालील संख्यांपैकी लहान, मोठी संख्या शोधू या.

| क्र.सं. | संख्या | मोठी संख्या | लहान संख्या |
|---|---|---|---|
| 1. | 3845, 485, 34, 13845 | 13845 | 34 |
| 2. | 856, 1459, 35851, 23 | ..... | ..... |
| 3. | 585, 9535, 678, 44 | ..... | ..... |
| 4. | 39, 748, 19651, 7850 | ..... | ..... |

पाच अंकी संख्या ही दोन अकी संख्या पेक्षा मोठी असते.अशाप्रकारे संख्यातील अंक मोजुन आपण लहान, मोठी संख्या सहजपणे सांगु शकतो.
आता तुमच्या मित्राला 51845 आणि 41964 यामध्ये तुलना करायला सांगा. व तसेच कोणती संख्या मोठी आहे ते विचारा?

हे सांगणे सुद्धा सोपे आहे कारण 51845 मध्ये दहा हजार स्थानी 5 आहे, आणि 41964 मध्ये 4 आहे.

आता 58672 आणि 57875 मध्ये कोणती संख्या मोठी आहे हे सांगण्याचा प्रयत्न करा.इथे 5 हा अंक दोन्ही संख्यांमध्ये दहा हजार स्थानी आहे. म्हणुन त्या नंतरच्या स्थानीच्या अंकाची तुलना करावी. हजार स्थानावरचा अंक 8 आहे. $8 > 7$ म्हणुन 57875 हे मोठे आहे.

हजार स्थानावरचा अंकसुद्धा समान असेल तर काय करायचे? शतकाकडे वळायचे नंतर दशक,एकक स्थानाकडे वळुन तुलना करायची.



### अभ्यास - 1.1

1. खालील संख्या समुहामध्ये कोणती संख्या मोठी व लहान आहे ते ओळखा :
   i. 15432, 15892, 15370, 15524 ii. 25073, 25289, 25800, 25623
   iii. 44687, 44645, 44670, 44602 iv. 75671, 75635, 75641, 75610
   v. 34895, 34891, 34899, 34893
2. खालील संख्यांना चढत्या क्रमात लिहा:
   i. 375, 1475, 15951, 4713 ii. 9347, 19035, 22570, 12300
3. खालील संख्यांना उतरत्या क्रमात लिहा:
   i. 1876, 89715, 45321, 89254 ii. 3000, 8700, 3900, 18500
4. खालील रिकाम्या जागेत ($<$ किंवा $>$) हे अचुक चिन्ह लिहा:
   i. 3854 ....... 15200 ii. 4895 ....... 4864
   iii. 99454 ....... 99445 iv. 14500 ....... 14499

SCERT TELANGANA

5. खालील संख्यांना अक्षरात लिहा:

i. 72642 = ....................................................................................................
ii. 55345 = ....................................................................................................
iii. 66600 = ....................................................................................................
iv. 30301 = ....................................................................................................

6. खालील संख्यांना अंकात लिहा:

i. चाळीस हजार दोनशे सत्तर ..................................
ii. चौदा हजार चौंसष्ट ..................................
iii. नऊ हजार सातशे ..................................
iv. साठ हजार ..................................

7. 4, 0, 3, 7 या अंकांचा वापर करुन जेवढ्या संख्या लिहता येतील तेवढ्या लिहा व त्यापैकी मोठी आणि लहान संख्या शोधून काढा?

8. i. चार अंकी सर्वात लहान संख्या?
ii. चार अंकी सर्वात मोठी संख्या?
iii. पाच अंकी सर्वात लहान संख्या?
iv. पाच अंकी सर्वात मोठी संख्या?

## 1.3 अंदाज आणि सलग्न संपुर्ण संख्येत बदलने (ROUND OFF) करणे

आपल्याला दररोजच्या व्यवहारात बरेचसे असे संदर्भ पहायला भेटतात जसे-

• नोव्हेंबर महीन्यात सालारजंग संग्रहलयात 25,000 लोकांनी (जवळ-जवळ) भेट दिली.
• आपल्या राज्यात 9 लक्ष विद्यार्थ्यांनी (अंदाजे) या वर्षी बोर्डाची S.S.C.परीक्षा दिली.
• वैजागपोर्टवर 43,500 टन (स्तुल मानाने) लोखंड जहाजावर चढविण्यात येते.

जवळ-जवळ 'अंदाजे', 'स्तुल मानाने' असे शब्द निश्चीत संख्या दर्शवित नाही.पण 25,000 म्हटले तर ते 24,975 तर किंवा 25,045 च्या आसपास राहते.म्हणजेच हे थोडे जास्त किंवा कमी असते पण निश्चीत नसते.उत्तराचा पडताळा करण्यासाठी अंदाज करणे सोप मार्ग आहे. आपण सर्व साधारणपणे संख्यांना जवळच्या 10',100', 1000',10000' इत्यादीमध्ये संपुर्ण करुन लिहतो.दशक, शतक हजार, दहा हजार
खालील संख्यांना पहा आणि संख्यांना जवळच्या **दशकांमध्ये** संपुर्ण करा.

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **80** | (81) | 82 | 83 | 84 | (85) | 86 | (87) | 88 | 89 | **90** |

81 ही संख्या 90 व 80 च्याजवळ आहे. म्हणुन 80 ला संपुर्ण संख्येत बदलतो. 87 ही संख्या 80 पेक्षा 90 च्या जवळ आहे.म्हणुन 87 ला संपुर्ण संख्येत बदलने म्हणजे 90 होय. 85 हे 80 आणि 90 पासुन समान अंतरावर आहे.पद्धतीनुसार 90 घेतो,जवळच्या शतकामध्ये संपुर्ण संख्येत बदलला.

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **200** | 210 | (220) | 230 | 240 | 250 | 260 | 270 | (280) | 290 | **300** |

220 हे 300 पेक्षा 200 च्या जवळ आहे म्हणुन 220 ला 200 म्हणुन संपुर्ण संख्येत बदलला,तसेच 280 हे 200 पेक्षा 300 च्या जवळ आहे, म्हणुन 300 संपुर्ण संख्येत बदल करता येते.

250 ते 300 मधील संख्यांचे सलग्न संपुर्ण संख्या कोणती आहे ? का ?

SCERT TELANGANA

**हे करा**



सांगीतल्या प्रमाणे सलग्न संपुर्ण संख्या लिहा. (Round off the numbers) :

1. 48, 62, 81, 94, 27 च्या जवळचे दशक
2. 128, 275, 312, 695, 199 च्या जवळचे शतक.
3. 7452, 8115, 3066, 7119, 9600 च्या जवळचे हजार.

**विचार करा,चर्चा करा आणि लिहा.**



दहा हजार स्थान किंमत असलेल्या संख्यांना संपुर्ण संख्येत बदलण्यासाठी मित्रात चर्चा करा.

## 1.4 स्थान किंमतीची उजळणी

स्थान किंमतीचा वापर करुन दोन अंकी,तीन अंकी,चार अंकी आणि पाच अंकी संख्येचे विस्तृत रुप कसे लिहावे हे तुम्ही आधीच शिकलेले आहात त्याची पुन्हा एकदा उजळणी करु या.

**1.** 64 चे विस्तृत स्वरुप

| दहम | एकम |
|---|---|
| 6 | 4 |

= $(6 \times 10) + (4 \times 1)$

= $60 + 4$

**2.** 325 चे विस्तृत स्वरुप

| शतम | दहम | एकम |
|---|---|---|
| 3 | 2 | 5 |

= $(3 \times 100) + (2 \times 10) + (5 \times 1)$

= $300 + 20 + 5$

**3.** 5078 चे विस्तृत स्वरुप

| हजार | शतम | दहम | एकम |
|---|---|---|---|
| 5 | 0 | 7 | 8 |

= $(5 \times 1000) + (0 \times 100) + (7 \times 10) + (8 \times 1) = 5000 + 0 + 70 + 8$

= $5000 + 70 + 8$

**4.** 29500 चे विस्तृत स्वरुप

| दहा हजार | हजार | शतम | दहम | एकम |
|---|---|---|---|---|
| 2 | 9 | 5 | 0 | 0 |

= $(2 \times 10000) + (9 \times 1000) + (5 \times 100) + (0 \times 10) + (0 \times 1)$

= $20000 + 9000 + 500 + 0 + 0$

= $20000 + 9000 + 500$

SCERT TELANGANA

## हे करा



आता उदाहरणार्थ दिलेल्या संख्यांना विस्तृत स्वरुपात लिहा.

| संख्या | विस्तार | विस्तृत स्वरुप |
|---|---|---|
| 21504 | $(2\times10000)+(1\times1000)+(5\times100)+(0\times10)+(4\times1)$ | $20{,}000+1{,}000+500+4$ |
| 38400 | | |
| 77888 | | |
| 20050 | | |
| 41501 | | |

## अभ्यास - 1.2

1. जवळच्या संपुर्ण संख्येत लिहा (दशकात) (Round off) :
   i. 89 ii. 415 iii. 3951 iv. 4409
2. जवळच्या संपुर्ण संख्येत लिहा (शंभरात) (Round off):
   i. 695 ii. 36152 iii. 13648 iv. 93618
3. जवळच्या संपुर्ण संख्येत लिहा (हजारात) (Round off):
   i. 3415 ii. 70124 iii. 8765 iv. 4001
4. संक्षिप्त रुपात लिहा:
   i. 3000 + 400 + 7 ii. 10000 + 2000 + 300 + 50 + 1
   iii. 30000 + 500 + 20 + 5 iv. 90000 + 9000 + 900 + 90 + 9
5. संक्षिप्त रुपात लिहा:
   i. 4348 ii. 30214 iii. 22222 iv. 75025

## 1.5 मोठ्या संख्यांची ओळख

पाच अंकी सर्वात मोठी संख्या 99,999.होय तर त्यात आपण 1 मिळवु .

99,999 + 1 = 1,00,000

1,00,000 ही संख्या **एक लक्ष** आहे. एक लक्ष हे 99,999 संखेच्यानंतर येणारी संख्या आहे.

आता तुम्ही एक लक्षमध्ये किती दशक आहेत हे सांगु शकाल काय,?

एक लक्षमध्ये किती शतक आहेत?

एक लक्षमध्ये किती हजार आहेत?

आता,3, 15, 645.ही संख्या घेऊन त्याचे विस्तृत स्वरुप बघु :

$3,15,645 = (3\times100000)+(1\times10000)+(5\times1000)+(6\times100)+(4\times10)+(5\times1)$

$= 300000+10000+5000+600+40+5$

SCERT TELANGANA

**खालील निरीक्षण करा,**

| 3 | 1 | 5 | 6 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|---|
| लक्ष | दहा हजार | हजार | शतक | दहम | एकम |

ह्या संख्येमध्ये 5 एकम स्थानावर, 4 दहम स्थानावर, 6 शतम स्थानावर, 5 हजार स्थानावर, 1 दहा हजार स्थानावर आणि 3 लक्ष स्थानावर आहे. आता आपण ह्या संख्येला तीन लक्ष पंधरा हजार सहाशे पंचेचाळीस म्हणुन वाचतो.

दिलेल्या संख्यांना वाचा आणि विस्तृत स्वरुपात लिहा:

| **संख्या** | **वाचणे** | **विस्तृत स्वरुप** |
|---|---|---|
| 5,00,000 | पाच लक्ष | $5 \times 100000$ |
| 4,50,000 | चार लक्ष पन्नास हजार | $4 \times 100000 + 5 \times 10000$ |
| 4,57,000 | ................................... | ................................................. |
| 3,05,400 | ................................... | ................................................. |
| 3,09,390 | ................................... | ................................................. |
| 2,00,035 | ................................... | ................................................. |

अशाच 6 अंकी पाच संख्या लिहा आणि तुमच्या मित्रांना वाचायला व विस्तृत स्वरुपात लिहायला लावा.

जर 6 अंकी संख्यामध्ये सर्व अंक 9 असतील तर तुम्हाला कोणती संख्या मिळेल ?

तुम्ही त्या संख्येला 6 अंकी सर्वात मोठी संख्या म्हणु शकाल काय ? त्याचे कारण काय ?

आता आपण त्या संख्येमध्ये एक मिळवु, आपल्याला काय मिळेल ?

$9,99,999 + 1 = 10,00,000$

10,00,000 याला **दहा लक्ष** ही म्हणतात**.**

ही 7 अंकी सर्वात लहान संख्या आहे काय ?

आता खालीलचे निरीक्षण करुन रिकाम्या जागा पुर्ण करा.

$9 + 1 = 10$

$99 + 1 = 100$

$999 + 1 = 1000$

$9999 + 1 =$ ...................................

$99999 + 1 =$ ...................................

$999999 + 1 =$ ...................................

$9999999 + 1 = 1,00,00,000$

7 अंकी सर्वात मोठ्या संख्येमध्ये एक मिळवा.तुम्हाला 8 अंकी सर्वात लहान संख्या मिळेल त्याला एक कोटी म्हणतात.

ही 7 अंकी सर्वात मोठी संख्या तुम्ही कशी मिळवली ?

आपल्याला वेगवेगळ्या संदर्भात मोठ्या संख्या पाहायला मिळतात.उदा.आपल्या देशाचे क्षेत्रफळ (32, 87, 263) चौरस कि.मी.,आपल्या राज्याची लोकसंख्या (8,46,65,533), शाळेंच्या भवनांची किंमत,

SCERT TELANGANA

शेतीचे उत्पन्न,ग्रहामधील अंतर,3 किंवा 3 पेक्षा जास्त अंकी संख्येचा गुणाकार सुध्दा मोठी संख्या असते.

ह्या मोठ्या संख्या शिकल्या नंतर तुम्हाला काय वाटते.उमाला तिच्या वर्गात शिक्षकाने शिकविलेले तिला समजु शकेल का ?

**हे प्रयत्न करा**

1. दररोजच्या व्यवहारात येणारे असे पाच उदाहरण द्या जेथे 6-अंका पेक्षा जास्त संख्येचा वापर होतो.
2. दोन अंकी,तीन अंकी,चार अंकी,पाच अंकी,सहा अंकी,सात अंकी आणि आठ अंकी सर्वात लहान व सर्वात मोठी संख्या लिहा.



## 1.5.1 मोठ्या संख्येची स्थान किंमत

खालील संख्या वाचा:

a) 25240 b) 130407 c) 4504155 d) 12200320

हे वाचायला अवघड आहे काय ? कोटी,लक्ष व हजार मध्ये असलेल्या संख्या तुम्हाला वाचायला अवघड वाटत आहेत काय?

25,240 1,30,407 45,04,155 1,22,00,320

त्यापेक्षा हे सोपे वाटते का पहा ?

मोठ्या संख्या लिहण्यासाठी व वाचण्यासाठी 'स्वल्प विराम' चा वापर करावा.

मोठ्या संख्येचा विस्तार लिहतांना काही महत्वाच्या सुचना आहेत. उदा.राधा संख्यांचा विस्तार करीत आहे,ती 367 या संख्येचे एकक स्थान,दहम स्थान आणि शतम स्थानाला O, T आणि H मध्ये लिहले. जे खाली दर्शविले आहे.

| H | T | O |
|---|---|---|
| 3 | 6 | 7 |

विस्तार

$3 \times 100 + 6 \times 10 + 7 \times 1$

तसेच 1,729 साठी

| Th | H | T | O |
|---|---|---|---|
| 1 | 7 | 2 | 9 |

विस्तार

$1 \times 1000 + 7 \times 100 + 2 \times 10 + 9 \times 1$

याच उपायाला लक्ष आणि कोटी संख्यापर्यंत विस्तार करु शकतो. जे खालील तक्तयात दिसत आहे.

| | कोटी | | लक्ष | | हजार | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्थान | दहा कोटी (T. Cr) | कोटी (Cr) | दहा लक्ष (T. La) | लक्ष (La) | दहा हजार (T.Th.) | हजार (Th.) | शतम (H) | दहम (T) | एकम (O) |
| संख्या | 100000000 | 10000000 | 1000000 | 100000 | 10000 | 1000 | 100 | 10 | 1 |
| अंकाची संख्या | 9 | 8 | 7 | 6 | 5 | 4 | 3 | 2 | 1 |

SCERT TELANGANA

1 कोटी = 100 लक्ष

= 10,000 हजार

1 लक्ष = 100 हजार

= 1000 शतक

आता आपण खाली दिलेल्या स्थान किंमतीचा चार्ट वापरुन मोठ्या संख्या लिहू आणि वाचू या.`

| संख्या | T.Cr. | Cr. | T.La | La | T.Th. | Th. | H | T | O | वाचण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 41430495 | - | 4 | 1 | 4 | 3 | 0 | 4 | 9 | 5 | चार कोटी चौदा लक्ष तीस हजार चारशे पंचान्नव |
| 304512031 | | | | | | | | | | |
| 241800240 | | | | | | | | | | |
| 69697100 | | | | | | | | | | |
| 100091409 | | | | | | | | | | |

अजुन अशाच पाच मोठ्य याचा विचार करा आणि त्या लिहा,खाली दिल्याप्रमाणे तुम्ही त्या संख्यांना विस्तृत स्वरुपात लिहु शकता काय प्रयत्न करा?

12735045 चे विस्तार रुप असे असते.

1,27,35,045 $= 1 \times 10000000 + 2 \times 1000000 + 7 \times 100000 + 3 \times 10000 + 5 \times 1000 + 0 \times 100 + 4 \times 10 + 5 \times 1$

## हे करा

स्वल्प विरामाचा वापर करुन संख्याना विस्तृत स्वरुपात लिहा.

i. 999999999 ii. 34530678

iii. 510010051



आपल्या भारतीय संख्यामान पद्धतीत आपण एकम,दहम,शतम,हजार,लक्ष आणि कोटी चा वापर करतो. हजार,लक्ष आणि कोटीच्या ठिकाणी स्वल्प विरामचा उपयोग करतात. शतम स्थानानंतर पहिला स्वल्प विराम येतो.(म्हणजेच उजव्या बाजुने तीन अंक झाल्यानंतर) म्हणजेच,74517,500 हजार. दुसरा स्वल्पविराम त्या नंतरच्या दोन अंकानंतर येतो,(म्हणजेच उजव्या बाजुने पाच अंक झाल्यानंतर) म्हणजेच,7,45,17,500. हे दहा हजार स्थानानंतर येतो आणि ते लक्षमध्ये मोजले जाते.तीसरा स्वल्पविराम त्या नंतरच्या दोन अंकानंतर येतो,(म्हणजेच उजव्या बाजुने सात अंक झाल्यानंतर) म्हणजेच,7,45,17,500.दहा लक्ष स्थानानंतर येतो आणि ते कोटीमध्ये मोजले जाते.मोठ्या संख्या सोप्या रितीने लिहण्या व वाचण्यासाठी आपल्याला स्वल्प विराम मदत करते.

उदाहरणार्थ,

सात कोटी पंचेचाळीस लक्ष सतरा हजार पाचशे ही संख्या खालील प्रमाणे लिहीतात-

7, 45, 17, 500.

त्याचप्रमाणे,स्वल्प विराम ने वेगवेगळे केलेल्या संख्याला आपण सहज रित्या वाचु शकतो,जसे 45,30,14,252 जसे (पंचेचाळीस कोटी तीस लक्ष चौदा हजार दोनशे बावन्न).

SCERT TELANGANA

## हे करा

ह्या संख्यांना वाचा आणि अक्षरात लिहा.

i) 5,06,45,075     ii) 12,36,99,140     iii) 2,50,00,350



## अभ्यास - 1.2

1. स्वल्प विरामचा वापर स्थान किंमतीच्या नुसार करुन लिहा?

| | | | |
|---|---|---|---|
| i. | 11245670 | ii. | 22402151 |
| iii. | 30608712 | iv. | 190308020 |

2. संख्यांना अक्षरात लिहा

| | | | |
|---|---|---|---|
| i. | 34,025 | ii. | 7,09,115 |
| iii. | 47,60,00,317 | iv. | 6,18,07,000 |

3. संख्यांना अंकात लिहा.

   i. चार लक्ष सत्तावन हजार चारशे.

   ii. साठ लक्ष दोन हजार सातशे पंचहात्तर.

   iii. दोन कोटी पन्नास लक्ष चाळीस हजार तीनशे तीन.

   iv. साठ कोटी साठ लक्ष साठ हजार सहाशे.

4. संख्यांना विस्तृत स्वरुपात लिहा:

| | | | |
|---|---|---|---|
| i. | 6,40,156 | ii. | 63,20,500 |
| iii. | 1,25,30,275 | iv. | 75,80,19,202 |

5. संख्यांना संक्षिप्त स्वरुपात लिहा:

   i. 50,00,000 + 4,00,000 + 20,000 + 8,000 + 500 + 20 + 4

   ii. 6,00,00,000 + 40,00,000 + 3,00,000 + 20,000 + 500 + 1

   iii. 3,00,00,000 + 3,00,000 + 7,000 + 800 + 80 + 1

   iv. 7,00,00,000 + 70,00,000 + 7000 + 70.

6. खालील दोन संख्या पैकी कोणते मोठे आहे ? (>) ह्या चिन्हाचा वापर करुन लिहा:

   i. 4,67,612 किंवा 18,71,964     ii. 14,35,10,300 किंवा 14,25,10,300

7. खालील दोन संख्या पैकी कोणते लहान आहे ? (<) ह्या चिन्हाचा वापर करुन लिहा :

   i. 2,00,015 किंवा 99,999     ii. 13,50,050 किंवा 13,49,785

8. कोटी स्थानी 5,लक्ष स्थानी 2,हजार स्थानी 1, दशक स्थानी 6 आणि एकम स्थानी 3 असलेले कोणतेही दहा संख्या लिहा. उरलेल्या स्थानात कोणताही अंक लिहा.

## 1.6 संख्या वाचनाची अंतरराष्ट्रीय पद्धत

आपल्या देशातील संख्या लेखण-वाचण्याची पद्धत दुसऱ्या बऱ्याचश्या देशापेक्षा वेगळी आहे. आपण लक्ष संखेत 7-अंकीसंख्यानंतर कोटी आणि दहा कोटी इत्यादी. अंतरराष्ट्रीय पद्धतीच्या संख्या वाचनात एकम,दहम,शतम,हजार त्या नंतर मिलीयन्सचा वापर करतात.एक मिलीयन म्हणजे दहा हजार किंवा दहा लक्ष होय. स्वल्प विराम हा हजार आणि मिलीयन मध्ये वापरतात.

SCERT TELANGANA

उजव्या बाजुने प्रत्येक तीन अंकानंतर स्वल्पविराम दिल्या जाते.

समजा 45690255 ह्या संख्याला घेऊ

| भारतीय पद्धतीत संख्या वाचन | अंतरराष्ट्रीय पद्धतीत संख्या वाचन |
|---|---|
| 4,56,90,255 | 45,690,255 |
| चार कोटी छपन्न लक्ष नव्वद हजार दोनशे पंचावन्न. | पंचेचाळीस मिलीयन सहाशे नव्वद हजार दोनशे पंचावन्न. |

शतक स्थानापर्यंत संख्या वाचनामध्ये कोणताही बदल झालेला नाही हे तुमच्या लक्षात आले आहे का ? मग तुम्ही इथे काय निरीक्षण केले ?

चांगले समजण्यासाठी,दोन्ही पद्धती मधील स्थानाची तुलना करु या:

| **भारतीय पद्धत** | शंभर कोटी | दहा कोटी | कोटी | दहा लक्ष | लक्ष | दहा हजार | हजार | शतम | दहम | एकम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अंतरराष्ट्रीय पद्धत** | बिलीयन | शंभर मिलीयन | दहा मिलीयन | मिलीयन | शंभर हजार | दहा हजार | हजार | शतम | दशक | एकम |

वरील तक्तयानुसार,दोन्ही पद्धतीमधील संबंध खालील प्रकारे समजते :

10 लक्ष = 1 मिलीयन

1 कोटी = 10 मिलीयन

10 कोटी = 100 मिलीयन

100 कोटी = 1 बिलीयन



## अभ्यास - 1.4

1. स्वल्प विरामचा उपयोग करुन खालील संख्या अंतरराष्ट्रीय पद्धतीत लिहा.
   i. 97645315 ii. 20048421
   iii. 476356 iv. 9490026834
2. तुमच्या मित्रांचे आणि कुटुंब सदस्यांचे मोबाईल नंबर गोळा करा आणि त्या संख्यामध्ये स्वल्प विरामचा वापर करुन अंतरराष्ट्रीय पद्धतीत संख्यांना वाचा .
3. खालील संख्यांना दोन्हीही भारतीय आणि अंतरराष्ट्रीय पद्धतीत लिहा:
   i. 123115027 ii. 89643092
4. खालील संख्यांना लक्षपुर्वक वाचा आणि त्या खालील प्रश्नाची उत्तरे सांगा:
   302,179,468
   i. मिलीयन स्थानावरचे अंक
   ii. शतक स्थानावरचे अंक
   iii. दहा मिलीयन स्थानावरचे अंक
   iv. संख्यामध्ये किती मिलीयन आहे ?

SCERT TELANGANA

## 1.7 दररोजच्या व्यवहारात वापरण्यात येणाऱ्या मोठ्या संख्या

आपल्याला माहीत आहे लांबीचे एकक म्हणुन मीटर ($m$) चे उपयोग करतो,वजनाचे एकक म्हणुन किलोग्राम ($kg$), द्रव्यमानाचे एकक म्हणुन लिटर ($l$) चे आणि वेळाचे एकक म्हणुन सेकंद ($s$) चा उपयोग करतो.

उदाहरणार्थ- लांबी किंवा अंतराच्या संदर्भात,पेन्सीलची लांबी मोजण्यासाठी, सेंटीमीटरचा उपयोग करतो पण पेन्सील लहान आहे म्हणुन तसेच साडीची लांबी मोजण्यासाठी मीटर व दोन्ही ठिकाणामधील अंतर मोजण्यासाठी किलोमीटरचा ($km$) चा उपयोग करतो,पण कागदाची जाडी मोजण्यासाठी सेंटीमीटरसुद्धा खुप मोठे आहे,म्हणुन आपण त्या संदर्भात मिलीमीटर ($mm$) चा उपयोग करतो.

ज्या अर्थी त्या सर्वामध्ये एक संबंध आहे.तर त्यांचे रुपांतर व सोईस्कर वापर कशा पद्धतीने केले जाते हे आपल्याला माहीत असणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| 10 मिलीमीटर | = | 1 सेंटीमीटर |
| 100 मीटर | = | 1 मीटर |
| 1000 सेंटीमीटर | = | 1 किलोमीटर |

1 किलोमीटरचे मिलीमीटर मध्ये तुम्ही कसे मोजता ?

1 कि. मी = 1000 मीटर

= 1000 × 100 सेटी मीटर

= 1000 × 100 × 10 मिली मीटर

= 10,00,000 मिली मीटर

त्याचप्रकारे तांदुळ किंवा गहु आपण किलोग्राममध्ये विकत घेतो.पण काही वस्तु आपल्याला जास्त प्रमाणात आवश्यकता नसतात. उदा--मसाले,मीरची पावडर,हळदी इत्यादी.तर त्याना आपण ग्राम (g). मध्ये विकत घेतो.

1000 ग्राम. = 1 किलोग्राम

एका किलोग्रामचे मिलीग्राममध्ये तुम्ही कसे मोजता ?

एका बालटीत सर्वसाधारणपणे 20 लिटर पाणी मावते.पण काही वेळेस तुम्हाला मिलीलीटर ($ml$) सारख्या लहान एककाची आवश्यकता असते.डोक्याला लावणाऱ्या तेलाची बॉटल,पेंटींग कलरचे लेबल हे मिलीलीटर ($ml$) मध्ये असते,आणि तेलाचे टॅंकर,हौदामधील पाणी मोजण्यासाठी किलोलीटर ($kl$) वापरतो

1000 लिटर = 1 किलोलीटर

किती मिलीलीटर म्हणजे 1 किलोलीटर ?

### हे प्रयत्न करा



1. तुमच्या जिल्ह्यातील चार महत्वाच्या शहरांची नावे लिहा.त्याच्या मधील अंतर नोंद करा. त्याना संटीमीटर आणि मिलीमीटरमध्ये दाखवा.
2. आपण मिलीग्रामचे वापर कोठे करतो. हे तुम्ही सांगु शकता का ?
3. एका पेटीत प्रत्येकी 20 मिलीग्राम *(mg)* वजनाचे 1,00,000 औषधाच्या वड्या (tablets) तर पेटीमध्ये असलेल्या सर्व वड्या (tablets) चे एकुण वजन ग्राम आणि किलोग्राममध्ये किती ?
4. एका पेट्रोल टॅंकरमध्ये 20,000 लिटर पेट्रोल आहे, तर ते पेट्रोल किलोलीटर आणि मिली लीटरमध्ये दाखवा.

SCERT TELANGANA

दररोजच्या व्यवहारात वापरण्यात येणाऱ्या मोठ्या संख्यांचे काही उदाहरण पाहू.

**उदाहरण-1.** तेदुलकर हा प्रसिद्ध खेळाडु आहे. त्याने आतापर्यतच कसोटी सामन्यात 15,030 धावा केल्या. 18,111 धावा क्रिकेटच्या एकदिवसीय सामन्यात केल्या आहेत. तर त्याने दोन्ही पद्धतीच्या सामन्यात एकुण किती धावा केल्या ?

**सोडवणुक:** तेदुलकरने कसोटी सामन्यात केलेल्या धावा = 15,030

एकदिवसीय सामन्यात केलेल्या धावा = 18,111

एकुण धावा = 33,141

**उदाहरण-2.** एक वर्तमान पत्र दररोज प्रसिद्ध होते. त्यात एकुण 16 पाने आहेत. दररोज त्याच्या 15,020 प्रती छापल्या जातात. तर दररोज एकुण किती पाने छापले जातात ?

**सोडवणुक:** दररोज छापल्या जाणाऱ्या प्रतीची संख्या = 15,020

प्रत्येक प्रतीत 16 पाने असतात

म्हणुन, 15,020 प्रतीमध्ये 15,020 × 16 पाने.

एकुण पानाच्या संख्याचा अंदाज लावण्याचा प्रयत्न करा. हे 2,00,000 पानापेक्षा जास्त असते.

आता मापन करु.

=15,020 × 16 = 2,40,320

म्हणुन दररोज 2,40,320 पाने छापल्या जातात.

**उदाहरण-3.** एका हॉटेलमध्ये 15 लिटर दुध आहे. एक कप चहा बनवायला 25 मिली मीटरची आवश्यकता आहे. तर त्या दुधाने किती कप चहा बनेल ?

**सोडवणुक**: हॉटेलमध्ये असलेले दुध = 15 लिटर

= 15 × 1000

= 15000 मिली मीटर

एक कप चहा बनविण्यासाठी 25*ml* ची आवश्यकता आहे

म्हणुन त्या दुधामध्ये बनलेल्या चहाच्या कपाची संख्या = 15000 ÷ 25

= 600 कप.

## अभ्यास - 1.5

1. नवी दिल्ली येथे चालु असलेल्या कॉमन-वेल्थ खेळ पाहण्यासाठी पहिल्या चार दिवसात भेट दिलेल्या लोकांची संख्या 15,290, 14,181, 14,235 आणि 10,578 आहे. तर चार दिवसात एकुण किती लोकांनी भेट दिली ?
2. लोकसभेच्या निवडुणकीत, निवडुण आलेल्या उमेदवाराला 5,87,500 मत पडले.हरलेल्या उमेदवाराला 3,52,768 मत पडले तर निवडुण आलेला उमेदवार किती मताने जिंकला ?
3. 5, 3, 4, 0 आणि 7 या अंकापासुन तयार झालेली सर्वात मोठी आणि सर्वात लहान संख्या लिहा आणि त्यामधील फरक माहीत करा ?
4. एक सायकल तयार करणारी इंडस्ट्री दररोज 3,125 सायकली बनविते तर जुलै महिण्यात बनविलेल्या एकुण सायकलीची संख्या किती ?
5. एक हेलीकॉप्टर एका तासात 600 कि.मी. प्रवास करते,तर ती 52 तासात एकुण किती अंतर प्रवास करेल?

SCERT TELANGANA

6. सारखे आकार असणा-या 5 बिस्कीट पुड्याचे एकुण वजन 8400 ग्राम. आहे, तर एका पुड्याचे वजन किती ?

7. शाळा आणि बसस्थानकामधील अंतर 1 कि.मी. 875 मी.टर आहे. गायत्री दोन्ही वेळा हा प्रवास चालत करते. तर ती 6 दिवसात एकुण किती किती अंतर चालते ?

8. शाळेच्या गणवेशासाठी एक शर्ट शिवण्यासाठी, एका मुलाला 1 मीटर. 80 सेंटी.मीटर. कापड लागतो तर 40 मीटर कापडामध्ये टेलर किती शर्ट शिऊ शकतो ? आणि किती कापड उरते?

9. पेट्रोलची किंमत प्रती लिटर ₹60 आहे. एक पेट्रोल पंप एकेदिवशी 750 लिटर पेट्रोल विकला असेल तर त्याला किती रुपये मिळाले असेल ?

## विचार करा,चर्चा करा आणि लिहा



1. तुम्ही अहमदाबादला राहत आहात. तुम्ही बसने **400 मीटर** प्रवास करुन जवळच्या रेल्वे स्थानकावर पोहोचलात. तिथुन **15 कि.मी.** दुर असलेल्या गांधीनगरला पोहचण्यासाठी ट्रेन पकडली. त्या नंतर तिथुन **18 कि.मी.** दुर असलेल्या तुमच्या मावशीच्या घरी पोहचण्यासाठी एक क्याब धरली.
   - i. तुम्ही मावशीच्या घरी पोहचण्यासाठी एकुण किती अंतर प्रवास कराल ?
   - ii. हा प्रवास तुम्ही 7 दिवस केला तर एकुण किती अंतर प्रवास कराल ?

2. तुमच्या शाळेतील प्रत्येक मुलगा 2 लिटर पाणी असलेले बॉटल घेऊन येतो. 2 किलोलीटरची क्षमता असलेल्या एका भांड्यात सर्व मुलांनी पाणी ओतले तर असे दिसले की ते भांडे भरायला अजुन 600 लिटर पाण्याची आवश्यकता आहे तर किती मुलांनी आपल्या बॉटलमधील पाणी त्या भांड्यामध्ये ओतले ?

## आपण काय चर्चा केली ?

1. दोन संख्यामध्ये,ज्या संख्यांमध्ये अंक जास्त असेल ती संख्या मोठी असते. जर दिलेल्या दोन्ही संख्यांमध्ये अंकाची संख्या समान असेल तर दोन्दी संख्यामध्ये सर्वात डाव्या बाजुचा अंक ज्या मध्ये मोठा असेल ती संख्या मोठी आहे.

   जर ती सारखी तर नंतरची संख्या पहावे. आणि या पद्धतीने जावे.

2. दिलेल्या चार अंकापासुन संख्या बनविताना, आपण काळजीपुर्वक पाहावे. काही सुचना केल्या आहेत का? जसे-- 7, 8, 3, 5 पासुन सर्वात मोठी संख्या बनवा. पण त्यातल्या अंकाला एकदाच वापरावे. तसेच आपल्याला सर्व अंकाचा वापर करावा लागतो. सर्वात डाव्या बाजुला 8 हा अंक घेतला तर सर्वात मोठी संख्या मिळते.

3. 1000 (एक हजार). हे सर्वात लहान चार अंकी संख्या आहे. हे सर्वात मोठी तीन अंकी संख्या 999. नंतरची संख्या होय. 10,000.दहा हजार आहे आणि हे सर्वात लहान मोठी चार-अंकी 9999. च्या नंतरची संख्या होय,

   पुन्हा सहा-अंकी सर्वात लहान 1,00,000.होय हे एक लक्ष आहे आणि सर्वात मोठी पाच-अंकी 99,999. च्या नंतरचीसंख्या होय ही पध्दत कितीही मोठ्या अंकी संख्यासाठी वापरु शकतो.

4. मोठ्या संख्या लिहण्या वाचण्यासाठी स्वल्प विरामचा वापर करतो.संख्या वाचनाच्या भारतीय पध्दतीत,उजव्या बाजुकडुन सुरुवातीचे 3 अंक झाल्यानंतर स्वल्प विराम देतो. त्यानंतर प्रत्येक 2 अंकानंतर देतो. 3रे ,5वे आणि 7 वे अंकाचे स्वल्पविराम अंकांना अनुक्रमे हजार,लक्ष आणि कोटीमध्ये वेगळे करते. संख्या वाचनाच्या आंतरराष्ट्रीय पध्दतीत,स्वल्पविराम उजव्या बाजुने प्रत्येक तीन अंक झाल्यानंतर देतो. 3 रे आणि 6 वे अंकाचे स्वल्पविराम हजार आणि मिलीयनमध्ये वेगळे करते.

SCERT TELANGANA

5. दैनंदीन व्यवहारात बऱ्याच ठिकाणी मोठ्या संख्यांची आवश्यकता भासते. उदाहरणार्थ-.जिल्ह्यामधील विद्यार्थ्यांची संख्या मोजण्यासाठी, शहरातील किंवा गावातील लोकसंख्या मोजण्यासाठी, मोठ्या व्यवहारात पैशांची देण-घेण (विकणे आणि विकत घेणे), जास्त अंतर मोजणे जसे- देशातील वेगवेगळ्या शहरामधील अंतर तसेच जगातील अंतर

6. आठवण ठेवा. किलो म्हणजे 1000, सेंटी म्हणजे 100 वा भाग आणि मिली म्हणजे 1000 वा भाग. जसे-- 1 किलोमीटर = 1000 मीटर, 1 मीटर = 100 सेंटीमीटढ किंवा 1000 मिलीमीटर इत्यादी.

7. अश्या बरेच संदर्भात आपल्याला निश्चीत संख्यांची आवश्यकता नसते. फक्त एक चांगला अंदाज लावला तरी चालते.. उदा- किती लोकांनी आंतरराष्ट्रीय हॉकीचा सामना पाहिला ? इथे आपण अंदाजे 51,000, अशी संख्या सांगु शकतो.येथे आपल्याला निश्चीत संख्यांची आवश्यकता नसते.

8. अंदाजे सांगीतलेली संख्या निश्चीत संख्येच्या जवळपास असते. जसे- 4,117 ला अंदाजे 4,100 किंवा 4,000, म्हणजेच आपल्या आवश्यकतेनुसार जवळचे शतक किंवा हजार घ्यावे.

9. बऱ्याच संदर्भात संख्यांच्या मापन प्रक्रियेते अंदाज लावतो. हे सलग्र संपुर्ण संख्येत बदलण्यामुळे घडते, यात उत्तर जलद व स्तुलमानाने येते.

10. मुलभूत प्रक्रियांमध्ये उत्तराचा अंदाज लावल्याने याचा उपयोग उत्तर पडताळण्यासाठी होतो.

SCERT TELANGANA

## श्रीनिवास रामानूजन (भारतीय)



1887 - 1920

संख्या शास्त्रामध्ये त्यांनी कार्य केले. रॉयल सोसायटी (इंग्लंड) चे पहीले सदस्य म्हणुन त्यांची निवड झाली होती. 1729 ही रामानूजन यांची संख्या म्हणुन ओळखली जाते. त्यांचा वाढदिवस म्हणुन दरवर्षी 22 डिसेंबरला साजरा केला जातो.




रामानूजच्या स्मृतीपित्यार्थ भारतीय शासनाने 2011 मध्ये पोस्टाचे तिकीट प्रदर्शित केले.

# पुर्ण संख्या

## 2.1 प्रस्तावना

आपल्या पुर्वीच्या वर्गात,आपण वस्तुंची मांडणी कशी करावी ते शिकलो.वस्तुंची मोजणी करण्यासाठी आपल्याला 1, 2, 3, .संख्यांची गरज आहे. ह्या संख्यांना नैसर्गिक संख्या म्हणतात. N = {1, 2, 3, 4, ...}ह्या पद्धतीने आपण नैसर्गिक संख्यांना दाखवितो.

आपण नैसर्गिक संख्या शिकत असतांना असा अनुभव येतो की जर एखाद्या नैसर्गिक संख्यामध्ये '1' मिळविले तर त्या समोरची दुसरी नैसर्गिक संख्या प्राप्त होते. उदा- आपण जर 16 मध्ये 1 मिळविले असता 17 ही नैसर्गिक संख्या येते. अशाप्रकारे एखाद्या नैसर्गिक संख्या मधुन '1' वजा केले तर सर्वसाधारणपणे नैसर्गिक संख्याच मिळते.उदा.जर आपण 25 मधुन '1' वजा केले तर आपल्याला 24 मिळते. जे की नैसर्गिक संख्या होय. जर 1 मधुन '1' वजा केले तरी हे खरे ठरते का ?

9 च्या नंतर येणारी संख्या 10 आहे.

9 च्या अगोदर असणारी संख्या 8.

खाली दिलेल्या काही संख्येच्या नंतरची व अगोदरची संख्या लिहून खालील कोष्टक पूर्ण करा.

| क्र.सं | नैसर्गिक संख्या | अगोदरची संख्या | नंतरची संख्या |
|---|---|---|---|
| 1. | 13 | | |
| 2. | 237 | | |
| 3. | 999 | | |
| 4. | 26 | | |
| 5 | 9 | | |
| 6 | 1 | | |

खालील विषयावर तुमच्या मित्रासोबत चर्चा करा.

1. कोणत्या संख्येला नंतरची संख्या नाही ?
2. कोणत्या संख्येला अगोदरची संख्या नाही ?

## 2.2 पुर्ण संख्या

नैसर्गिक संख्या मध्ये '1' च्या अगोदरची संख्या नसते. नैसर्गिक संख्याच्या समुहामध्ये शुन्य (0) मिळवू . 0 आणि सर्व नैसर्गिक संख्याचा समुह मिळून पुर्ण संख्यांचा समुह बनतो.

पुर्ण संख्या खालील प्रकारे दर्शवितात.

W = {0, 1, 2, 3......}

SCERT TELANGANA

**हे करा**



सर्वात लहान पुर्ण संख्या कोणती असते ?

**विचार करा,चर्चा करा आणि लिहा**



1. सर्व नैसर्गिक संख्या पुर्ण संख्या असतात काय ?
2. सर्व पुर्ण संख्या नैसर्गिक संख्या असतात काय ?

## 2.3 संख्या रेषेवर पुर्ण संख्या दर्शविणे.

एक रेषा काढून त्यावर एक बिंदु घ्या. त्याला '0' हे चिन्ह द्या. '0' च्या उजव्या बाजुला समान अंतरावर तुम्हाला आवश्यक तेवढे बिंदु द्या. त्यांना अनुक्रमे 1, 2, 3, 4, ..... अशी नावे द्या. कोणत्याही लागोपाठ येणाऱ्या बिंदुमधील अंतर हे एकक अंतर होय.उजव्या बाजुला तुम्हाला आवश्यक ती पुर्ण संख्या मिळते.

पुर्ण संख्यांसाठी संख्या खालील प्रकारे रेषा असते :




वरील संख्या रेषवरुन तुम्हाला असे समजते की कोणत्याही संख्या नंतर येणारी संख्या ही त्याच्या उजव्या बाजुला असते. उदा-.3 च्या नंतर येणारी संख्या 4 आहे ,4 ही 3 पेक्षा मोठी आहे.आणि ती 3 च्या उजव्या बाजुला आहे.

आता आपल्याला असे म्हणता येईल की शकतो एखाद्या संख्येच्या उजव्या बाजुला असलेली संख्या त्या संख्येपेक्षा मोठी असते ?

तुमच्या मित्रासोबत चर्चा करा आणि तक्ता भरा.

| क्र.सं. | संख्या | संख्या रेषेमधील स्थान | संख्यामधील संबंध |
|---|---|---|---|
| 1. | 12, 8 | 8 च्या उजव्या 12 आहे. | 12 > 8 |
| 2. | 12, 16 | | |
| 3. | 236, 210 | | |
| 4. | 1182, 9521 | | |
| 5. | 10046, 10960 | | |

**संख्या रेषेवरील बेरीज**

पुर्ण संख्यांची बेरीज संख्या रेषेवर दाखवु शकतो. खालील संख्या रेषेवर 2 आणि 3 ची बेरीज कशी केली आहे. ते पाहू.




आपल्याला 2 मध्ये 3 मिळवायचे आहे.. 2 पासुन सुरुवात करा. वर दाखविल्याप्रमाणे संख्या रेषेच्या उजव्या बाजुला 3 उड्या घेतल्या तर 5 पर्यंत पोहचतो . म्हणुन 2 + 3 = 5

जेंव्हा आपल्याला दोन संख्यांची बेरीज करायची असते, तेंव्हा संख्या रेषेच्या संख्यापासुन उजव्या बाजुला तेवढ्या संख्या एकका पर्यंत जावे.

SCERT TELANGANA

## संख्या रेषेवरील बेरीज




6 पासुन सुरुवात करा.आपल्याला 6 मधुन 2 वजा करायचे आहे.वरील संख्या रेषेवर दाखविल्याप्रमाणे 2 पाऊल डाव्या बाजुला टाका.तर आपल्याला 4 मिळते. म्हणुन 6 - 2 = 4 अशा तऱ्हाने डावीकडे जाणे म्हणजे वजाबाकी होय.

### हे करा



संख्या रेषेवर हे दाखवा:

1. 5 + 3    2. 5 - 3    3. 3 + 5    4. 10 + 1

## संख्या रेषेवर गुणाकार

संख्या रेषेवर पुर्ण संख्याचा गुणाकार कसे करतात.याबाबत आपण विचार करु या . $2 \times 4$ माहीत करु. $2 \times 4$ म्हणजे उजव्या बाजुच्या चार प्रत्येकी दोन पाऊल.




0 पासुन सुरुवात करा,उजव्या बाजुला संख्या रेषेवर एका वेळेस दोन एकक उडी मारा अशाप्रकारे 4 वेळेस उडी मारा आपल्याला 8 मिळते.म्हणुन $2 \times 4 = 8$

### हे प्रयत्न करा



संख्या रेषेचा उपयोग करुन खालील माहीत करा:

1. 5 ही संख्या भेटण्यासाठी 8 मधुन कोणती संख्या वजा करावी लागणार ?
2. 1 ही संख्या भेटण्यासाठी 6 मधुन कोणती संख्या वजा करावी लागणार ?
3. 8 ही संख्या भेटण्यासाठी 6 मध्ये कोणती संख्या मिळवावी लागणार ?
4. 30 ही संख्या भेटण्यासाठी किती 6 पाहीजेत ?

राजु आणि गायत्री दोघांनी मिळुन एक संख्या रेषा लिहून त्यावर एक खेळ खेळले.




राजुने विचारले, "तु जर 3, 5 आणि 8 वर 3 वेळेस उडी मारलीस,तर तु कोठे पोहोंचशील. गायत्री म्हणाली की पहिल्या उडीला ती 3 वर दुसऱ्या उडीला 11 ला पोहचेल ,पुन्हा पाऊल म्हटले तर 16 वर पोहचेन. गायत्रीने सांगीतल्या प्रमाणे ती जिथे पोहोचली ते बरोबर आहे.असे तुम्हाला वाटते काय ?

गायत्रीचे पाऊल रेखाटा.

संख्या रेषेवर बेरीज आणि वजाबाकीची मदत घेवुन,तुमच्या मित्रासोबत तुम्ही हे खेळ खेळा.

SCERT TELANGANA

## अभ्यास - 2.1

1. कोणते विधान सत्य (T) आणि कोणते विधान असत्य (F) आहे ते लिहा. तसेच चुकीचे विधान बरोबर करुन लिहा.
   - i. नैसर्गिक संख्यांच्या अगोदरची संख्या राहत नाही.
   - ii. सर्वात लहान पुर्ण संख्या 0 आहे.
   - iii. सर्व पुर्ण संख्या ह्या नैसर्गिक संख्या असतात.
   - iv. पुर्ण संख्याच्या संख्या रेषावर, संखेच्या उजव्या बाजुची संख्या ही त्या संखे पेक्षा मोठी असते.
   - v. पुर्णसंखेच्या संख्यारेषेवर,एखाद्या संखेच्या डाव्या बाजुची संख्या ही त्या संख्या पेक्षा लहान असते.
   - vi. सर्वात लहान पुर्ण संखेला संख्या रेषेवर दाखवने शक्य नाही.
   - vii. सर्वात मोठी पुर्ण संख्या आपण संख्या रेषेवर पाहु शकतो.
2. 27 आणि 46 मध्ये किती पुर्ण संख्या आहेत ?
3. संख्या रेषेचा उपयोग करुन खालील माहीत करा.
   i. 6 + 7 + 7 ii. 18 - 9 iii. 5 × 3
4. खालील संख्यांच्या जोडीत (संख्यारेषेवर) कोणती पुर्णसंख्या संख्याच्या उजव्या बाजुला आहे.
   i. 895; 239 ii. 1001; 10001 iii. 10015678; 284013
5. संख्या रेषेवर सर्वात लहान पुर्ण संख्येला खुण करा.
6. < किंवा > पैकी अचुक चिन्ह निवडून खालील रिकाम्या जागा भरा..
   i. 8 .......... 7 ii. 5 .......... 2
   iii. 0 .......... 1 iv. 10 .......... 5
7. 5 च्या नंतर येणारी 11 च्या अगोदरची संख्या संख्या रेषेवर दाखवा.

### 2.4 पुर्ण संख्येचे गुणधर्म

संख्यांचा अभ्यास चांगलो करण्यासाठी पुर्ण संख्याच्या गुणधर्माचा अभ्यास करणे आवश्यक आहे. तेव्हा काही गुणधर्म पाहु

कोणत्याही दोन पुर्ण संख्या घेवून त्यांची बेरीज करा.
आलेली बेरिज पुर्ण संख्या आहे का पाहून अजुन काही उदाहरणाचा विचार करुन तपासणी करा.
तुमच्या बेरीजा याप्रमाणे असतील:

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | + | 3 | = | 5 | ही पुर्ण संख्या आहे. |
| 0 | + | 7 | = | 7 | ही पुर्ण संख्या आहे. |
| 20 | + | 51 | = | 71 | ही पुर्ण संख्या आहे. |
| 0 | + | 1 | = | 1 | ही पुर्ण संख्या आहे. |
| 0 | + | 0 | = | 0 | ही पुर्ण संख्या आहे. |

येथे आपल्याला असे निरीक्षणात आले की,कोणत्याही 2 पुर्णसंख्यांची बेरीजसुद्धा नेहमी पुर्णसंख्याच असते.

कोणत्याही दोन पुर्ण संख्याची बेरीज केली असता पुर्णसंख्या न येता दुसरी कोणतीही संख्या येईल,अशी संख्या तुम्ही शोधु शकता का ? आपल्याला असे दिसते की अशा कोणत्याही संख्या नाही,ज्याची बेरीज

SCERT TELANGANA

पुर्णसंख्येच्या व्यतिरिक्त संख्या आहे,म्हणजेच पुर्णसंख्यांचा समुह हा बेरजेसाठी संवृत्त आहे.या गुणधर्माला पुर्णसंख्याच्या बेरजेसाठी संवृत्ताचा गुणधर्म म्हणतात.

तर हाच गुणधर्म पुर्णसंख्याच्या गुणाकारासाठी लागु पडतो का.तपासणी करु.

तुमचे गुणाकार याप्रकारे असतील:

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | × | 6 | = | 30, | ही पुर्णसंख्या आहे |
| 11 | × | 0 | = | 0, | ही पुर्णसंख्या आहे |
| 16 | × | 5 | = | 80, | ही पुर्णसंख्या आहे |
| 10 | × | 100 | = | 1000, | ही पुर्णसंख्या आहे |
| 7 | × | 16 | = | 112, | ही पुर्णसंख्या आहे |

दोन पुर्णसंख्याचा गुणाकार सुध्दा पुर्णसख्याच दिसत आहे,यावरुन आपल्याला असे म्हणता येते की,पुर्ण संख्येच्या समुह हा गुणाकारामध्ये संवृत्त आहे.आपण असे म्हणु शकतो की पुर्णसंख्या बेरीज आणि गुणाकारामध्ये संवृत्त आहे.

## विचार करा,चर्चा करा आणि लिहा



1. पुर्णसंख्याच्या वजाबाकीमध्ये संवृत्त आहेत का ?

तुमची वजाबाकी अशाप्रकारे येईल.

7 - 5 = 2 ही पुर्णसंख्या आहे

5 - 7 = ? हि पुर्णसंख्या नाही

..... - ..... = .....

..... - ..... = .....

शक्य तेवढी उदाहरणे देवून उत्तरे तपासून करा.

2. पुर्णसंख्याच्या भागाकारामध्ये संवृत्त आहेत का ?

खालील तक्तयाचे निरीक्षण करा:

6 ÷ 3 = 2 ही पुर्णसंख्या आहे

5 ÷ 2 = $\frac{5}{2}$ ही पुर्णसंख्या नाही

..... ÷ ..... = .....

..... ÷ ..... = .....

अशाच अजुन काही उदाहरणे घेवुन खात्री करुन घ्या.

**शुन्याने भागाकार करणे.** 6 ÷ 2 माहीत करु

6 भागीले 2 म्हणजे, 6 मधुन 2 पुन्हा-पुन्हा वजा करणे होय. म्हणजेच 0 येईपर्यंत आपण 6 मधुन 2 पुन्हा-पुन्हा वजा करत जायचे.

SCERT TELANGANA

6 - 2 = 4 पहील्यांदा

4 - 2 = 2 दुसऱ्यांदा

2- 2 = 0 तिसऱ्यांदा

म्हणुन 6 ÷ 2 = 3

3 ÷ 0 चा विचार करु

येथे आपल्याला 3 मधुन 0 वजा करायचे आहे.

3- 0 = 3 पहील्यांदा

3 - 0 = 3 दुसऱ्यांदा

3 - 0 = 3 तिसऱ्यांदा आणि पुन्हा-पुन्हा.....

हे संपेल का ? नाही म्हणुन 3 ÷ 0 ला उत्तर नाही जिथपर्यंत आपण पोहचु शकतो.म्हणुन कोणत्याही पुर्ण संख्येला 0 ने भाग दिले असता,आपल्याला माहीत असलेले उत्तर मिळणार नाही.म्हणुजेच 0 ने भाग देण्याची आस्था करता येत नाही.

**हे करा**

1. माहीत करा 12 ÷ 3 आणि 42 ÷ 7
2. 6 ÷ 0 आणि 9 ÷ 0 च्या बरोबर किती ?



## पुर्ण संख्येचा क्रमनिरपेक्षतेचा गुणधर्म

खालील बेरजांचे निरीक्षण करा;

2 + 3 = 5 ; 3 + 2 = 5

आपण पाहीले की,दोन्ही संदर्भात आपल्याला 5. मिळते.हे पहा

7 + 8 = 15 ; 8 + 7 = 15

आपल्याला असे समजते की 7 + 8 आणि 8 + 7 हे दोन्ही समान आहेत.
येथे संख्यांचा क्रम जरी बदलला असेल तरी बेरीज सारखी येत आहे.
अजुन काही उदाहरणाची तपासणी करा, 10 + 11, 25 + 10. अशा तऱ्हेने हे आपल्याला स्पष्ट झाले की,कोणत्याही क्रमात आपण दोन पुर्णसंख्यांची बेरीज करु शकतो. आपल्याला असे म्हणता येते की,पुर्णसंख्यांच्या बेरजेसाठी क्रमनिरपेक्षता असते. खालील आकृतीचे निरीक्षण करा:




**4 × 3 = 12**




**3 × 4 = 12**

वर पाहता असे दिसुन येते की,गुणाकार सारखा आहे.पण गुणाकारामध्ये त्या दोन पुर्ण संख्यांचा क्रम बदललेला आहे.

पुर्ण संख्येच्या अजुन उदा.ची तपासणी करा. जसे 6 × 5, 7 × 9 तुम्हाला त्यासारखे उत्तर मिळते का ?

अशा तऱ्हेने,पुर्ण संख्येसाठी बेरीज आणि गुणाकारमध्ये क्रमनिरपेक्षता गुणधर्म असतो.

SCERT TELANGANA

## हे प्रयत्न करा

काही उदाहरणे घेऊन आणि तपासणी करा जसे -



1. पुर्ण संखेच्या वजाबाकीसाठी क्रमनिरपेक्षता असतो का नसतो ?
2. पुर्ण संखेच्या भागाकारासाठी क्रमनिरपेक्षता असतो का नसतो ?

## बेरीज आणि गुणाकाराचे सहचर्य

खालीलचे निरीक्षण करा:

i. $(3 + 4) + 5 = 7 + 5 = 12$ ii. $3 + (4 + 5) = 3 + 9 = 12$

म्हणुन, $(3 + 4) + 5 = 3 + (4 + 5)$

( i ) मध्ये,आपण सुरुवातीला 3 आणि 4 ची बेरीज केली आणि त्यामध्ये 5 मिळविलो.
( ii ) मध्ये,आपण सुरुवातीला 4 आणि 5 ची बेरीज केली आणि त्यामध्ये 3 मिळविलो.
पण उत्तर सारखे आले.

यालाच पुर्णसंख्येच्या बेरजेसाठी साहचर्याचा गुणधर्म असे म्हणतात. अजुन 10 उदाहरणे तयार करुन त्याची तपासणी करा. तुम्हाला काही उदाहरणाची बेरीज वेगळी आलली दिसेल का ते पहा ?

खालीलचे निरीक्षण करा:

3×2 3×2 3×2 3×2



$4\times(3\times2) = (3\times2)$ चे चार पट

आकृती. (a)

4×3 4×3



$2 \times (4\times3) = (4\times3)$ चे दुप्पट

आकृती. (b)

आकृती (a) मधील ठोकळ्याची मोजणी करा तसेच आकृती (b) मधील सुद्धा.तुम्हाला काय भेटले ? ठोकळ्यांची संख्या समान आहे. आकृती (a) मध्ये प्रत्येक डब्यात आपल्या जवळ $2 \times 3$ ठोकळे आहेत. म्हणून एकुण ठोकळ्यांची संख्या $= (3 \times 2) \times 4 = 24$

आकृती (b) मध्ये प्रत्येक डब्यामध्ये 4×3 ठोकळे आहेत.

म्हणुन एकुण ठोकळ्यांची संख्या = $2 \times (4\times 3) = 24$

अशात-हेने $(3 \times 2) \times 4 = 2 \times (4\times 3)$

गुणाकारमध्ये सुध्दा आपल्याला सारखेच उत्तर दिसते.

हेच पुर्णसंख्येच्या गुणाकारासाठी साहचर्याचा गुणधर्म आहे.

अशाप्रकारे पुर्ण संख्येमध्ये बेरीज आणि गुणाकारासाठी साहचर्य असते.

## हे करा

खालील सिद्ध करा:



i. $(5 \times 6) \times 2 = 5 \times (6 \times 2)$
ii. $(3 \times 7) \times 5 = 3 \times (7 \times 5)$

SCERT TELANGANA

***उदाहरण -1.*** $196 + 57 + 4$. माहीत करा.

***सोडवणुक :*** $196 + (57 + 4)$

$= 196 + (4 + 57)$ [क्रमनिरपेक्षतेचा गुणधर्म]

$= (196 + 4) + 57$ [सहचर्याचा गुणधर्म]

$= 200 + 57 = 257$

येथे आपण बेरजेसाठी क्रमनिरपेक्षतेचा आणि सहचर्याचा दोन्ही गुणधर्म वापरलो.

तुम्हाला असे वाटते की, क्रमनिरपेक्षतेचा आणि सहचर्याचा दोन्ही गुणधर्म वापरुन गणित सोप्या रितीने करु शकतो का ?

***उदाहरण -2.*** माहीत करा. $5 \times 9 \times 2 \times 2 \times 3 \times 5$

***सोडवणुक :*** $5 \times 9 \times 2 \times 2 \times 3 \times 5$

$= 5 \times 2 \times 9 \times 2 \times 5 \times 3$ [क्रमनिरपेक्षतेचा गुणधर्म]

$= (5 \times 2) \times 9 \times (2 \times 5) \times 3$ [सहचर्याचा गुणधर्म]

$= 10 \times 9 \times 10 \times 3$

$= 90 \times 30 = 2700$

येथे आपण गुणाकारासाठी क्रमनिरपेक्षतेचा आणि सहचर्याचा दोन्ही गुणधर्म वापरलो.

तुम्हाला असे वाटते की,क्रमनिरपेक्षतेचा आणि सहचर्याचा दोन्ही गुणधर्म वापरुन गणित सोप्या रितीने करु शकतो का ?

## हे करा



क्रमनिरपेक्षतेचा आणि सहचर्याचा गुणधर्म वापरुन सरळ रुप द्या:

i. $319 + 69 + 81$ ii. $431 + 37 + 69 + 63$

iii. $2 \times (71 \times 5)$ iv. $50 \times 17 \times 2$

## विचार करा,चर्चा करुन लिहा



$(8 \div 2) \div 4 = 8 \div (2 \div 4)$ हे बरोबर आहे काय ?

भागाकारसाठी सहचर्याचा गुणधर्म पुर्ण संख्याच्या संचाला लागु पडतो का?

जर पुर्ण संख्येच्या वजाबाकीसाठी हा लागु पडत असेल तर तपासणी करा.

**खालील निरीक्षण करा. तुमच्या उत्तराला पाच उदाहरणे देवुन सिध्द करा?**

**जेथे कात्री आहे, तिथुन कापा**




**5 × 4** **2 × 4** **3 × 4**

$5 \times 4$ गंजाची जाडीचा कागद दोन तुकड्यामध्ये विभागले $2 \times 4$ आणि $3 \times 4$

SCERT TELANGANA

$5 \times 4 \quad = (2 \times 4) + (3 \times 4)$

$= 8 + 12 = 20$

त्याच प्रकारे $5 = 2 + 3,$

$5 \times 4 = (2 + 3) \times 4$ अशा प्रकारे आपण म्हणु शकतो की, $(2 + 3) \times 4 = (2 \times 4) + (3 \times 4)$

त्याच प्रकारे $(5 + 6) \times 7 = 11 \times 7 = 77$

$(5 \times 7) + (6 \times 7) = 35 + 42 = 77$

आपल्याला असे दिसते की दोन्ही सारखे आहे.

याला बेरजेमध्ये गुणकाराचा वितरणाचा गुणधर्म म्हणुन ओळखतात.

वितरणाच्या गुणधर्माचा वापर करुन माहीत करा. $2 \times (5 + 6); 5 \times (7 + 8), 19 \times 7 + 19 \times 3$

***उदाहरण -3.*** वितरणाच्या गुणधर्माचा वापर करुन $12 \times 75$ शेवटीची किंमत शोधा?

***सोडवणुक :*** $12 \times 75 \quad = 12 \times (70 + 5) \qquad = 12 \times (80 - 5)$

$= (12 \times 70) + (12 \times 5)$ or $\qquad = (12 \times 80) - (12 \times 5)$

$= 840 + 60 = 900 \qquad = 960 - 60 = 900$

**हे करा**



वितरणाच्या गुणधर्माचा वापर करुन माहीत करा. $25 \times 78; 17 \times 26; 49 \times 68 + 32 \times 49$

**अविकारक (बेरीज आणि गुणाकारासाठी)**

जेंव्हा तुम्ही 7 आणि 5 ची बेरीज कराल तेंव्हा तुम्हाला 12.ही पुर्ण नविन संख्या मिळते.दोन पुर्ण संख्याची बेरीज केली तर उत्तर नविन पुर्ण संख्या मिळते.पण हे सर्व पुर्ण संख्यासाठी लागु पडते का ?

तक्तयाचे निरीक्षण करा.

जेंव्हा आपण एखाद्या पुर्ण संख्येमध्ये शुन्य मिळवित आहो.तेंव्हा आपल्याला तीच पुर्ण संख्या मिळत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | + | 0 | = | 2 |
| 9 | + | 0 | = | 9 |
| 0 | + | 11 | = | 11 |
| ..... | + | 25 | = | 25 |

पुर्ण संख्येच्या बेरजेसाठी शुन्याला बेरजेचे अविकारक म्हणतात.

आता खालील तक्तयाचा विचार करु:

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | × | 9 | = | 9 |
| 6 | × | 5 | = | 30 |
| 6 | × | 4 | = | 24 |
| 5 | × | 1 | = | 5 |
| 11 | × | 1 | = | 11 |
| 2 | × | 3 | = | 6 |

वरील तक्तयाचे निरीक्षण केल्यानंतर आपल्याला असे समजते की 1ने कोणत्याही पुर्ण संख्येला गुणले असता आपणास परत तीच संख्या भेटते.

SCERT TELANGANA

आपल्याला असे दिसते की,जेंव्हा आपण एका पुर्ण संख्येला 1, ने गुणाकार करतो तेंव्हा त्याचे उत्तर तेच पुर्ण संख्या असते.पुर्ण संख्येच्या गुणाकारासाठी एक ला गुणाकाराचा अविकारक म्हणतात.

## अभ्यास - 2.1

1. गणितीय क्रिया न करता दिलेल्या माहीतीचा वापर करुन उत्तर द्या.

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| i. | 28 | × | 19 | = | 532 | तर | 19 | × | 28 | = |
| ii. | 1 | × | 47 | = | 47 | तर | 47 | × | 1 | = |
| iii. | a | × | b | = | c | तर | b | × | a | = |
| iv. | 58 | + | 42 | = | 100 | तर | 42 | + | 58 | = |
| v. | 85 | + | 0 | = | 85 | तर | 0 | + | 85 | = |
| vi. | a | + | b | = | d | तर | b | + | a | = |

2. अनुरुप पुनर्रचना करुन बेरजा करा:

   i. 238 + 695 + 162 ii. 154 + 197 + 46 + 203

3. योग्य अशी पुनर्रचना करुन गुणाकार करा.

   i. 25 × 1963 × 4 ii. 20 × 255 × 50 × 6

4. खालीलची किंमत काढा:

   i. 368 × 12 + 18 × 368 ii. 79 × 4319 + 4319 × 11

5. योग्य गुणधर्माचा वापर करुन गुणाकार करा:

   i. 205 × 1989 ii. 1991 × 1005

6. एक दुध विक्रेता एका वसतिगृहाला सकाळी 56 लिटर व सायंकाळी 44 लिटर दुध पुरवितो.जर दुधाची किंमत प्रती लिटर ₹ 30 आहे,तर त्याला दर दिवशी किती रुपये मिळत आहे ?

7. चंदना आणि वेनुने अनुक्रमे 12 आणि 10 वह्या विकत घेतल्या. प्रत्तेक वहीची किंमत ₹ 15 आहे.तर त्यांनी दुकानदाराला किती रुपये दिले पाहीजे ?

8. जोड्या जुळवा

| | | | |
|---|---|---|---|
| i. 3+1991+7 = 3+7+1991 | [ ] | a. | बेरजेचा अविकारक |
| ii. 2×68×50 = 2×50×68 | [ ] | b. | गुणाकाराचा अविकारक |
| iii. 1 | [ ] | c. | बेरजेमध्ये क्रमनिरपेक्षता |
| iv. 0 | [ ] | d. | बेरजेमध्ये गुणाकाराच्या वितरणाचा गुणधर्म |
| v. 879×(100+30) = 879×100+879×30 | [ ] | e. | गुणाकारामध्ये क्रमनिरपेक्षता |

## 2.4 पुर्ण संख्यातील नमुना

प्राथमिक (मुळ) रुपात संख्याची रचना करण्याचा प्रयत्न करु या. दोन अक्षावर सारख्या अंतराच्या बिंदुच्या जाळीवर ठिपक्यांचे स्थापन केले .तर त्यांचे आकार ( i ) रेषा ( ii ) आयात ( iii ) चौरस (iv) त्रिकोणा सारखे बनते.प्रत्येक संख्याला यापैकी एखाद्या आकाराची रचना करायची असते अनियमित आकार लक्षात घेतल्या जात नाही.

SCERT TELANGANA

पुर्ण संख्यांना ठिपक्यांचा वापर करुन प्राथमिक आकारात दाखवु शकतो.खालीलचे निरीक्षण करा.

- प्रत्येक संख्येला रेषेमध्ये रचना करु शकतो.

  2 ही संख्या ह्या प्रमाणे दाखवतो 

  3 ही संख्या ह्या प्रमाणे दाखवतो 

- काही संख्या आयतामध्ये सुद्धा दाखवु शकतो.

  उदाहरणार्थ

  6 ही संख्या ह्या प्रमाणे दाखवतो 

  ह्या आयतामध्ये असे दिसते की,तिथे 2 ओळी आणि 3 आहेत.

- काही संख्या जसे 4 किंवा 9, चौरसामध्ये रचना करु शकतो.

  4  9 

  इतर संख्यांनी सुध्दा यासारखे चौरस तयार होते का ? येथे आपण एक नमुना पाहु शकतो.

  $4 = 2 \times 2$ हे एक पुर्ण वर्ग संख्या आहे.

  $9 = 3 \times 3$ हे सुद्धा एक पुर्ण वर्ग संख्या आहे.

  चौरसाच्या आकारात करता येणारी पुढची संख्या कोणती आहे ?

  सोप्या रितीने आपण निरीक्षण करु शकतो की, $4 \times 4 = 16$ आणि 16 ही पुढची संख्या आहे.जे की पुर्ण वर्ग संख्या आहे.

  अशा 3 संख्या माहीत करा,जे चौरसाच्या आकारात रचना करु शकते ?

  अशा 5 ,संख्या सांगा जे आयातात रचना करु शकतो पण चौरसात नाही.

- काही संख्यांना त्रिकोणामध्ये सुद्धा रचना करु शकतो.

  3  6 

  नमुद करा की,त्रिकोणाच्या रचनेमध्ये दोन बाजु समान असतात.पायाच्या ओळीत ठिपक्याची संख्या 4, 3, 2, 1 असु शकतात.वरच्या ओळीत केंव्हाही एकच ठिपका असतो.जो की शिरोबिंदु दर्शवितो.

  त्रिकोणाच्या आकारात येणारी पुढची संख्या कोणती आहे ? आणि त्याची पुढची.

  तुम्ही येथील काही नमुन्यांचे निरीक्षण केले आहे का ? प्रत्येक ओळीच्या ठिपक्याच्या संख्यांचे निरीक्षण करा आणि त्या बाबत विचार करा.आता खालील तक्ता पुर्ण करा:

| संख्या | रेषा | आयात | चौरस | त्रिकोण |
|---|---|---|---|---|
| 2 | होय | नाही | नाही | नाही |
| 3 | होय | नाही | नाही | होय |
| 4 | होय | होय | होय | नाही |
| 5 | | | | |
| ..... | | | | |
| 25 | | | | |

SCERT TELANGANA

## हे करा



1. कोणत्या संख्यांना फक्त रेषेत दाखवु शकतो ?
2. कोणत्या संख्यांना आयतात दाखवु शकतो ?
3. कोणत्या संख्यांना चौरसात दाखवु शकतो ?
4. कोणत्या संख्यांना त्रिकोणात दाखवु शकतो ? उदा. 3, 6, .....

## संख्यांचे नमुने-

प्रक्रीयांना सरळ रुप देतांना आपण नमुन्यांचा वापर करतो जे आपल्याला मार्गदर्शन करते:

1. $296 + 9 = 296 + 10 - 1 = 306 - 1 = 305$
2. $296 - 9 = 296 - 10 + 1 = 286 + 1 = 287$
3. $296 + 99 = 296 + 100 - 1 = 396 - 1 = 395$
4. $296 - 99 = 296 - 100 + 1 = 196 + 1 = 197$

अजुन एक नमुना पहा:

1. $65 \times 99 = 65 ( 100 - 1) = 6500 - 65 = 6435$
2. $65 \times 999 = 65 (1000 - 1) = 65000 - 65 = 64935$
3. $65 \times 9999 = 65 (10000 - 1) = 650000 - 65 = 649935$
4. $65 \times 99999 = 65 (100000 - 1) = 6500000 - 65 = 6499935$

एखाद्या संख्येला 9, 99, 999, ..... यासारख्या संख्येने जलद कसे गुणाकार करावे हे येथे आपण पाहु शकतो. ही जलद पद्धत बेरजा करण्यासाठी समर्थपणे आपल्याला उपयोगी पडते.

खालील नमुन्याचे निरीक्षण करा,हे 5, 15, 25, ..... ने एख्याद्या संख्येला गुणाकार करण्यासाठी उपाय सांगत आहे. (याला अजुन पुन्हा वाढविण्यासाठी तुम्ही विचार करा.)

a. $46 \times 5 = 46 \times \frac{10}{2} = \frac{460}{2} = 230 \qquad = 230 \times 1$

b. $46 \times 15 = 46 \times (10 + 5)$

$= 46 \times 10 + 46 \times 5 = 460 + 230 = 690 = 230 \times 3$

c. $46 \times 25 = 46 \times (20 + 5)$

$= 46 \times 20 + 46 \times 5 = 920 + 230 = 1150 = 230 \times 5$ .....

अजुन काही उदाहरण या पद्धतीने सोडविण्यासाठी तुम्ही विचार करु शकता का.



## अभ्यास - 2.3



1. नमुन्याचा अभ्यास करा:

$1 \times 8 + 1 = 9$

$12 \times 8 + 2 = 98$

SCERT TELANGANA

$123 \times 8 + 3 \quad = 987$

$1234 \times 8 + 4 \quad = 9876$

$12345 \times 8 + 5 \quad = 98765$

समोरच्या चार पायऱ्या लिहा.हा नमुना कसा काम करते ते तुम्ही माहीत करु शकता का ?

2. नमुनाचा अभ्यास करा:

$91 \times 11 \times 1 = 1001$

$91 \times 11 \times 2 = 2002$

$91 \times 11 \times 3 = 3003$

समोरच्या सात पायऱ्या लिहा.तपासणी करा, उत्तर बरोबर आहे का पहा.

$143 \times 7 \times 1$, $143 \times 7 \times 2$ ..... नमुना तयार करण्यासाठी प्रयत्न करा.

3. 13680347, 35702369 आणि 25692359 या संख्यांना 9 ने तोडी कसे गुणाकार करावे.त्यासाठी कोणता नमुना आहे ?

4. 1ला 7 ने भाग द्या आणि नमुन्याचा अभ्यास करा.

## आपण काय चर्चा केली ?

1. मोजण्यासाठी वापरणाऱ्या 1, 2, 3, ..... , संख्यांना नैसर्गिक संख्या म्हणतात.
2. फक्त 1 ला सोडुन प्रत्येक नैसर्गिक संख्येला त्या नंतरची संख्या असते.तसेच नैसर्गिक संख्येला त्या अगोदरची संख्या असते.
3. नैसर्गिक संख्याच्या समुहामध्ये जर आपण शुन्य मिळविले तर आपल्याला पुर्ण संख्येचा समुह भेटतो. $W = \{0, 1, 2, 3, ....\}$
4. फक्त 1 ला सोडुन प्रत्येक पुर्ण संख्येला त्या नंतरची संख्या असते.तसेच प्रत्येक पुर्ण संख्येला त्या अगोदरची संख्या असते.
5. सर्व नैसर्गिक संख्या,पुर्ण संख्या होत.शुन्याला सोडुन सर्व पुर्ण संख्या,नैसर्गिक संख्या आहेत.
6. संख्या रेषा काढुन त्यावर पुर्ण संख्या दर्शविने,त्या संख्या रेषेद्वारे आपण सोप्या रितीने बेरीज,वजाबाकी आणि गुणाकार करु शकतो.
7. बेरीज काढण्यासाठी संख्या रेषेवर उजव्या बाजुला जावे.व वजाबाकीसाठी डाव्या बाजुला जावे.आणि गुणाकारासाठी शुन्यापासुन समान अंतरावर उडी मारावी.
8. बेरीज आणि गुणाकारमध्ये पुर्णसंख्या संवृत्त आहे.पण पुर्ण संख्या वजाबाकी आणि भागाकारामध्ये संवृत्त नाही आहे.
9. शुन्य ने भागाकाराची व्याख्या करता येत नाही.
10. पुर्ण संख्येचे शुन्य हे बेरजेचे अविकारक आहे.आणि 1 हा गुणाकाराचा अविकारक आहे.
11. पुर्ण संख्येला बेरीज आणि गुणाकाराचा क्रमनिरपेक्षतेचा गुणधर्म असतो
12. पुर्ण संख्येला बेरीज आणि गुणाकाराचा साहचर्य गुणधर्म असतो.
13. पुर्ण संख्येला बेरीजेमध्ये गुणाकाराचा वितरण गुणधर्म असते.
14. गणिताला सरळरुप देतांना पुर्णसंख्याच्या क्रमनिरपेक्ष,साहचर्य आणि वितरणाचा वापर केल्याने गणित सोडवणे सोपे जाते पण आपण त्यांची पुर्णसंख्यांची माहीती असल्याशिवाय त्यांना वापरु शकत नाही.
15. संख्येचा नमुना हा नुसता मजेदार नसुन ते तोंडी गणित करण्यासाठी खुप फायेदेशीर आहे ते आपल्याला संख्यांचे गुणधर्म चांगले समजण्यासाठी मदत करतात.

SCERT TELANGANA

# संख्याशी खेळ

प्रकरण - 3

## 3.1 प्रस्तावना

संदर्भाचे निरिक्षण करु.

हासीनी ने तीच्या वाढदिवसाला तिच्या मैत्रीणीना चाँकलेट वाटायचे ठरविले.तिच्या वडीलाने 125 चॉकलेट असलेला बॉक्स विकत आणला. त्या वर्गात एकून 25 विद्यार्थी आहेत. प्रत्येकाला समान चॉकलेट वाटावे असे तिने ठरविले. तिने विचार केली की, प्रत्येकाला 2 चाँकलेट वाटावे पण तिच्या लक्षात आले की पुन्हा चाँकलेट उरतील. पुन्हा तिने 3 दयायचे ठरविले पण पुन्हा तिच्या लक्षात आले की काही चॉकलेट उरत आहेत शेवटी तिने प्रत्येकाला 5 चॉकलेट द्यायचा विचार केला आणि तिच्या लक्षात आले की आता चॉकलेट उरणार नाही



वर्गातील सर्व विद्यार्थ्याना समान प्रमाणात वाटण्यासाठी अजून कोणता तरी पध्दत आहे का? विचार करा. ती 125 ला 25 ने भाग देऊ शकते. पुर्वीच्या वर्गात तुम्ही नियम शिकला आहात, दिलेल्या संख्याला 2, 3, 5, 6, 9 आणि 10.ने भाग जातो की नाही. ह्या धड्यात पुन्हा त्याची उजळणी करुन नंतर पुन्हा 4, 8 आणि 11.विभाज्यताच्या नियमाचा शोध लावू.

## 3.2 विभाज्यता

29 चा विचार करु. जेव्हा तुम्ही 29 ला 4 ने भाग देता, तेव्हा बाकी 1 आणि भागाकार 7 येतो

29 ला 4 ने पुर्ण भाग जाते असे तुम्ही म्हणू शकता का ? त्याचे कारण काय ?

जेव्हा 24 ला 4 ने भाग देतो तेव्हा बाकी आणि भागाकार माहीत करा ?

24 ला 4 ने पर्ण भाग जातो का ? कारण काय ?

म्हणून, आपल्याला असे समजते की एख्याद्या संख्येने एख्याद्या संख्याला पुर्ण भाग जाणे म्हणजे बाकी शुन्य येणे होय. भागाकार न करता, एखादया संख्येला एख्याद्या संख्येने पुर्ण भाग जातो की नाही हे तपासणीच्या प्रक्रियेला त्या संख्येचा विभाज्यता नियम असे म्हणतो. आता पुर्वीच्या वर्गात शिकलेल्या नियमाची उजळणी करु या.

SCERT TELANGANA

### 3.2.1 2 चा विभाज्यता नियम

खालील दिलेल्या संख्या चार्ट पहा .

**संख्या चार्ट (रेखा चित्र)**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |
| 31 | 32 | 33 | 34 | 35 | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| 41 | 42 | 43 | 44 | 45 | 46 | 47 | 48 | 49 | 50 |
| 51 | 52 | 53 | 54 | 55 | 56 | 57 | 58 | 59 | 60 |
| 61 | 62 | 63 | 64 | 65 | 66 | 67 | 68 | 69 | 70 |
| 71 | 72 | 73 | 74 | 75 | 76 | 77 | 78 | 79 | 80 |
| 81 | 82 | 83 | 84 | 85 | 86 | 87 | 88 | 89 | 90 |
| 91 | 92 | 93 | 94 | 95 | 96 | 97 | 98 | 99 | 100 |

आता 2 या सर्व गुणकावर फुली (Cross) मारा . या संख्या मध्ये एकक स्थानावर तुम्हाला कोणता तरी नमुना दिसत आहे काय ?

या संर्व संख्येच्या एकक स्थानी 0, 2, 4, 6, 8 या पैकी एखादा अंक आहे या. निरिक्षनावरुन आपल्याला असे म्हणता येईल की, एख्याद्या संख्याच्या एकम स्थानी 0, 2, 4, 6, 8 या पैकी कोणताही एखादा अंक असेल तर त्या संख्येस **2** ने पुर्ण भाग जातो.

## हे करा

953, 9534, 900, 452 ने पुर्ण भाग जाते का ? तसेच भागाकार करुन तपासणी करा



### 3.2.2 3 चा विभाज्यता नियम

आता 3 च्या सर्व गुणकावर गोल करा. तुम्ही 21, 27, 36, 54 इत्यादी सारख्या संख्यावर गोल केले असेल. या संख्यांमध्ये एकक स्थानावर तुम्हाला कोणता तरी नमुना तक्त्यात दिसत आहे काय ? नाही ? एकक स्थानावर असलेल्या सारख्या अंकाच्या काही संख्यना 3 ने भाग जाते. काही संख्याना 3 ने भाग जात नाही उदाहरण- 27 आणि 37 मध्ये एकक स्थानी 7 आहे तर त्या दोन्ही संख्याना 3 ने पुर्ण भाग जातो का ? आता 21, 36, 54, 63, 72, 117 या संख्यामधील अंकाची बेरीज करु

2 + 1 = 3     5 + 4 = ______     7 + 5 = ______

3 + 6 = ______     6 + 3 = ______     1 + 1 + 7 = ______

सर्वाच्या बेरजेला 3 ने पुर्ण भाग जातो आपण असे म्हणू शकतो की, जर अंकाची बेरीच 3 चे गुणक असेल
तर त्या संख्येला 3 ने पुर्ण भाग जाते गोल केलेल्या संख्याना या नियमाची तपासणी करुन पहा.

SCERT TELANGANA

## हे करा .

खालील संख्याना 3 ने पुर्ण भाग जातो का ? तपासणी करा ?

i. 45986 ii. 36129 iii. 7874



### 3.2.3 6 चा विभाज्यता मियम

संख्या चार्ट वर 6 च्या सर्व गुणक संख्या वर फुली मारा.

तुम्हाला त्या संख्या मध्ये विशेष असे काही दिसले काय ?

होय. त्या संख्याना 2 आणि 3 ने पुर्ण भाग जातो. जर एख्याद्या संख्येला 2 आणि 3 दोन्ही संखेने पुर्ण भाग जात असेल तर त्या संख्येला 6 ले पुर्ण भाग जाता असे समजावे.

## हे प्रयत्न करा

1 7224 ला 6 ने पुर्ण भाग जातो का नाही ?

2. 6 ने पुर्ण भाग जाणाऱ्या 4 अंकी दोन संख्या सांगा

3. अशी एखांदी संख्या सांगा ज्याला 6 ने पुर्ण भाग जातो पण 2 आणि 3 ने पुर्ण भाग जात नाही ? का बरे?



### 3.2.4 9 चा विभाज्यता नियम

संख्या चार्ट वर 9 च्या गुणक संख्या वर ☐ हा बॉक्स ठेवा

आता 9 चा विभज्यता नियम बनविणयासाठी प्रयत्न करा (सुचना : अंकाची बेरीज)

ह्या संख्याच्या अंकाच्या बेरजेला सुद्धा 9 ने भाग जातो. .

**उदा:** आपण जर 81 घेतलो तर , 8 + 1 = 9 तसेच 99, 9 + 9 = 18 या दोन्ही बेरीजेला 9 ने भाग जातो. संख्याच्या सर्व अंकाच्या बेरजेला 9 ने पुर्ण भाग जात असेल तर त्या संख्येला 9 ने पुर्ण भाग जातो.

## हे करा



1. 9846 ला 9 ने पुर्ण भाग जातो का ? तपासणी करा ?
2. भागाकार न करता 8998794 ला 9 ने पुर्ण भाग जातो का सांगा ?
3. 786 ला 3 आणि 9 या दोन्ही संख्येने पुर्ण भाग जातो का ? तपासणी करा.?

### 3.2.5 5 चा विभाज्यता नियम :

20, 25, 30, 35, 40, 45, 50 या सर्व संख्याना 5 ने पुर्ण भाग जातो का

53 ला 5 ने पुर्ण भाग जाते का ? कारण काय?

एख्याद्या संख्येच्या एकक स्थानावर 0 किवा 5 या पैकी एख्यादा अंक असेल तर त्या संख्येला 5 ने पुर्ण भाग जातो असे तुम्ही म्हणू शकता का ?

5785, 6021, 1000, 101010, 9005 या संख्याचा विचार करु. एक अंदाज करा . कोणत्या संख्याना 5 ने पुर्ण भाग जातो पहा. तसेच भागाकार करुन ते सिद्ध करा.

SCERT TELANGANA

### 3.2.6 10 चा विभाज्यता नियम

10 ने भाग जाणाऱ्या सर्व संख्याना खुण करा .

तुमच्या लक्षात काय आले?

1. सर्वाच्या एकम स्थानी 0 आहे
2. त्याच सर्व संख्याना दोन्ही 5 आणि 2 ने पुर्ण भाग जातो



## अभ्यास 3.1

1. खालील पैकी कोणत्या संख्याना 2 ने 3 ने आणि 6 ने पुर्ण भाग जातो ?

   (i) 321729 (ii) 197232 (iii) 972132 (iv) 1790184

   (v) 312792 (vi) 800552 (vii) 4335 (viii) 726352

2. खालील पैकी कोणत्या संख्याना 5 आणि 10 ने पुर्ण भाग जातो ते माहीत करा.

   25, 125, 250, 1250, 10205, 70985, 45880

ज्या संख्याना 10 ने पुर्ण भाग जात आहे. त्या संख्येला दोन्ही 2 आणि 5 संख्याने पुर्ण भाग जात आहे का ? तपासणी करा.

3. 3 आणि 9 च्या विभाज्यता नियमाचा वापर करुन खालील तक्ता भरा.

| संख्या | संख्या मधील अंकाची बेरीज | ने भाग जाणे | |
|---|---|---|---|
| | | 3 | 9 |
| 72 | ............................................................ | | |
| 197 | ............................................................ | | |
| 4689 | ............................................................ | | |
| 79875 | ............................................................ | | |
| 988974 | 9 + 8 + 8 + 9 + 7 + 4 =45 | होय | होय |

4. 1, 9 आणि 8 या अंकाचा वापर करुन तीन वेग वेगळ्या 3 अं की संख्या तयार करा एक अंक एकदाच वापरा या पैकी कोणत्या संख्येला 9 ने पुर्ण भाग जातो ? तपासणी करा.

5. 12345 या संख्येला 2, 3, 5, 6, 9 या पैकी कोणत.या सख्येने पुर्ण भाग जाते

   12345 ला उलटे लिहा आणि पुन्हा तपासणी करा कोणत्या सख्येला पुर्ण भाग जाते ?

6. 3, 4 आणि 5 या अंकाचा वापर करुन वेगवेगळ्या दोन अंकी संख्या लिहा आणि या संख्याना 2, 3, 5, 6, आणि 9 या पैकी कोणत्या संख्येने पुर्ण भाग जातो.यांची तपासणी करा.

7. खालील रिकाम्या जागात अशी सर्वात लहान व सर्वात मोठा अंक लिहा. तयार झालेल्या संखेला 3 ने पुर्ण भाग जायला पाहीजे.

   i. __ 6724 ii. 4765__ 2 iii. 7221__ 5

8. ------- मध्ये अशी कोणती सर्वात लहान संख्या मिळविली तर तीला 5 ने पुर्ण भाग जातो ?

9 256 मधुन अशी कोणती सर्वात लहान संख्या वजा केली तर तीला 10 ने पुर्ण भाग जातो.?

SCERT TELANGANA

## 3.3 अवयव

2, 3, 5, 6, 9 आणि 10. याच्या विभाज्यता परिक्षणाबद्दल आपण शिकलो आणि नियम सुध्दा माहीत केलो तर आतां आपण अवयवाचा विचार करु.

एका संदर्भाचे निरक्षण करु :

देवी जवळ 6 नाणे आहेत. त्या सर्व नाण्याना सारख्या संख्येत स्तंभा मध्ये रचना करावी तिने असे ठरविले तीने बरेच पदधतीने रचना केली.

**संदर्भ** (i) प्रत्येक स्तंभात 1 नाणे



स्तंभातची संख्या = 6



एकुन नाण्याची संख्या = 1 × 6 = 6

**संदर्भ** (ii) प्रत्येक स्तंभात 2 नाणे

स्तंभातची संख्या = 3



एकुन नाण्याची संख्या = 2 × 3 = 6



**संदर्भ** (iii) प्रत्येक स्तंभात 3 नाणे

स्तंभातची संख्या = 2

एकुन नाण्याची संख्या = 3 × 2 = 6

**संदर्भ (iv)** प्रत्येक स्तंभात 6 नाणे

स्तंभातची संख्या = 1

एकुन नाण्याची संख्या = 6 × 1 = 6

सर्व 6 नाण्याचा वापर करुन एवढ्या पध्दतीने त्याची रचना करु शकतो. या रचने वरुन ,देवीला असे निदर्शनास आले की 6 ला बऱ्याच पध्दतीने दोन संख्याच्या गुणाकारा मध्ये लिहिता येते.

6 = 1 × 6     6 = 2 × 3     6 = 3 × 2     6 = 6 × 1

6 = 2 × 3 वरुन असे म्हणता येईल की 6 ला 2 आणि 3 ने पुर्ण भाग जातो. म्हणुन 2 आणि 3 हे 6 चे अवयव आहेत. अजून 6 = 1 × 6 ह्या गुणाकारावरुन 6 आणि 1 सुध्दा 6 चे अवयव आहेत.

6 चे 1, 2, 3 आणि 6 हे अवयव आहेत

एखाद्या संख्येने एखाद्या संख्येला पुर्ण भाग जात असेल तर ती संख्या त्या संख्येचा अवयव असतो. दुसऱ्या शब्दात प्रत्येक संखेला त्याच्या अवयवाने पुर्ण भाग जातो. येथे 1, 2, 3 आणि 6 हे सर्व 6 चे अवयव आहेत. तसेच 1 आणि 19 हे 19 चे अवयव आहेत. 16 चे 5 हे अवयव नाही का ?

त्याचे निरिक्षण करा.

| संख्या | अवयव |
|---|---|
| 12 | 1, 2, 3, 4, 6, 12 |
| 18 | 1, 2, 3, 6, 9, 18 |
| 20 | 1, 2, 4, 5, 10, 20 |
| 24 | 1, 2, 3, 4, 6, 8, 12, 24 |

वरील तक त्या वरुन आपल्याला असे लक्षात येते की ,1. प्रत्येक संख्येला 1 हा अवयव असतो आणि तो सर्वात लहान अवयव असतो.

SCERT TELANGANA

2. प्रत्येक संख्या तीच्या स्वतःचा अवयव असते आणि तो सर्वात मोठा अवयव असतो.

3. एखाद्या संख्याचे अवयव तेवढेच किंवा त्याच्या पेक्षा लहान असू शकते..

4. दिलेल्या सख्याच्या अवयवांची संख्या मोजता येते.

**हे करा**

1. 80 चे अवयव माहीत करा.

2. दिलेल्या संख्येला त्याच्या सर्व अवयवाने पुर्ण भाग जाते का ? 28 चे अवयव काढा आणि भागाकाराने पडताळा करा

3. 15 आणि 24.चा अवयव 3 आहे त्याच्या फरकाचा सुध्दा 3 हा अवयव आहे का ?



## 3.4 मुळ आणि संयुक्त संख्या

काही संख्याच्या अवयवाच्या संख्येचे निरीक्षण करु जे खाली दिलेले आहे.

| संख्या | अवयव | अवयवाची संख्या |
|---|---|---|
| 1 | 1 | 1 |
| 2 | 1, 2 | 2* |
| 3 | 1, 3 | 2* |
| 4 | 1, 2, 4 | 3 |
| 5 | 1, 5 | 2* |
| 6 | 1, 2, 3, 6 | 4 |
| 7 | 1, 7 | 2* |

वरच्या तक्त्या वरुन सांगा कोणत्या संख्येला फक्त दोन अवयव आहेत ?

2, 3, 5 आणि 7, अशा चार संख्या आहत ज्याला फक्त दोन अवयव आहेत ( * ने दाखविले ) म्हणजे ज्या संख्येला एक. 1 आणि स्वतःतीच सख्या असे दोनच अवयव असतात अशा संख्याना मुळसंख्या म्हणतात .

कोणत्या संख्याला दोन पेक्षा जास्त अवयव आहेत ?

ज्या सख्यांना दोन पेक्षा जास्त अवयव असतात जसे 4, 6. अश्या संख्याना संयुक्त संख्या असे म्हणतात.

10 पेक्षा मोठी असलेली 5 संयुक्त संख्यांची उदाहरणे सांगा .कोणत्या संख्याला फक्त एकच अवयव आहे? 1ला फक्त 1 हाच आवयव असतो (ती स्वतःच) म्हणुन, 1 ही मुळ संख्या ही नाही आणि सयुक्त संख्या ही नाही.

**हे प्रयत्न करा.**

1. सर्वात लहान मुळ संख्या कोणती आहे ?
2. सर्वात लहान संयुक्त सख्या कोणती आहे?
3. सर्वात लहान विषम संयुक्त सख्या कोणती आहे?
4. 5 विषम आणि 5 सम संयुक्त सख्या सांगा?
5. 1 हे मुळ आहे का संयुक्त आहे?



SCERT TELANGANA

संख्याच्या अवयवाची तपासणी न करता आपण 1 ते 100 पर्यंतच्या मुळ सख्या सहज सोप्या रितीने माहीत करु शकतो. ही पध्दत एरोटोस्थेनिस ग्रीक गणिततज्ञाची आहे. हे खीस्तपूर्व तीसऱ्या शतकात होऊन गेले. तर आता ही पध्दत पाहू. 1 ते 100 पर्यंतल्या संख्या खाली दिल्या प्रमाणे लिहा.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |
| 31 | 32 | 33 | 34 | 35 | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| 41 | 42 | 43 | 44 | 45 | 46 | 47 | 48 | 49 | 50 |
| 51 | 52 | 53 | 54 | 55 | 56 | 57 | 58 | 59 | 60 |
| 61 | 62 | 63 | 64 | 65 | 66 | 67 | 68 | 69 | 70 |
| 71 | 72 | 73 | 74 | 75 | 76 | 77 | 78 | 79 | 80 |
| 81 | 82 | 83 | 84 | 85 | 86 | 87 | 88 | 89 | 90 |
| 91 | 92 | 93 | 94 | 95 | 96 | 97 | 98 | 99 | 100 |

**पायरी -1.** 1 वर फुली मारा कारण 1 हे मुळ संख्या नाही आणि सयुक्त संख्या पण नाही,

**पायरी -2** 2 ला गोल करा 2 च्या सर्व गुणकावर फुली मारा जसे- 4,6,8.....

**पायरी -3** नंतर 3 ही फुली न मारलेली संख्या आहे म्हणुन 3 ला गोल करा आणि त्याच्या सर्व गुणकावर फुली मारा.

**पायरी -4** . नंतर 5 ही फुली न मारलेली संख्या आहे तीला गोल करुन त्याच्या गुणका वर फुली मारा

**पायरी -5** अशाप्रकारे सर्व संख्यासंपेपर्यत करा. सर्व गोल केलेल्या संख्या मूळ संख्या असतील व फुली मारलेल्या संयुक्त संख्या असतील.

## हे प्रयत्न करा.



1. एखाद्या मुळ संख्याच्या अंकाची अदला बदल केल्यास येणारी संख्या पण मुळ संख्या असते. का याचा आदाज तुम्ही करु शकता का?

   **(सुचना:** 2 अंकी मुळसंख्या घ्या )

2. 311 हे मुळ संख्या आहे हे तुम्हाला माहीत आहे .अंकाची पुर्णरचना करुन तुम्ही दोन नवीन मुळ संख्या लिहु शकता का ?

### 3.4.1 सहमुळ (co prime or Positive prime)

3 आणि 8.या सख्या विचारात घ्या. 1 आणि 3 हे 3 चे अवयव आहे

1,2,4 आणि 8.हे 8.चे अवयव आहे

3 आणि 8 दोन्हीचा सामाईक अवयव फक्त 1 आहे अशा तऱ्हेने,ज्या दोन संख्याना फक्त एकसामाईक अवयव आसतो त्यांना सहमुळ संख्या म्हणतात. सामाईक आवयव आसतो त्यांना सहमुळ संख्या म्हणतात.

SCERT TELANGANA

**उदाहरण,** 4 आणि 5, या दोन सहमुळ सख्याचा विचार करु.

**सोडवणुक-** 4 आणि 5 या दोन्ही मुळ संख्या आहेत का?

नाहीत. 4 ही मुळ संख्या नाही फक्त 5 ही मुळ संख्या आहे

म्हणुन दोन मुळ संख्या हे सहमुळ संख्या होतात पण सहमुळ होव्यासाठी मुळसंख्या होणे आवश्यकनाही.

## जोड मुळ

ज्या दोन मुळ संख्येमध्ये 2 चा फरक असतो अशा संख्याना जोड मुळ संख्या म्हणतात.

उदा- (3,5), (5,7), (11, 13), (41,43) इत्यादी

**हे करा**



खालील संख्या वरुन वेगवेळया सहमुळ सख्यच्या जोडया तयार करा

1 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9 आणि 10



## अभ्यास - 3.2

1. रवालील संख्याचे अवयव काढा.

   i. 36 ii. 23 iii. 96 iv. 115

2. रवालील पैकी कोणती जोडी सहमुळ आहे,

   i. 18 आणि 35 ii. 216 आणि 215

   iii. 30 आणि 415 iv. 17 आणि 68

3. 1 आणि 20 मध्ये सर्वात मोठी मुळ संख्या कोणती आहे,?

4. 10 ते 30 मधील संख्याना, मुळ आणि संयुक्त संख्या मध्ये विभागणी करा,

5. 17 आणि 71 हया मुळ संख्या आहेत. हया दोन्ही संरव्येला 1आणि 7 सारखे अंक आहेत या सारखे 100 च्या कमी असलेल्या दोन जोड्या माहीत करा

6. 20 च्या आधीच्या तीन जोड मुळ संख्याच्या जोड्या लिहा

7. दोन मुळ संख्याचा गुणाकार 35 येणाऱ्या दोन मुळ संख्या लीहा ?

8. दोन विषम संख्याची बेरीज 36 येईल अशा दोन विषम मुळ संख्या सांगा ?

9. 100 पेक्षा लहान आणि क्रमाने येणाऱ्या सात संयुक्त संख्या लीहा.

10. तिन विषम मुळ संख्याची बेरीज 53 येईल आशा तिन विषम मुळ संख्या लीहा?

11. ज्याचा फरक10 असेल अशादोन मुळ संख्या लीहा ?

12. 20 पेक्षा लहान असलेल्या तिन विषम संख्याच्या जोडया लिहा. ज्यांच्या बेरीजेला 5 ने पुर्ण भाग जातो?

SCERT TELANGANA

### मुळ अवयव पाडणे

जेव्हा एखाद्या संख्याला त्याच्या अवयवाच्या गुणाकाराच्या रुपात लिहीते तेव्हा आपण असे म्हणतो की त्या संखेचे अवयव पडले. अवयव माहित करण्याच्या प्रक्रियेला अवयव पाडणे असे म्हणतात.संखेचे अवयव पाडण्यासाठी बरेच मार्ग आहेत. चे अवयव खालील प्रकारे पाडता येतात.

a. $24 = 1 \times 24$ b. $24 = 2 \times 12$ c. $24 = 3 \times 8$

d. $24 = 4 \times 6$ e. $24 = 2 \times 2 \times 2 \times 3$

(a), (b) आणी (c) मध्ये एक आवयव मुळ आहे आणि दुसरा सयुक्त आहे (d) मध्ये दोन्ही अवयव संयुक्त संख्या आहेत. पण (e) मध्ये सर्व अवयव मुळ संख्या आहेत.

(e) प्रकारे अवयव पाडणे जेथे सर्व अवयव मुळ संख्या असतात, यालाच मुळ अवयव पाडणे असे म्हणतात.

म्हणजेच मुळ अवयव अवयावाचे पुन्हा अवयव पडत नाहीत

### 3.5.1 मुळ अवयव पाडण्याची पध्दत

1. **भागाकार पध्दत :**भागाकार पध्दतीचा वापर करुन 42 या संख्येचे मुळ अवयव कसे पाडावे ते खालील प्रमाणे आहे

सर्वात लहान मुळ अवयवाने भाग द्या. सुरुवात करा. शेवटी 1 येइ पर्यत भाग देने चालुच ठेवा.

| | |
|---|---|
| 2 | 42 |
| 3 | 21 |
| 7 | 7 |
| | 1 |

$\therefore$ 42 चे मुळ अवयव $2 \times 3 \times 7$ आहेत.

2. **झाड पध्दत:** अवयवाचे झाड काढुन 60 ला मुळ अवयव कसे ते माहीत करु ते खालील प्रमाणे आहे.




**पायरी**-1: दोन संख्याच्या गुणाकार मध्ये 60 दाखवा.

**पायरी -2:** 4 आणि 15 प्रमाण हे सयुक्त संख्या असल्यामुळे त्याचे पुन्हा अवयव पाडा.

**पायरी**-3: मुळ अवयव येइपर्यत ही पध्दत चालुच ठेवा . 60चे मुळ अवयव = 2 x 2 x 3 x 5

**हे करा**.



1. 36 आणि 28 चे भागाकार पध्दतीने अवयव पाढा.
2. 42 चे झाड पध्दतीने अवयव



## अभ्यास 3.3.

1. 90 च्या अवयवच्या झाडामध्ये सुटलेल्या संख्या लिहा







SCERT TELANGANA

2. 84 चे भागकार पध्दतीने अवयव पाडा.

3. 4 अंकी सर्वात मोठी संख्या लिहा आणि त्याचे मुळ अवयव पाडा.

4. मी सर्वात लहान संख्या आहे. माझ्या कडे चार वेगवेगळे मुळ अवयव आहेत.तुम्ही मला शोधु शकाल का?

## 3.6 सामाईक अवयव

खालील तक्त्याचे निरिक्षण करा.

| संख्या | 12 | 18 |
|---|---|---|
| संख्याचे अवयव | 1, 2, 3, 4, 6, 12 | 1, 2, 3, 6, 9, 18 |

12 आणि 18 चे सामाईक अवयव 1, 2, 3 आणि 6 आहेत.

सामाईक अवयव म्हणजे त्या संख्या ज्या दिलेल्या सर्व संख्याचे अवयव असतील. आता 20 आणि 24.चे सामाईक अवयव माहीत करा.

### 3.6.1 महत्तम सामाईक अवयव ( म.सा.वी.) विभाजक

वरील तक्त्या वरुन आपल्याला असे लक्षात आले की, 12 आणि 18 चे 1, 2, 3 आणि 6. हे सामाईक अवयव आहेत. या सामाईक अवयवामध्ये मोठी संख्या कोणती आहे? 6 आहे म्हणुन आपण असे म्हणु शकतो की 12 आणि 18 चे महत्तम सामाईक अवयव (म.सा.वि) 6 आहे

**दोन किवा अधिक संख्याच्या सर्वात मोठ्या सामाईक अवयव महत्तम सामाईक अवयव किवा महत्तम साधारण विभाजक (म.सा.वी.)असे म्हणतात**

### 3.6.1. म.सा.वि. माहीत करण्याची पध्दत

1.मुळ अवयव पाडुन म.सा.वि काढण्याची पध्दत

20, 30 आणि 45 ची म.सा.वी. मुळ अवयव पाडुन खालील प्रकारे काढता येते

| | |
|---|---|
| 2 | 20 |
| 2 | 10 |
| 5 | 5 |
| | 1 |

| | |
|---|---|
| 2 | 30 |
| 3 | 15 |
| 5 | 5 |
| | 1 |

| | |
|---|---|
| 3 | 45 |
| 3 | 15 |
| 5 | 5 |
| | 1 |

आशा प्रकारे 20 = 2 × 2 × 5

30 = 2 × 3 × 5

45 = 3 × 3 × 5

20, 30 आणि 45 चे म.सा.वी. सामाईक अवयव फक्त 5 आहे

म्हणुन 20, 30 आणि 45 चा म.सा. वी. 5 आहे.

## हे करा.



12, 16 आणि 28 ची म.सा.वी. माहीत करा

SCERT TELANGANA

## 2. भागाकार पध्दतीने म.सा.वी. काढणे

ही भागकारंची पध्दत प्रसीध्द ग्रीक गणीततज्ञ युक्लीड ने शोध केली . मोठ्या संख्येला लहान संखेने भाग देणे आणि नंतर पुर्वीच्या भाजकाला बाकी ने भाग देत जाने जो पर्यत बाकी बाकी. 0 येणार नाही शेवट भाजक हा त्या संख्याचा म.सा.वी.आसतो

उदाहरण **-2.** 56 आणि 64 चा म.सा.वी माहीत करा.

सोडवणुक **:**

56) 64 (1
-56
शेवटचा भाजक 8) 56 ( 7
-56
बाकी 0

जेव्हा बाकी 0 आलेला आहे तेव्हा शेवटचा भाजक 8 आहे म्हणुन 56 आणि 64 चा म.सा.वी 8 आहे मोट्या संख्याचा म.सा.वी काढण्यासाठी ही पध्दत उपयोगी पडते.

उदाहरण **3.** 40, 56 आणि 60.चा म,सा,वी माहीत करा

सोडवणुक

40) 56 (1
-40
बाकी 16) 40 (2
-32
शेवटचा भाजक 8) 16 (2
-16
बाकी 0

40 बाकी 56 ची म.सा.वी. 8 आहे..

**पायरी-*2*:** नंतर पहील्या दोन संख्याचा म.सा.वी आणि तिसरी संख्या या चा म.सा.वी, काढणे 60 आणि 8.म.सा.वी काढु

8) 60 (7
-56
शेवटचा भाजक 4) 8 (2
-8
बाकी 0

8 आणि 60 चा मं.सा.वी. 4 आहे.

पायरी- ही संख्या दिलेल्या तिन संखेला म.सा.वी. होते. म्हणुन आणि ची म.सा.वी. काढां



SCERT TELANGANA

### हे करा



28, 35 आणि 49 चो म.सा.वी. काढा.

### विचार कर चर्चा करा आणि लिहा.

कोणत्याही दोन संख्याचा म. सा. वी .काय आहे ?

(i) क्रमाने येणाऱ्या संख्या (ii) क्रमाने येणाऱ्या सम संख्या

(iii) क्रमाने येणाऱ्या विषम संख्या

तुम्ही काय निरिक्षण केले ?मित्रा सोबत चर्चा करा

**उदाहरण-4.** दोन टँकर मध्ये अनुक्रमे 850 लीटर आणि 680 लीटर रँकेल तेल आहे तर त्या दोन टँकर मधील तेल पुर्ण पणे एकाच मापाणे मोजले जाईल असे मोठयात मोठे लिटरमाप माहीत क र I आणि ते मापाने किती वेळेस मोजावे लागणार सांगा ?.

**सोङवणुक:** आपल्याला असे एकच माप माहीत करायचे आहे की ज्याने ते दोन्ही ट्यांकर चे तेल पूर्णपणे मोजता येईल. म्हणुन त्या दोन्ही टँकर ची क्षमता ही भाजक होते. ही क्षमता कमाल असते , म्हणुन 850 आणि 680.ची **म,सा,वी** ही त्यांची कमाल क्षमता असते तर 850 आणि 680 ची **म,सा,वी** 170.आहे म्हणुन मोठयातले मोठे माप 170 लीटर चे आहे या मापाने 5 माप पहिल्या टँकर मध्ये आणि 4 माप दुसऱ्या टँकर मध्य टाकावे लागेल.



### अभ्यास - 3.4

1. खालील संख्याचे मुळ अवयव काढुन आणि भागाकार पध्दतीने म. सा. वी. काढा
   - i. 18, 27, 36 ii. 106, 159, 265
   - iii. 10, 35, 40 iv. 32, 64, 96, 128
2. 504 आणि 792 ,1080 या संख्याचा प्रत्येकी मोठी अवयव संख्या माहीत करा ?
3. एका कमऱ्याची लांबी,रुदी आणि उंची अनुक्रमे 12मी. 15मी. आणि 18 मी. आहे. कमऱ्याचे तीनही माप मोजण्यासाठी मोठ्यातले मोठे टेप (लांबी मोजण्याची पट्टी ) माहीत करा
4. 4 आणि 15 या सहमुळ संख्याचे अवयव काढुन खालील पध्दतीने म.सा.वी. काढली.

   4 = 2 x 2 आणि 15 = 3 x 5 येथे कोणतेही सामाईक मुळ अवयव नाही. 4 आणि 15 ची म.सा.वी 0 आहे. हे उत्तर बरोबर आहे काय ? जर नसेल तर बरोबर असलेली म. सा. वी. कोणती आहे?.

## 3.7 सामाईक गुणक (विभाज्य)

4 आणि 6 चे गुणक

4 चे गुणक = 4, 8, 12, 16, 20, 24, 28, 32, 36, ....., ....., .....

6 चे गुणक = 6, 12, 18, 24, 30, 36, 42, 48, ....., ....., .....

4 आणि 6 चे सामाईक गुणक = 12, 24, 36, ....., ....., .....

SCERT TELANGANA

### 3.7.1 लघुत्तम साधारण विभाजक (ल.सा.वी.)

4 आणि 6 चे साधारण (सामाईक) विभाजक 12, 24, 36, ....., ....., .....

त्या मधील सर्वात लहान 12 आहे.

दोन्ही 4 आणि 6.चे सर्वात लहान साधारण विभाजक 12 आहे.

∴ 4 आणि 6 चे लधुत्तम साधारण विभाजक (ल, सा, वी ) 12 आहे.

**उदहरण -5.** दोन्ही घंटा एकत्र वाजल्या. जर घंटा अनुक्रमे प्रत्येकी 3 मीनीट आणि 4 मीनीटा नंतर वाजत आहे तर ते पुन्हा कोणत्या वेळेला एकत्र वाजतील?

**सांङवणुक :** पहिली घंटा प्रत्येकी 3 मीनीटा नंतर वाजत आहे. म्हणजे पहिली घंटी 3 मीनीट, 6, 9, 12, 15, 18, 21, 24, ..., ...मीनीटा वर वाजत आहे. ( 3 चे विभाज्य ) दुसरी घंटा प्रत्येकी 4 मीनीटा नंतर वाजत आहे म्हणजे दुसरी घंटा 4 .मीनीटा 8, 12, 16, 20, 24, ....., ....., मीनीटा वर वाजत आहे

( **४ चे विभाज्य**)

दोन्ही घंटा एकत्र 12,मीनीट 24 मीनीट ....., ....., मीनीटा नंतर वाजत आहे ( 3 आणि 4चे साधारण विभाज्य ) त्या मध्ये सर्वात लहान (ल.सा.वी ) 12 मीनीटा आहे. म्हणजे याचा अर्थ, ते पुन्हा एकत्र 12 मीणीटानंतर वाजतात. या वरुन आपल्याल म्हणता येते की दोन किवा दोन पेक्षा जास्त संख्याचे साधरण विभाज्य मधील सर्वात लहान संख्या हे लघुत्तम साधारण विभाजक (ल.सा. वी. ) असते. प्रत्येक वेळी लहान विभाज्य ओळखण्या साठी दिलेल्या संख्याचे सर्व साधारण (सामाईक) विभाज्य लिहाण्या पेक्षा आपण ल.सा.वी. सरळ माहीत करु शकतो.

### 3.7.2 ल.सा.वी. माहीत करण्यासाठी पध्दती

**1. मुळ अवयव काडुन ल.सा.वी.काढणे**

36 आणि 60 चे मुळ आवयव काढुन त्याची ल, सा, वी माहीत करु शकतो ते खालील प्रमाणे आहे

**पायरी-1:**प्रत्येक संख्याला मुळ अवयवाच्या गुणाकाराच्या रुपात लीहीणे.

36 अवयव चे $= \boxed{2} \times \boxed{2} \times \boxed{3} \times 3$

60 अवयव चे $= \boxed{2} \times \boxed{2} \times \boxed{3} \times 5$

**पायरी-*2*:** दोन्हीचे सामाइक अवयव एकत्र होणे $2 \times 2 \times 3$

**पायरी-*3*:** 36 आणि 60 चे उरलेले अवयव घेणे म्हणजेच 3 आणि 5.

**पायरी-4:**दोन्ही सख्याचे मुळ अवयव आणि उरलेले अवयव यांचा गुणाकार म्हणजेच ल, सा, वी होय.

म्हाणुन 36 आणि 60ल, सा, वी $= (2 \times 2 \times 3) \times 3 \times 5 = 180$

**हे प्रयत्न करा.**



1. खालीलचे ल, सा, वी.माहीत करा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| i. | 3, 4 | ii. | 10, 11 | ii. | 5, 6, 7 |
| iv. | 10, 30 | v. | 4, 12, 24 | vi. | 3, 12 |

तुम्ही काय निरीक्षण केले ?

SCERT TELANGANA

**जर दीलेल्या दोन सख्ये मध्ये एक जर दुसरीचे विभाज्य आसेल तर त्या सख्याचा ल.सा.वी च्या मधील मोठी**

**2.** **भागाकार पध्दत**

24 आणि 90:ची ल, सा, वी माहीत करा

**पायरी-1:**सर्व संख्या एका ओळीत लीहा.

**पायरी-2:**नंतर अशा लहान मुळ संख्ये ने भाग द्या जेणे करुन कमीत कमी त्यातील दोन संख्येला तरी भाग जायला पाहीजे आणि न भाग जानारी संख्याला जश्याला तशी खाली लीहा.

**पायरी-3** पुन्हा पुन्हा भाग देत जावा जो पर्यंत खाली 1येत नाही..

**पायरी-4**:भाजक आणि उरलेल्या संख्येचा म्हणजे ल. सा. वी. होय जसे--

| | |
|---|---|
| 2 | 24, 90 |
| 3 | 12, 45 |
| | 4, 15 |

24 आणि 90 ची ल, सा, वी $2 \times 3 \times 4 \times 15 = 360$

**उदाहरण 6.** 21, 35 आणि 42 ल, सा, वी माहीत करा .

**सोडवणुक:**

| | |
|---|---|
| 7 | 21, 35, 42 |
| 3 | 3, 5, 6 |
| | 1, 5, 2 |

21, 35 आणि 42 ची ल, सा, वी $7 \times 3 \times 5 \times 2 = 210$

## विचार करा,चर्चा करा आणि लिहा.

दोन कीवा दोन पेक्षा जास्त सख्याचा गुणाकार हा त्याचां ल, सा, वी केव्हा होतो?





## अभ्यास - 3.5

1. मुळ अवयव पध्दतीने खालील संख्याचा ल, सा, वी माहीत करा .
   i. 12 आणि 15 ii. 15 आणि 25 iii. 14 आणि 21
   iv. 18 आणि 27 v. 48, 56 आणि 72 vi. 26, 14 आणि 91.
2. भागाकार पध्दतीने खालील संख्याचा ल, सा, वी माहीत करा .
   i. 84, 112, 196 ii. 102, 119, 153 iii. 45, 99, 132, 165
3. अशी सर्वात लहान संख्या शोधा ज्या मध्ये 5 मीळवीले असता ती संख्या 12,14 आणि 18 ने पुर्ण भाग जातो?
4. 3 अकी सर्वा मोठी संख्या माहीत करा जेव्हा त्या संख्येला 75, 45 आणि 60 भाग दिले असता-
   i. बाकी शुन्य राहते ii. प्रत्येक वेळेस बाकी 4 राहते
5. 64 से.मि., 72 से.मि. आणि 96 से.मि. मापनाचे तीन टेप आहेत असे कोणते लहानातले लहान मापचे टेप आहे ज्याने प्रत्येक टेप ला निश्चित मोजता येते ?
6 तिन भांडया मध्ये अनुकमे 32 लीटर , 24 लीटर आणि 48 लीटर तेल भरुण आहे. या तीन ही तेलास एक मोठ्या भांड्यात भरायचे आहे तर त्या भांड्याची क्षमता किती असावी?
7. प्रसाद आणि राजु महिन्याच्या पहिल्या दिवशी बजारात भेटले, प्रसाद बाजाराला प्रत्येक 3 ऱ्या दिवशी आणि राजु प्रत्येक 4 थ्या दिवशी जातात, तर ते महिन्याला कोणत्या दिवशी पुन्हा भेटतील?

SCERT TELANGANA

## 3.8 ल, सा, वी आणि म,सा.वी. मधील संबध,

18 आणि 27 हया संख्या विचारात घेऊ 18 चे अवयव = $2 \times 3 \times 3$; 27 चे अवयव = $3 \times 3 \times 3$

18 आणि 27 ची . ल, सा, वी ,$3 \times 3 \times 3 \times 2 = 54$

18 आणि27 ची , म, सा .वी ,$3 \times 3 = 9$

ल, सा वी ×म सा वी = $54 \times 9 = 486$

18 आणि 27चा गुणाकार $18 \times 27 = 486$

तुमच्या काय लक्षात आले

आपण असे पाहिले की,

दोन सेख्यांचा ल, सा वी आणि म सा वी चा गुणाकार = त्या दोन्ही संख्याचा गुणाकार

**सुचना:** हे संबध फक्त दोन संख्या साठी आहे.

**उदाहरण**-7. 8 आणि 12 ची म.सा.वी. माहीत करा नंतर वरील संबधाचा उपयोग करुन म.सा.वी. काढा?

**सोडवणुक** 8 आणि 12 = $2 \times 3 \times 4 = 24$ आपल्याला माहीत आहे

| 4 | 8 | 12 |
|---|---|---|
| | 2 | 3 |

ल. सा. वी × म. सा. वी = दोन संख्याचा गुणाकार

$$\text{म. सा. वी} = \frac{\text{दोन सख्याचा गुणाकार}}{\text{ल. सा. वी}}$$

$$= \frac{8 \times 12}{24} = 4$$

8 आणि 12 ची , म. सा. वी = 4

## विचार करा चर्चा करा आणि लिहा.



जुळया मुळ संख्याची ल,सा,वी आणि , म, सा .वी. काय असते ?



## अभ्यास - 3.6

1. खालील संख्याचा ल, सा, वी आणि , म, सा .वी माहीत करा

i. 15, 24  ii. 8, 25  iii. 12, 48

त्या मधील संबधचे तपासणी माहीत करा.

2. दोन संख्याची ल, सा, वी 290,आहे आणि त्याचा गुणाकार 7250,आहे तर त्याची म, सा .वी कीती असेल?

3. दोन संख्याचा गुणाकार 3276 आहे तर त्याची म, सा .वी 6,आह तर त्याची ल, सा, वी माहीत करा.

4. दोन संख्याची म,सा.वी 6 आहे आणि त्याची ल,सा,वी 36आहे जर एक सख्या12,आहे तर दुसरी

SCERT TELANGANA

## 3.9 4, 8 आणि 11चा विभाज्यता नियम

आपण 2, 3, 5, 6, 9 आणि 10 चा विभाज्यता नियम शिकलो. आता आपण 4, 8 आणि 11चा विभाज्यता नियम माहीत शोधू या.

### 3.9.1 4 चा विभाज्यता नियम

खालील नमुन्याचे निरक्षन करा

| संख्या | असे लिहु शकतो | 4 ने भाग जातो का ? |
|---|---|---|
| 100 | 100 | होय |
| 600 | 6 × 100 | होय |
| 1000 | 10 × 100 | होय |
| 10000 | 100 × 100 | होय |
| 100000 | 1000 × 100 | होय |

वरील तक्त्या वरुन आपल्याला असे लक्षात येते की 100 ला 4 ने पुर्ण भाग जातो येथे 600, 1000, 10000,100000 हे 100 चे वीभाज्य आहेत. म्हणुन ह्या संख्याना सुध्दा 4 ने पुर्ण भाग जातो..

तुम्हाला माहीत आहे की सर्व समसंख्याना 2 ने पुर्ण भाग जातो.

सर्व समसंख्याना 4 ने पुर्ण भाग जातो का पडताळा करु या ?

126 ही सम सख्या आहे हीला 2 ने पुर्ण भाग जातो.. 126 ला 4 ने पुर्ण भाग जातो का.?

126 ला असे लीहु शकतो- 126 = 100 + 26

तुम्हाला माहीत आहे की 100 ला 4 ने पुर्ण भाग जातो. पण 26 ला 4 ने पुर्ण भाग जात नाही.

या वरुन आपन असे म्हणु शकतो की सर्व सम संख्याना 4 ने पुर्ण भाग जाणे आवश्यक नाही .

उदाहरणार्थ 76532 चा वीचार करु या.

76532 ला 70000 + 6000 + 500 + 30 + 2. असे लीहु शकतो. तुम्हाला माहीत आहे की 100, 1000, 10000 हे 100,चे विभाज्य आहेत आणि 100 ला 4.ने पुर्ण भाग जातो म्हणुन प्रत्येक वेळेस त्याची तपासनि करण्याची आवशकता नाही म्हणुन दिलेल्या संख्येच्या शेवटच्या दोन अंका सोबत तपासनी केली तर पुरे. म्हणजे 32 ला 4 ने पुर्ण भाग जातो का ? होय जातो. याला 4 ने पुर्ण भाग जातो म्हणुन आपण असे म्हणु शकतो की 76532 ला सुध्दा 4 ने पुर्ण भाग जातो.

तुम्हाला आगोदरच माहीत आहे, विषम संख्याना 4 ने पुर्ण भाग जात नाही

**संख्येच्या शेवटच्या दोन अंकाशी जर 4 ने पुर्ण भाग जात आसल्यास त्या संख्यालाही 4 पुर्ण भाग जातो. शंभर पेक्षा मोठया असलेल्या संख्याना हा नियम लागु पडतो.**

**सुचना** .लहान संख्यासाठी (1 व 2 अंकी संख्या) आपल्याला भागाकार करावे लागणार.

**उदाहरण - 8.** 56496 ला 4 ने पुर्ण भाग जाते का ? पडताळा करा.

**सोडवणुक :** 56496 = 50000 + 6000 + 400 + 96

आपल्याला आगोदरच माहीत आहे 50000, 6000, 400 ह्या सर्व संख्या 100 चे विभाज्य आहेत त्या संख्याना 4 ने पुर्णपणे भाग जातात.

SCERT TELANGANA

96 ला 4 ने पुर्ण भाग जाते की नाही  आपल्याला एवढेच तपासायचे आहे.

म्हणुन दिलेली संख्या 56496 ला सुध्दा 4 ने पुर्ण भाग जातो

**हे करा**



1. 100000 ला 4 ने पुर्ण भाग जातो का ?
2. अशा 2 अंकी संख्या सांगा ज्याना 2 ने पुर्ण भाग जातो पण 4 ने जात नाही ?

### 3.9.2 8 चा विभाज्यता नियम

आपण 4 चा वीभज्यता नियम शिकलो. हे संख्येच्या विस्तारावर अवलंबुन असते. 10ला 4 पुर्ण भाग जात नाही म्हणुन आपण 100 आणि 100 पेक्षा जास्त संख्या जे 100 चे विभाज्य असेल अश्याचा वीचार करु. म्हणुन शेवटच्या दोन अंकाला 4ने भाग जातो. त्याच प्रकारे 10 ला 8 ने भाग जात नाही आपण 100 चा विचार करु.

100 ला 8 ने पुर्ण भाग जातो का ? नाही.

1000 ला 8 ने पुर्ण भाग जातो का ? होय.

1000 पेक्षा मोठी संख्या ज्या मध्ये काही तरी मिळलेली आहे आणि 1000 चे विभाजक आहे. त्यांना असे लिहु शकतो. जसे- उदा - 4825 = 4 x 1000 + 825.

संख्येच्या शेवटचा तीन अंक मिळुन जी संख्या होईल त्या संख्येला जर 8 ने भाग जात असेल तर त्या संख्येला ही 8 ने भाग जातो. असेच काही उदाहरण पाहु या.

**उदाहरण-9.** 93624 ल 8 ने पुर्ण भाग जातो का ?पडताळा करा

**सोङवणुक:** 93624 = 90000 + 3000 + 600 + 20 + 4

आपल्याला माहीत आहे की 1000 ला 8 ने पुर्ण भाग जातो.

येथे 90000 आणि 3000 हे 1000 चे विभाज्य आहेत. ते 8 ने पुर्ण भागले जातात.

म्हणुन संख्येच्या तीन अंकाची विभाज्य तपासणी केले तर पुरे होते.

624 ला 8 ने पुर्ण भाग जातो काय ? होय. म्हणुन दिलेल्या संख्याला, 93624 ला सुध्दा 8 ने पुर्ण भाग जातो

**4 किवा 4 पेक्षा जास्त अंकी संख्येला 8 ने तेव्हा भाग जातो जेव्हा त्या संख्येला शेवटचे तीन अंक मिळुन तयार झालेल्या संख्येला 8 ने भाग जाईल 1, 2 किवां 3 तीन अंकी संख्ये साठी हा नियम लागु पडत नाही या संख्येना 8 ने भागाकार करुन तपासावे लागणार .**

**हे करा**

1. 76104 ल 8 ने पुर्ण भाग जातो का ?
2. 100 आणि 200 मधील 8 ने पुर्ण भाग जाणाऱ्या संख्या लिहा.



SCERT TELANGANA

### 3.9.3 11 **चा विभाज्यता नियम**

रिकाम्या जागा भरुन तक्ता पुर्ण करा.

| संख्या | विषम स्थानावर असलेल्या अंकाची बेरीज (उजव्या बाजुने) | सम स्थानावर असलेल्या अकांची बेरीज (उजव्या बाजुने) | फरक | दिलेल्या फरकाला 11 ने पुर्ण भाग जातो का? |
|---|---|---|---|---|
| 29843 | | | | |
| 90002 | | | | |
| 80927 | | | | |
| 19091908 | 8+9+9+9=35 | 0+1+0+1=2 | 35-2=33 | होय |
| 83568 | | | | |

तक्त्या वरुन तुमच्या काय निदर्शनास आले ?

आपल्या असे निदर्शनास आले की प्रत्येक सदर्भात त्या मधील फरक 0 नाही तर 11ने भाग जाणारी संख्या आहे. ह्या सर्व संख्याना सुध्दा 11 ने पुर्ण भाग जातो का?

83568 संख्या साठी फरक 12 आलेले आहे ज्याला 11ने भाग जात नाही. म्हणुन 83568 ही संख्या सुध्दा 11ने पुर्ण भाग जात नाही. जर एरवाद्या संख्येच्या उजवीकडुन समस्थानाच्या अंकाची बेरीज आणि विषम स्थानाच्या अंकाची बेरीज,यांची वजाबाकी 0 किवं 11चे गुणक असल्यास तर त्या संख्येला11ने पुर्ण भाग जातो

**उदाहरण -10.** 6535 ल 11 ने पुर्ण भाग जातो का?

**सोडवणुक:** विषम स्थानातील अंकाची बेरीज = 5 + 5 = 10

सम स्थानातील अंकाची बेरीज = 3 + 6 = 9

त्यांचा फरक = 10 - 9 = 1

1 ला 11 ने भाग जातो का?नाही

म्हणुन 6535 ल 11ने पुर्ण भाग जातो का ?

**उदाहरण-11.** 1221 ला 11ने पुर्ण भाग जातो का ?

**सोडवणुक:** विषम स्थानातील अंकाची बेरीज = 1 + 2 = 3

सम स्थानातील अंकाची बेरीज= 2 + 1 = 3

त्यांचा फरक = 3 - 3 = 0

म्हणुन 1221 ला 11ने पुर्ण भाग जात

SCERT TELANGANA

## हे प्रयत्न करा

1221 ला पॉलीनड्रोम (polyndrome number) संख्या म्हणतात. पॉलीनड्रोम संख्या म्हणजे अशी संख्या ज्या संख्याचे अंक उलटे लिहले तरी तीच संख्या रहते, सम संख्या अंक असलेल्या प्रत्येक पॉलीनड्रोम संख्येला केव्हांही 11ने पुर्ण भाग जातो का ? 6- अंकी असलेल्या पॉलीनड्रोम संख्या लिहा. तसेच ह्या संखेला ने भाग जातो का नाही याचा पडताळा कढरा.



## अभ्यास - 3.7

1. खालील संख्या पैकी कोणत्या संख्याना 4 ने पुर्ण भाग जातो ?
   i) 572 ii) 21,084 iii) 14,560
   iv) 1,700 v) 2150
2. खालील संख्याना 8 ने पुर्ण भाग जातो का ? तपासणी करा
   i) 9774 ii) 5,31,048 iii) 5500
   iv) 6136 v) 4152
3. खालील संख्यांना 11 ने पुर्ण भाग जातो का ? तपासणी करा
   i) 859484 ii) 10824 iii) 20801
4. खालील संख्याना 4 ने आणि 8 ने पुर्ण भाग जातो का ? तपासणी करा.
   i) 2104 ii) 726352 iii) 1800
5. अशी संर्वात लहान संख्या माहीत करा. ज्या मध्ये 289279 मिळविल्यास 8 ने पुर्ण भाग जातो ?
6. अशी सर्वात लहान संख्या माहीत करा. ज्या मधुन 1965 वजा केल्यास येणाऱ्या संख्येला 4 ने पुर्ण भाग जातो.
7. 11 ने पुर्ण भाग जाणाऱ्या 1000 आणि 1100, मधील शक्य तेवढ्या संख्या लिहा
8. 1240 च्या जवळची संख्या लिहा ज्याला 11 ने पुर्ण भाग जातो ,?
9. 105 च्या जवळची संख्या लिहा ज्याला 4 ने पुर्ण भाग जातो ?

## आपण काय-काय चर्चा केलो ?

1. आपण विभाज्य भाजक,अवयव या वर चर्चा केले आणि तसेच आपण पहिले की ,अवयव आणि विभाज्य कसे माहीत करावे,
2. **खालील अंशावर आपण चर्चा केलो-**
   i. एखादया संख्येचा अवयव हा त्या संख्येचा अगदी बरोबर भाजक असतो.
   ii. प्रत्येक संख्या ती स्वतः त्या संख्येचा एक अवयव असतो आणि तसेच प्रत्येक संख्येत हा अवयव असतो
   iii. दिलेल्या संख्येचा प्रत्येक अवयव तेवढी किवा त्या पेक्षा लहान असते.
   iv. प्रत्येक संख्या ही तीच्या प्रत्येक अवयवाचा विभाज्य ( गुणक )असते.
   v. दिलेल्या संख्येचा प्रत्येक विभाज्य तेवढाच किवा त्या पेक्षा मोठा असतो.
   vi. प्रत्येक संख्या ती स्वतः त्या संख्येचा एक विभाज्य (गुणक )असते.

SCERT TELANGANA

सख्या माहीत करा

3. **आपण शिकलो की,**

i. 1 ला सोडुन अशी संख्या जीला 1 आणि स्वतः त्याच संख्या एवढेच अवयव असतात. त्या संख्येला मुळ संख्या असे म्हणतात. दोन पेक्षा जास्त अवयव असणाऱ्या संख्येला संयुक्त संख्या असे म्हणतात. 1 ही संख्या संयुक्त संख्याही नाही आणि मुळ संख्या पण नाही,

ii . 2 ही सर्वात लहान मुळ संख्याआहे आणि ती समसंख्या आहे . 2 ला सोडुन सर्व मुळ संख्या विषम संरव्या आहेत.

iii. दोन संख्याना फक्त 1 हाच सामाईक अवयव असतो त्याना सहमुळ संख्या म्हणतात,

iv. एरवादया संख्या एखांदी संरव्येने पुर्ण भाग जात असेल तर त्या संख्याच्या सर्व अवयवाना सुध्दा त्या संख्याने पुर्ण भाग जाते,

v. एखाद्या संख्येला दोन सहमुळ संखेने पुर्ण भाग जात असेल तर त्या संखेला त्याच्या गुणाकाराने सुध्दा पुर्ण भाग जात

4. एखाद्या संखेला नुसते पाहुनच त्या संखेला 2, 3, 4, 5, 8, 9 आणि 11 ने पुर्ण भाग जाते की नाही याची तपासणी कसे करावे,या बाबत आपण चर्चा केलो. संख्यामधील अंकाचा संबध आणि वेगवेगळ्या संख्यांनी त्याची भाजनीयता याचा आपण शोध केला

i. 2, 5 आणि 10च्या भाजनियते मध्ये आपण फक्त संखेचा शेवटचे अंक पाहतो.

ii. 3 आणि 9 च्या भाजनियते मध्ये आपण संख्येच्या अंकाची बेरीज करुन तपासतो

iii. 4 आणि 8 च्या भाजनियते मध्ये आपण अनुक्रमे संरव्येच्यां शेवटचे 2 आणि 3 अंकाची तपासणी करतो

iv. 11 च्या भाजनियता मध्ये आपण संखेच्या समस्थानी वरच्या अंकाची बेरीज आणि विषम स्थाना वरच्या अंकाच्या बेरजेला फरकाची तपासणी करतो,

5. जर दोन संख्याा एरवादया संखेने पुर्ण भाग जात असेल तर त्या संखेच्या बेरजेला आणि फरकाल सुध्दा त्या संखेने पुर्ण भाग जातो.

6. **आपण शिकलो की ,**

i. दिलेल्या दोन किवा दिन पेक्षा मोठ्या संख्येला लघुत्तम साधारण (सामाईक) विभाजक (म.सा.वी. )ही त्यांची मोठी सामाईक अवयव असते.

ii. दिलेलया दोन किवा तिन पेक्षा मोठया सरव्येचा लघुत्तम साधारण विभाजक (ल.सा.वी) हा त्यांचा लहान सामाईक विभाजक असतो.

7. जर दिलेल्या दोन सख्येमध्ये एक जर दुसरीचे विभाजक असेल तर त्या संख्याचा ल.सा.वी. त्यामधील मोठी संख्या असते.

8. ल.सा.वी. आणि म.सा.वी. मधील संबंध

ल.सा.वी × म.सा.वी = दोन संख्याचा गुणाकार

**दत्तात्रेय रामचंद्र कापरेकर**

**1905 - 1986 AD**

**अंकाशी खेळणारा शिक्षक 6174 ला कापरेकरांचा स्थिरांक म्हणतात.**

**त्यांची डेमो संख्या आणि स्वसंख्या व्युत्पन्न केले**



SCERT TELANGANA

धडा - 4

# भुमितीय मुलभूत संकल्पना

## 4.1 प्रस्तावना

आपल्या सभोवताली आपण वेगवेगळया प्रकारच्या वस्तु पाहतो.जसे- भांडे,लाकडी सामान,चित्र आणि बऱ्याचशा वस्तु. तुम्ही रांगोळी किंवा मेहंदी पाहीलीच असाल ? ,कशा पद्धतीने हे आकार काढल्या जातात तुम्ही कधी बघीतले काय ? आपण त्यामध्ये बरेचश्या भुमितीच्या आकाराचा उपयोग करत असतो.





तुंमच्या सभोवती असलेल्या काही वस्तुंचे निरीक्षण करा आणि त्यामध्ये तुम्ही कोणते आकार पाहीलेत यांची ओळख करुन घ्या.उदा.-TV चा पडदा. हा आयाताच्या आकाराचा असतो. तसेच फ्रिज,पेन्सील बॉक्स,पुस्तक इत्यादी सुद्धा आयाताकार असतात..पण काच, बिंदी,फुल इत्यादी. यांच्या बाबत काय म्हणता येईल. आपण आधीच्या वर्गात भुमितीचे काही आकार शिकलो. या धड्यात अजुन काही भुमितीच्या आकाराचा अभ्यास आपण करणार आहोत.

## 4.2 बिंदू

एक टोकदार पेन्सील ने कागदावर एक खुण करा. जसे तुम्ही ठोकदार पेन्सील घ्याल, तसा ठिपका लहान बनतो.न दिसणाऱ्या अतिशय लहान ठिपक्याचे निरीक्षण करा. हे तुम्हाला बिंदुंची कल्पना देते. बिंदुने एक स्थान ठरविल्या जाते. बिंदुप्रमाणे दिसणारे काही उदाहरणच शोधा.



दुरचे तारे सुध्दा आपल्याला बिंदुंची कल्पना देतात. आंध्रप्रदेशच्या नकाशात हैद्राबादचे स्थान दाखविण्यासाठी आपण बिंदुचा वापर करतो.चित्र,आकृती किंवा नकाशामध्ये काही विशेष दाखविण्यासाठी तुम्ही बिंदुचा वापर करत असलेल्या अजुन काही उदाहरणाचा विचार करा..






बिंदु हे इंग्रजीच्या मोठ्या अक्षराने दर्शविल्या जाते.बाजुच्या आकृतीत A, B आणि C हे तीन बिंदु आहेत.




त्यांना बिंदु A, बिंदु B आणि बिंदु C म्हणुन वाचावे.

### हे करा



1. दिलेल्या आयतामध्ये चार बिंदुंची खुण केलेली आहे,त्यांना नावे द्या.



SCERT TELANGANA

## 4.3 रेषाखंड



एक जाड कागद घेऊन आकृतीत दाखविल्याप्रमाणे त्याची घडी करा.ह्या कागदाच्या घडी केलेल्या कडेला पहा. हे तुम्हाला रेषाखंडाची कल्पना देतात.कागदावरची घडी रेषा खंडाला दर्शविते.याला दोन अंत्य बिंदु असतात. A आणि B रेषाखंडाची जाडी खुप कमी असते.




तुम्ही वही किंवा पेन्सील बॉक्स घ्या .आणि त्यांच्या कडेला पेन्सीलने कागदावर एक रेषा ओढा.

तुम्ही जे काढलात ते रेषाखंड दर्शविते .त्याला दोन अंत्य बिंदु आहेत, त्यांना नावे द्या.

एक दोरा घ्या, त्याला ताणा या स्थितीमध्ये ते रेषाखंडाची कल्पना देते. जेथे दोरीचा शेवट हे रेषाखंडाचे अंत्य बिंदु असतील.




कागदावर A आणि B असे दोन बिंदु घ्या.त्या दोन बिंदुला जोडा. A पासुन B अंतर किती आहे,हे रेषाखंड AB आहे.याला $\overline{AB}$ किंवा $\overline{BA}$ असे दर्शविले जाते.

## 4.4 रेषा

कल्पना करा की रेषाखंड A ते B (म्हणजे $\overline{AB}$ ) ला A च्या दिशेला आणि B च्या दिशेला अंत न करता पाठविले.

तर हे रेषेला दर्शविते.




आपण अनंत अशी लांब रेषा काढु शकत नाही.म्हणुन आपण दोन्ही बाजुला बाणाचे चिन्ह दर्शवितो.हे चिन्ह असे दर्शविते की,रेषा अजुन समोर आहे.ही रेषा $\overleftrightarrow{AB}$ अशी दर्शवितो.रेषेला इंग्रजीच्या लहान अक्षरांनी सुध्दा दर्शवितात,जसे *l*, *m*, *n* इत्यादी हे एक सरळ रेषा आहे .

### हे करा



एक जिओ-बोर्ड घ्या.दोन कोणतेही खिळे निवडा. त्याला एका दोरीने बांधा तुम्ही बांधलेली दोरी एक रेषा आहे. त्याला दोन्ही बाजुने वाढवत जा.

## 4.5 किरण

सुर्य किरण, प्रकाश किरण, टार्च किरण असे काही उदाहरण आहे.ज्या 'किरणाची भुमितीय कल्पना दर्शवतात.



किरण हा रेषेचाच एक भाग आहे. हे एका बिंदुपासुन सुरुवात होते.पण शेवट नसतो. ते एका दिशेने न संपता जातात.



किरणाला फक्त एकच अंत्यबिंदु असतो.

एका रेषेवर A हा अंत्यबिंदु आहे.आणि त्याच्या दोन्ही बाजुला B आणि C बिंदु आहे.तर आणि $\overrightarrow{AC}$ हे दोन किरण आहेत.




SCERT TELANGANA

## हे करा

येथे $\overline{OA}$ . याची सुरुवात ○ पासुन होते आणि A बिंदुतुन जाते.ही अजुन B बिंदुतून सुद्धा जाते. याला $\overline{OB}$ रेषा हे नाव देऊ शकता का ? का ?




किरण $\overline{OA}$ ला $\overline{AO}$ म्हणुन लिहु शकता का ? का ? का नाही ?
कारण द्या.





1. खाली दिलेल्या बिंदुंना जोडा.आकृतीत रेषाखंडांना नावे द्या.

i.




ii.




2. आकृतीवरुन खालीलचे नावे लिहा.




i. कोणतेही पांच बिंदु
ii. कोणतेही पांच रेषाखंड
iii. कोणतेही तीन किरण
iv. कोणतेही पांच रेषा

3. खालील मधुन किती रेषा काढता येतात.

i. एका बिंदुतुन ii. दोन वेगळ्या बिंदुतुन

तुमचे उत्तर माहीत करण्यासाठी कच्ची आकृती काढा.

4. खालील पैकी कोणते मर्यादीत लांबीचे आहे ?

i. रेषा ii. बिंदू iii. रेषाखंड iv. किरण

5. खालीलना किती अंत्यबिंदु असतात ?

i. रेषाखंड ii. किरण iii. रेषा

6. 'सत्य' किंवा 'असत्य' ते लिहा.

i. रेषेला अंत्यबिंदु नसतात. ( )
ii. किरण हे रेषेचे भाग आहे. ( )
iii. रेषाखंड हा मर्यादीत लांबीचा नसतो. ( )
iv. रेषाखंडाला फक्त एकच अंत्यबिंदु असतो. ( )
v. एका बिंदूतुन आपण अनंत रेषा काढु शकतो. ( )

7. काढा आणि नावे द्या:

i. P बिंदू असलेली रेषा
ii. R मधुन जाणारी रेषा

SCERT TELANGANA

## 4.6 वक्ररेषा

लहान मुलांनी पेन्सील ने काढलेले चित्र तुम्ही कधी पाहीलेत का ? येथे तशी काही उदा. आहेत.




हे सर्व वक्र रेषेची उदाहरणे आहेत.

आकृती (i) आणि (ii) चे निरीक्षण करा. त्यात काय फरक आहे ?

आकृती (ii) ला बंदीस्त वक्र रेषा आणि आकृती (i) ला उघडलेली वक्ररेषा म्हणतात.

(iii) आणि (vii) वक्र रेषा स्वत:एकमेकाला छेदतात ज्या बंदीस्त वक्र रेषा आहेत.त्या ऐवजी (i), (ii), (iv), (v), (vi) वक्ररेषा एकमेकाला छेदत नाहीत ज्या उघड्या आणि बंदीस्त आहेत. जर एखादी वक्ररेषा स्वत: ला छेदत नसेल तर त्याला साधी वक्र रेषा म्हणतात.

दैनंदीन भाषेत,सरळ रेषेसाठी वक्र हा शब्द वापरत नाहीत पण गणितात सरळ रेषासुद्धा वक्ररेषा असते..

### विचार करा, चर्चा करा आणि लिहा.

1. खालील इंग्रजी अक्षरावर तुम्ही पेन्सील ने गिरवा आणि उघडी आकृती व बंद आकृती ओळखा.






2. कोणते अक्षर साध्या वक्र रेषेचे उदाहरण आहेत ते सांगा.

### प्रयत्न करा



खालील मध्ये कोणती साधी वक्ररेषा आहे आणि कोणती नाही ओळखा ?



### बहुभुजाकृती

खालील आकृत्यांना पाहा:




SCERT TELANGANA

तुम्ही त्या आकृती बाबतीत काय म्हणु शकता ? त्या सर्व बंदीस्त आहेत काय ? एकमेकापासुन दुसरी आकृती कशी वेगळी आहे ? ( v ) वी आकृती ( i ), ( ii ), ( iii ) आणि ( iv ) आकृती पासुन वेगळी आहे.कारण ते सर्व पुर्ण रेषाखंडांनी तयार झालेली आहे.त यांना **बहुभुजाकृती** (Polygons) म्हणतात.

जर एखादी आकृती निश्चीत संख्येच्या रेषाखंडांनी तयार झालेली असेल तर तीला बहुभुजाकृती म्हणतात. वेगवेगळ्या आकाराच्या दहा बहुभुजाकृती काढा.




बगीच्याची हद्द भींत त्याला तीन भागात विभागाते. म्हणजेच बगीचाच्या आतमधील जागा. हद्द भींत आणि बाहेरची जागा तुम्ही हद्दीला पार केल्या शिवाय बगीचाच्या आतमध्ये प्रवेश करु शकत नाही.

जसे एक बंदीस्त आकृतीत तीन भागामध्ये विभागले जाते.

i. आकृतीच्या आतमधील (inside) जागा

ii. आकृतीची हद्द

iii. आकृती ( out side ) बाहेरची जागा

आकृतीची हद्द आणि आतमधील ( inside ) जागेला **प्रांत** म्हणतात.

## अभ्यास - 4.2

1. साध्या वक्ररेषा आकृतीवर खुण करा.




2. कोणती वक्ररेषा बंदीस्त आहे आणि कोणते उघडी आहे ते सांगा.




3. आकृतीच्या आतील,हद्दीवरील आणि बाहेरील बिंदुंची नावे सांगा.




4. तीन साधे बंदीस्त आकृती काढा:

i. फक्त सरळ रेषाने

ii. वक्ररेषा आणि सरळ रेषा दोन्हीने

SCERT TELANGANA

## 4.7 कोन

आकृत्यांचे निरीक्षण करा.




आकृती - 1



आकृती - 2



आकृती - 3

जेंव्हा कोपरा तयार होतो तेंव्हा कोन तयार होतो. आकृती - 1मध्ये कल्पना करा की,किरण $\overline{OA}$ आणि किरण $\overline{OB}$ .आहे.ह्या दोन्ही किरणाला सामाइक बिंदु O आहे.येथे असे म्हणता येते की,दोन किरण पासुन कोन बनलेला आहे.

दरवाजाकडे पाहा.जेंव्हा दार बंद राहते,तेंव्हा त्याच्या चौकटीवर कोणताही कोन दिसत नाही.पण जसे आपण दार उघडायला सुरुवात करतो,आपल्याला दार आणि चौकटीमध्ये कोन दिसते.जर दाराची स्थिती बदलली तर आपल्याला यामध्ये पुन्हा बदल दिसते.येथे किरणाची कल्पना दार आणि चौकटीच्या दिशेला केलेली आहे.




घड्याळात वेगवेगळ्या वेळेला दोन काट्यामध्ये कोन कसे तयार होते,याचे निरीक्षण करा.




कोन दोन किरणांनी तयार होतो.आणि त्यांना त्या कोनाचे बाजु किंवा भुजा म्हणतात.सामाइक अंत्यबिंदुला त्या कोणाचे शिरोबिंदु म्हणतात.

येथे दोन किरण $\overline{OA}$ आणि $\overline{OB}$ कोनाची **भुजा** किंवा बाजु आहेत.आणि O हा कोनाचा **शिरोबिंदु** आहे. 'O', येथे कोन तयार झालेला आहे.याला आपण कोन AOB किंवा कोन BOA म्हणुन वाचतो.आणि याला $\angle AOB$ किंवा $\angle BOA$म्हणुन दर्शवितात.(केंव्हा-केंव्हा $\widehat{AOB}$ किंवा $\widehat{BOA}$ ) नुसते $\angle O$ म्हणुन दर्शविते.




आकृतीमध्ये बिंदु X हा त्या कोनाच्या आतमध्ये आहे. Z आतमध्ये नाही.आहे,तो कोनाच्या बाहेरच्या भागात आहे. $\angle PQR$ च्या बाजुवर बिंदु S आहे.

म्हणुन एका कोन प्रतलला तीन भागात विभागते.म्हणजेच आतील,बाजुवर आणि बाहेरील भागात.

आता Y. बिंदु बाबत विचार करा ?

जर तुम्ही किरण QP आणि QR ला अजुन वाढविली तर बिंदु Y या कोनाच्या आतील भागात येते का.

जर किरणाला अजुन वाढविले तर बिंदु M कोनाच्या आतील भागात येऊ शकते का ?



### अभ्यास - 4.3

1. आकृती वरुन कोनाचे शिरोबिंदु,बाजु आणि कोनाचे नाव लिहा.

| | i | ii | iii | iv | v |
|---|---|---|---|---|---|
| कोन | $\angle AOB$ | | | | |
| शिरोबिंदु | O | | | | |
| बाजु | $\overline{OA}$ , $\overline{OB}$ | | | | |




SCERT TELANGANA

2. आकृतीमध्ये तयार झालेल्या कोनाचे नाव लिहा.







3. खाली दिलेल्या तिन्ही अटी पुर्ण होईल असे बिंदु आकृतीमध्ये स्थापा.

(i) A, B मध्ये आतील भागात ∠DOF

(ii) ∠EOF मध्ये बाहेरील भागात A आणि C

(iii) ∠DOE वर B

4. आकृतीमध्ये तयार झालेले कोन स्थापा.



## 4.8 वक्ररेषा

### हे करा



आगपेटीच्या काही काड्या घ्या आणि साध्या बंदीस्त आकृत्या बनविण्याचा प्रयत्न करा.



किती कमी काड्यामध्ये साधी बंदीस्त आकृती तयार झाली ? तीन काड्या मध्ये,दोन काड्या बंदीस्त आकृती का बनवु शकत नाही याचे स्पष्टीकरण देवु शकता का ?

तीन रेषा खंडा पासुन बनलेल्या साध्या बंदीस्त आकृतीला त्रिकोन असे म्हणतात




$\overline{AB}$ , $\overline{BC}$ आणि $\overline{CA}$. या तीन रेषाखंडाने बनलेल्या त्रिकोना कडे पाहा येथे A, B, C ला Δत्रिकोण A, B, C चे शिरोबिंदु म्हणतात तुम्हाला माहीत आहे की शिरोबिंदु पासुन ∠BAC, ∠ABC, ∠ACB बनतात त्रिकोण ABC ला ΔABC दर्शवितात




बहुभजाकृती असल्यामुळे त्रिकोणाला बाहेरील आणि आतील भाग असते.

आकृतीमध्ये त्रिकोणाला आणि तिथे स्थापलेल्या बिंदुचे निरीक्षण करा त्रिकोणाच्या आतील भागात O आहे त्रिकोणाच्या आतील भागात अजुन कोणते बिंदु आहेत ?

SCERT TELANGANA

P हा बिंदु त्रिकोणावर आहे त्रिकोणाच्या हद्दी वर (बाजु वर) असलेल्या अजुन बिंदुचे नाव सांगा.

त्रिकोणाच्या बाहेरील भागात T तर अजुन कोणते बिंदु बाहेरील भागात आहेत ?

म्हणान त्रिकोण तीन भागात विभागल्या जाते.

(i) त्रिकोणाचा आतील भाग (ii) त्रिकोणाची हद्द (iii) त्रिकोणाचा बाहेरील भाग.

त्रिकोणाचा आतील भाग आणि हद्द मिळुन तयार झालेल्या भागाला त्रिकोणाचा प्रांत म्हणतात.

## हे करा



वेगवेगळ्या आकाराचे स्ट्रॉचे तुकडे घ्या कोणत्याही 3 तुकड्यामध्ये दोरी घालुन वेगवेगळे त्रिकोण तयार करा.तुमच्या वही वर त्रिकोणाच्या आकृत्या काढा.

## 4.9 चौकोण




बाजुच्या आकृतीमध्ये बहुभुजाकृतीचे निरीक्षण करा.तुम्हाला माहीत आहे की,तीन बाजुने तयार झालेली,बहुजाकृती म्हणजे त्रिकोण होय.जसे,आकृती (i) त्याच प्रमाणे,चार बाजुंनी तयार झालेल्या साध्या बंदीस्त बंदीस्त बदुभुजाकृतीला चौकोण म्हणतात.आकृती (ii) हे चौकोणाचे उदाहरण होय.




येथे ABCD हा एक चौकोण आहे आणि $\overline{AB}$, $\overline{BC}$, $\overline{CD}$ आणि $\overline{AD}$ या चार रेषाखंडांना जोडणाऱ्या त्याच्या बाजु म्हणतात. $\angle A$, $\angle B$, $\angle C$ आणि $\angle D$ हे त्याचे चार कोन आहेत.आणि विरुद्ध शिरोबिंदु A,C आणि B,D यांना जोडणाऱ्या $\overline{AC}$ आणि $\overline{BD}$ रेषाखंडाला त्याचे दोन कर्ण म्हणतात.




त्रिकोणाप्रमाणे,चौकोण सुद्धा प्रतकाला तीन भागात विभागते.जसे,बाहेरील,आतील भाग आणि हद्द चौकोणाच्या आकाराचा भाग हा त्याचा आतिल आणि आकारात नसलेला भाग हा त्याचा बाहेरील भाग आहे.

$\overline{AB}$ ची विरुद्ध बाजु $\overline{DC}$ आहे.

तर $\overline{BC}$, $\overline{CD}$ आणि $\overline{AD}$ ची विरुद्ध बाजु कोणती आहे ?

$\overline{BC}$ आणि $\overline{AD}$ ची लगतची बाजु $\overline{AB}$ आहे.

$\overline{BC}$, $\overline{CD}$ आणि $\overline{AD}$ च्या लगतची बाजु कोणत्या आहे ?

$\angle A$ चा विरुद्ध कोन $\angle C$ आहे.

तर विरुद्ध कोनाची अजुन दुसरी कोणती जोडी आहे ?

$\angle A$ हा $\angle B$ आणि $\angle D$ चा लगतचा कोन आहे.

अजुन लगतच्या कोनाच्या जोड्या कोणत्या आहेत.

## विचार करा, चर्चा करा आणि लिहा




A, B, C ला D असे चार बिंदु घ्या ते असे घ्या की, A, B, C एका रेषेत यायला पाहीजे.पण D त्या रेषेवर नसायला पाहीजे. $\overline{AB}$, $\overline{BC}$, $\overline{CD}$ आणि $\overline{AD}$ हे चार रेषाखंड मिळुन चौकोन तयार होऊ शकतो का ? कारण द्या.

SCERT TELANGANA

## अभ्यास - 4.4

1. A, B, C असे D असे चार बिंदु घ्या.चौकोन तयार होईल असे त्यांना जोडा.त्यांना नावे द्या.
2. PQRS हा एक चौकोन आहे.




   i. QR ची विरुद्ध बाजु ___________.
   ii. ∠P ची विरुद्ध बाजू ___________.
   iii. PQ ची लगत बाजू ___________.
   iv. ∠S चे लगत कोन ___________.
3. आकृतीत दाखविलेल्या बिंदुंची नावे सांगा.




   i. चौकोनाच्या आतील भागात असलेले बिंदु.
   ii. चौकोनाच्या हद्दीवर असलेले बिंदु.
   iii. चौकोनाच्या बाहेरील भागात असलेले बिंदु..

## 4.10 वक्ररेषा

खालील आकृत्याकडे पाहा.



कागदावर बांगडी ठेवा. आणि पेन्सील ने त्या भोवती त्याची हद्द काढा.तुम्हाला गोलाकार आकृती मिळते.हे तुम्हाला वर्तुळाची संकल्पना देते.अश्या गोलाकार आकृत्यांना वर्तुळ म्हणतात.दैनंदीन व्यवहारातील अजुन काही उदाहरणाची तुम्ही विचार करु शकता का ?




साईकलच्या चाकाचे निरीक्षण करा आणि त्याच्या प्रत्येक आरीच्या लांबीच मापन करा.तुम्ही या निष्कर्षावर येता की,त्याची प्रत्येक आरीची लांबी सारखी आहे.मध्य भागातील बिंदु हा त्याचा **केंद्र** आहे,आणि त्याच्या वक्रकडेला **परीघ** म्हणतात. आणि केंद्रापासुन परिघाच्या कोणत्याही बिंदुपर्यंतच्या अंतराला **त्रिज्या** म्हणतात.दिलेल्या आकृतीमध्ये,प्रत्येक वर्तुळातील केंद्र आणि त्रिज्येचे निरिक्षण करा.

सर्व त्रिज्या सारख्या आहेत का ? वर्तुळाचा केंद्र O आहे आणि $\overline{OA}$, $\overline{OB}$ आणि $\overline{OC}$ त्रिज्या आहेत. कागदावर एक वर्तुळ काढा आणि त्याच्या कडेने त्याला कापा.त्याला अर्ध्यामध्ये घडी करा आणि खाली दाखविल्याप्रमाणे पुन्हा त्याचे एक चतुर्थांश भागात घडी करा.



मध्य भागातील बिंदुंचे तुम्ही निरीक्षण करा,त्याला O असे नाव द्या.हे वर्तुळाचे केंद्र आहे.अजुन तुम्ही त्याच्या त्रिज्या पण दाखवु शकता.

एका वर्तुळात तुम्ही किती त्रिज्या काढु शकता ?

SCERT TELANGANA

वर्तुळातील दोन बिंदुना जोडणारा $\overline{AC}$ एक रेषाखंड आहे.




परिघ वरील दोन बिंदुना जोडणारे अजुन काही रेषाखंड आहेत का ? CD हा एक तसाच प्रकारचा रेषाखंड आहे.वर्तुळाच्या परिघा वरील दोन बिंदुना जोडणाऱ्या रेषाखंडाला जीवा म्हणतात.जसे, $\overline{CD}$ आणि $\overline{AC}$ हे वर्तुळाच्या जीवा आहेत.जसे $\overline{AC}$ हे विशेष जीवा आहे ते केंद्र 'O' जात आहे. जी जीवा वर्तुळाच्या केंद्रातुन जाते त्याला व्यास म्हणतात.

**हे करा**

एक वर्तुळ काढुन त्यामध्ये कमीत कमी 5 जीवा काढा.खाली करुन घ्या त्यामध्ये एक जीवा केंद्रतुन जायला पाहीजे.त्यांना नावे द्या आणि तक्ता भरा.

| क्र.सं | जीवा | लांबी | केंद्रातुन जात आहे/नाही |
|---|---|---|---|
| 1. | | | |
| 2. | | | |
| 3. | | | |
| 4. | | | |
| 5. | | | |

तुमच्या काय लक्षात आले ?

तुमच्या लक्षात आले असेल की,केंद्रातुन जाणारी जीवा सर्वात लांब आहे.आधीच्या आकृतीकडे जाऊ. O मध्य बिंदु असलेला $\overline{AC}$ हा रेषाखंड आहे.

तसेच,आपल्याला माहीत आहे की, $\overline{OA}$ आणि $\overline{OC}$ ह्या वर्तुळाच्या दोन त्रिज्या आहेत.आपण असे पाहु शकतो की, $\overline{OA}$ ची लांबी + $\overline{OC}$ ची लांबी = $\overline{AC}$ ची लांबी

**म्हणजेच खऱ्या अर्थाने,वर्तुळाची व्यास हे त्रिज्याचे दुप्पट आहे**.

## विचार करा, चर्चा करा

एका वर्तुळात एकापेक्षा जास्त व्यास काढणे शक्य आहे का,सर्व व्यासाची लांबी एक सारखी असते का ?

तुमच्या मित्रासोबत चर्चा करा आणि उत्तर माहीत करा.



पुन्हा त्या आकृतीला पाहा.वर्तुळाच्या C आणि D बिंदुमधील भागाला **कंस** म्हणतात.आणि त्याला $\overset{\frown}{CD}$. म्हणुन दर्शवितात.आकृतीमधील इतर कंसाला नावे द्या.




साध्या बंदीस्त आकृतीप्रमाणे वर्तुळ,प्रतलाला तीन भागात विभागतो.जसे आतील भाग,बाहेरील भाग आणि हद्द.

वर्तुळाचा आतील भाग आणि हद्दला मिळुन तयार झालेल्या प्रांताला **वर्तुळाकार प्रांत** म्हणतात.




SCERT TELANGANA

**वर्तुळाचे इतर काही भाग**

वर्तुळाचा कंस आणि वर्तुळाच्या 2 त्रिज्याने व्यापलेल्या प्रांताला त्या वर्तुळाचा द्वैत्रिज्याखंड म्हणतात. वर्तुळाचा कंस आणि जीवाने व्यापलेल्या प्रांताला त्या वर्तुळाचा वर्तुळखंड म्हणतात.जीवा वर्तुळखंडाला दोन विभागात विभागते.

वर्तुळाचा कंस आणि व्यासने व्यापलेल्या प्रांताला **अर्धवर्तुळाकार प्रांत** म्हणतात.










## अभ्यास - 4.5

1. एक वर्तुळ काढुन त्याच्या केंद्राला, त्रिज्याला,व्यासाला आणि कंसाला नाव द्या.

2. वर्तुळातील प्रांताला रंगवा.

   i. द्वैत्रिज्याखंडाला लाल रंगाने

   ii. लहान वर्तुळखंडाला पिवळ्या रंगाने




3. 'सत्य' किंवा 'असत्य' ते लिहा.

   i. एका वर्तुळात आपण एकच केंद्र दाखवु शकतो. ( )

   ii. व्यास हे त्रिज्याचे दुप्पट असते. ( )

   iii. कंस हा वर्तुळाचा एक भाग आहे. ( )

   iv. सर्व जीवाची लांबी एक सारखी असते. ( )

   v. सर्व त्रिज्याची लांबी एक सारखी असते. ( )

4. वर्तुळाकार कागदाचा तुकडा घ्या. त्याला अर्ध्यामध्ये घडी करा.त्या घडीला दाबा आणि उघडा करा,तुम्हाला व्यासाची दुमड मिळते का ? घडी बदलुन पुन्हा त्याच प्रकारची प्रक्रिया करा.तुम्ही किती व्यासाचे निरीक्षण करता ? जास्तीत जास्त किती व्यास तयार होऊ शकतात ?

## आपण काय चर्चा केली ?

1. एक बिंदु एका स्थानाला ठरवितो. हे साधारणपणे इंग्रजीच्या मोठ्या अक्षराने दर्शवितात.
2. दोन बिंदुना जोडल्यानंतर रेषाखंड तयार होतो.याची लांबी मर्यादीत असते.
3. रेषाखंडाच्या दोन्ही बाजुला अमर्यादीत वाढविले असता आपल्याला रेषा मिळते.
4. किरण हे एक रेषेचे भाग आहे.ते एका बिंदुपासुन सुरुवात होते आणि एका दिशेला अमर्यादीत जाते.
5. पेन्सील न उचलता काढलेल्या आकृतीला वक्ररेषा म्हणतात.यानुसार,रेषासुध्दा एक वक्ररेषा आहे.
6. जे स्वतः एकमेकाला छेदत नाही त्यांना साधी वक्ररेषा म्हणतात.

SCERT TELANGANA

7. उघडलेल्या आणि बंदीस्त अश्या दोन पद्धतीचे वक्ररेषा असतात.

8. सामाईक अंत्यबिंदु पासुन दोन किरणांची सुरुवात होऊन तिथे कोन तयार होतो.सामाईक अंत्यबिंदुला त्या कोनाच्या शिरोबिंदुला आणि त्या दोन किरणाला त्या कोनाच्या बाजु किंवा भुजा म्हणतात.

9. प्रत्येक कोन प्रतलला त्या कोनाच्या तीन भागात विभागते.जसे - आतील भाग,बाहेरील भाग आणि त्या कोनाची हद्द.

10. तीन रेषाखंडापासुन तयार झालेल्या बंदीस्त आकृतीला त्रिकोण म्हणतात.

11. त्रिकोणाला तीन शिरोबिंदु,तीन बाजु, आणि तीन कोन असतात.

12. त्रिकोणाची हद्द आणि त्याची आतील भाग मिळुन त्रिभुजीय प्रांत बनते.

13. चार रेषाखंडापासुन तयार झालेल्या बंदीस्त आकृतीला चौकोण म्हणतात.

14. वर्तुळ हे एक साधी बंदीस्त आकृती आहे. जिथे त्याच्या हद्दीवरचा प्रत्येक बिंदु त्याच्या केंद्रापासुन समान अंतरावर असते.ह्या अंतराला त्रिज्या म्हणतात.

15. कंस हा वर्तुळाचा एक भाग आहे,आणि वर्तुळाच्या एकुण लांबीला त्याचा परिघ म्हणतात.

16. वर्तुळा वरच्या कोणत्याही दोन बिंदुला जोडणाऱ्या रेषाखंडाला त्या वर्तुळाची जीवा म्हणतात. व्यास सुद्धा एक जीवा आहे.

17. वर्तुळाचे व्यास हे त्रिज्याचे दुप्पट आहे.

18. वर्तुळाची हद्द आणि त्याचा आतील भाग मिळुन वर्तुळाकार प्रांत बनते.

19. वर्तुळाचा कंस आणि वर्तुळाच्या 2 त्रिज्या ने व्यापलेल्या प्रांताला त्या वर्तुळाचा द्वैत्रिज्याखंड म्हणतात.

20. वर्तुळाचा कंस आणि वर्तुळाची जीवा ने व्यापलेल्या प्रांताला त्या वर्तुळाचा वर्तुळखंड म्हणतात.

21. अर्धवर्तुळ हे वर्तुळाखंड आणि तसेच द्वैत्रिज्याखंड आहे,हे वर्तुळाचे अर्धे असते.प्रत्येक व्यास वर्तुळाला दोन अर्धवर्तुळामध्ये विभागते.

*युक्लीज (ग्रीक)*

*इ.स.पुर्व 365*

*ते एक प्रसिद्ध तत्वज्ञानी आणि गणितज्ञ आहे.त्याने भुमितीला तार्कीक क्रमामध्ये परीचय करुन दिला.ते इलिमेंटस या पुस्तकात ग्रंथीत केलेला आहे. त्यांच्या भूमीतीला युक्लीडीयन भूमीती म्हणुन ओळखल्या जाते.*





SCERT TELANGANA

# रेषा आणि कोणांचे मापण

## 5.1 परिचय

मुलभुत भुमीतीय आकरामध्ये आपण काही भुमीतीय आकराबद्दल शिकलो आहे. या अंतर्गत रेषा कोण,त्रिकोण,चौकोण आणि वर्तुळ येतात. या पैकी आकृत्या बऱ्याच रेषा खंडाने बनतात. त्या व्दारे कोण बनतात व वेगवेगळया आकाराच्या रेषा आणि कोण आपण पाहु शकतो. नेहमी रेषा खंडाची लांबी कोणाचे मापण पाहुन करु शकतो. हे नेहमी शक्य नसते



आकृती 5.1

काही वेळा मापन खुपच कमी अंतराचे करायचे असते. त्या करीता एका निश्चीत उपकरनाची गरज भासते.

## 5.2 रेषा खंडाचे मापण -

पुस्तकाच्या बाजू टि. वी. ची, विटाची बाजु इत्यादी रेषाखंड आहेत.

आपण बरेचसे रेषा खंड काढले आणि पाहिले देखील. आपणास माहित आहे कि त्रिकोण तिन रेषाखंडाने आणि चौकोण चार रेषाखंडाने बनतात.रेषा खंड एका रेषाचाच एक भाग असुन त्यांना दोन शेवटचे बिदु असतात.रेषाखंडाचे माप करण्यासाठी हे त्यांना उपयोगी ठरते. हे जे मोजमापण करते ते त्याची लांबी असते.रेषाखंडाची तुलना करण्यासाठी आपण लांबीचा वापर करतो. आपण दोन रेषा खंडाच्या लांबीची तुलणा करु शकतो. a) साधारण निरीक्षण. b) कागदावर काढुण तुलना करु शकतो. c)उपकरणाचा वापर करुण $\overline{AB}$ आणि $\overline{CD}$ रेषा खंड 5.2 चित्रात सामान्य निरीक्षणाने तुलना करुशकतो. त्यातील




आकृती 5.2




लांबरेषाखंड कोणते आहेत ओळखु शकता का.? $\overline{AB}$ हि $\overline{CD}$ पेक्षा निश्चितच लांब आहे.परंतु 5.3. चित्रात PQ आणि RS दोन रेषा खंडाच्या लांबीची तुलना करने हे कठिन आहे.?




आकृती 5.3

SCERT TELANGANA

## विचार करा आणि चर्चा करा

आपण त्यांची कशी तुलना करु शकतो ?

यांची तुलना करण्यासाठी आपण एक रेषा खंड कागदावर $\overline{AB}$ आणि $\overline{CD}$ एका कागदावर काढतो जेने करुन ते दोन्ही एकाच दिशेत असतील. आपण आता असे म्हणु $\overline{AB}$ हि $\overline{CD}$ पेक्षा लांब आहे अशाच प्रकारे आपण $\overline{PQ}$ ला सोबत तुलना करु. आपल्याला दिसेल कि $\overline{PQ}$ आणि $\overline{RS}$ ची लांबी समान आहे.

### 5.2.1 उपकरणाव्दारे तुलना करने

कोणत्याही दोन रेषा खंडाची अचुक तुलना करण्यासाठी आपणास योग्य त्या उपरकरणाची गरज आहे या अंतर्गत स्केल पट्टी आणि. दुभाजक (Divider) तुम्ही असे उपकरण कधी पाहिले आणि वापरले आहे काय

याकडे काळजी पुर्वक पहा.?




**स्केल पट्टी**



**दुभाजक**

एक स्केल पट्टि 15 समान मोठया भागात विभाजीत करुन त्यांची नोंद एका बाजुला केली आहे या प्रत्येक भागाची लांबी 1 सेंटी मिटर आहे. (1 *cm.*) पुन्हा सें.मि.ला 10 समान भागात विभाजित केले आहे आणि प्रत्येक उप भागास 1 मिली मीटर मध्ये विभागलं आहे

चला पाहु कि एक रेषाखंडाची लांबी. स्केल पट्टीचा वापर करुन असा केला जातो .




स्केल पट्टिचा शुन्य हा A ठिकाणी बिंदुच्या ठिकाणी घ्या. B पर्यंतची खुन हि AB एक रेषाखंडाची लांबी होय. येथे AB ची लांबी = 4.5 सेंटीं.मीटर.. म्हणजेच AB = 4.5 सेंटीं.मीटर

जर आपण A खुन (cm) स्केल पट्टिच्या 1 वर घेतल्यास B पर्यंतची लांबी 5.5 सें.मि होते.आपणास दोन्ही बिंदुंना वाचावे लागते आणि फरक हा त्याची लांबी दाखविते.

म्हणजेच 5.5 - 1 = 4.5 सेंटीं.मीटर

## विचार चर्चा आणि लिहा.




तुम्ही रेषाखंडाची लांबी माहित करतांना आणखी कोणत्या चुका काढू शकता ?

जसे- पेन्सीलची लांबी काढने चित्रात दाखविल्या प्रमाने डोळा योग्य ठिकाणी ठेऊन दोन बिंदुच्यावर लंब ठेवुन माहित करावे. रेषा नाही

SCERT TELANGANA

तर कोणीय दृष्टी कोणामुळे चुका होवु शकतात.




हा प्रश्न सोडविण्यासाठी दुभाजकाचा वापर करणे चांगले असते ?
अचुक मापण करण्यासाठी दुभाजकाचा वापर करा .

आकृती 5.1

दुभाजकाला उघडुन त्याचे एक टोक A बिंदुवर ठेवा आणि दुसरे टोक B बिंदुवर ठेवा. दुभाजकाला सावधपणे अडथळा न होऊ देता उचला स्केल पट्टिवर ठेवा त्याच्यावर केलेली नोंद वाचा.
AB रेषाखंडाची लांबी काय आहे ? जास्त रेषाखंड घ्या आणि त्याची लांबी मोजा.

## प्रयत्न करा



1. एक एक पत्र घ्या स्केल पट्टी आणि दुभाजकाच्या मदतीने त्याची लांबी आणि रुंदि मोजा सर्व अक पत्राचे आकारमान समान आहेत का?
2. कोणत्याही तिन वस्तुची निवड करा. जसे- खोडरबर,लहान पेन्सील, इत्यादी ची लांबी एका कागदावर गिरवा हया रेषाखंडाच्या लांबीचे मापण करा. .



## प्रश्न संग्रह- 5.1

1 तुमच्या वर्गात पाहिलेल्या कोणत्याही पाचं रेषाखंडाचे उदाहरण घ्या.
2. स्केल पट्टीपेक्षा दुभाजक वापरने का योग्य आहे ? जेव्हा आपण दोन रेषा खंडाची लांबी मोजतो ?
3. खालिल दिलेल्या चित्रातिल सर्व रेषाचे मापन करां. त्यांना लांबीच्या उतरत्या क्रमात लिहा.




**रेषाखंड** $\overline{AB}$ $\overline{AC}$ $\overline{AD}$ $\overline{AE}$ $\overline{BC}$ $\overline{BD}$ $\overline{BE}$ $\overline{CD}$ $\overline{CE}$ $\overline{DE}$

4. $\overline{AB}$ चा मध्यबिदु स्वेता आणि रेषमाव्दारे खालिल प्रकारे मांडला आहे.

स्वेता





रेषमा

स्वेता तुम्हाला कोणते बरोबर वाटते ? $\overline{AC}$, $\overline{CB}$ स्वेता लांबी काढा. तपासुन पहा .

5. दिलेल्या प्रत्येक चित्रात बरेचशा रेषाखंड आहेत. एका कपाटाची एक बाजु लांब दाखविली आहे सर्व चित्रातील बाजुंना ओळखा आणि नोंद करुन लिहा.



SCERT TELANGANA

## 5.3 कोणाचे माप

आपण आपल्या भोवताली नेहमी अणेक प्रकारचे कोन पाहतो.







आपनास माहित आहे कि एका कातराचि पट्टी जेव्हा दुर जाते तेव्हा त्यातिल कोन वाढत जातो. दोन किरना मध्ये किवा दोन रेषाखंडामघ्ये कोन निर्माण होतात .काही वस्तुचे उदाहरण द्या.ज्यामध्ये आपन कोन पाहु शकतो.

**कृत्य**

खालिल चित्र पहा .




तुमचे हात कमरेजवळ ठेवा. एक हात पुर्व स्थितीत ठेवा आणि दुसरा हात हळु हळु वर करा जेव्हा तुम्ही हात जस जस वर घेवुन जानार तसे तुमचा हात आणि शरीरामधील कोण बदलत जाईल. चला निर्माण झालेले कोन आणि त्यांना काय म्हणतात पाहू या. सुरुवातीस बाजु शरीरासोबत होती जसे तुम्ही हाताची हालचाल केली तसे-तसे कोन वाढत गेला .?

iii चित्रात तुमचा हात शरिराला लंब आहे तुमची बाजु आणि शरीरामध्ये निर्माण झालेला कोन . 90° आहे, त्यास लंब कोन म्हणतात.

ii चित्रात तुमच्या हाताव्दारे आणि शरीराने बनलेला कोन लंब कोनापेक्षा लहान आहे, अशा कोणास लघु कोन म्हणतात.

iv चित्रात निर्माण झालेला कोण लंब कोनापेक्षा अधीक आहे आणि त्या कोणास विशाल कोन असे म्हणतात.

v चित्रात तुमचा हात तुमच्या शरीरा सोबत आहे आणि तयार झालेला कोण 180° आहे .या कोनाला सरळ कोण म्हणतात.

आता ( i ) चित्रात तुम्हाला तुमचा हात आणि शरीरामधील कोन दिसत आहे का? तेथे कसलाही कोन तयार झालेला नाही म्हणुन त्याला आपन शुन्य कोण म्हणतो .हा कोन अंशाचा आहे. शुन्या पासुन हालचाल सुरु केली आहे. चित्राकडे पहा खालची वर आणि वरची खाली दिशा करुन आपण दाखवितो की आपन सुरवातीच्या ठीकाणी आणखी पोहचलो नाही.

SCERT TELANGANA

आता चला घडयाळयामध्ये आणखी काही तयार झालेल्या कोनाचे निरीक्षण करु. 12 वाजता दोन काट्याने तयार झालेला कोन शुन्य अंशाचा असतो.



कोणत्या घडयाळयाच्या बाजु लघु कोन दाखवीत आहेत. कोणत्या चित्रात दोन्ही बाजु विशाल कोन बनवत आहेत. याचे मोजमाप करण्यासाठी आपन तासाचा लहान काटा वापरतो आणि मिनीटाच्या काट्याचे clockwise भ्रमण तासाच्या काट्यापासुन दुर असते.

## कृत्य

दोन शरबत पीण्याच्या पुंगळया घ्या.

एक पुंगळी घेवून एका टाकीवर ठेवा. आणि दुसरे टोक दुसऱ्या पुंगळीच्या एका टोकासोबत टाचणी व्दारे जोडा. तुम्हाला 'L' आकाराची आकृती दिसेल.



आकृती 5.6

5.6 याप्रमाणे काटकोन मापक उपकरण असते. याला 5.7 आकृतीप्रमाणे $\overline{OA}$ च्या एकरुप होणाऱ्या बिंदुवर ठेवल्यास असे दिसुन $\angle AOB$ हा काटकोनापेक्षा लहान आहे. यास लघुकोण असे म्हणतात.




आकृती 5.7

5.8. काटकोन मापक $\overline{OC}$ या किरणावर चित्राच्या बिंदु सोबत एकरुप होत आहे. इथे $\angle COD$हा काटकोनापेक्षा मोठा आहे म्हणुन त्यास विशालकोन म्हणतात .




आकृती 5.8

## प्रयत्न करा



1. कोणीय पुंगळी उपकरणाचा वापर करुन खालिल कोण माहितकरा



(i) (ii) (iii) (iv)

2. तुम्हाला लघुकोण आणि विशालकोन आढळुन येईल अशा दैनंदिन जिवणातील घटनेचे पाच उदाहरण द्या.

3. तुमच्या आवडीचे काही कोन काढा व काटकोन मापकाचा वापर करुन विशालकोन आणि लघु कोन ओळखा.

सत्या आणि स्वेताला कोण OA किरण देण्यात आले आणि 45° कोण काढण्यास सांगितल ते

SCERT TELANGANA

त्यांनी अशाप्रकारे काढले .




सत्या (∠AOB = 45°)




स्वेता (∠AOB = 45°)

सत्याने आणि स्वेताने काढलेल्या कोनातील फरक काय आहे ?

सत्याने काढलेला कोन OA ला विरुध्द दिशेने फिरतो. त्यांना एंटीक्लाक वाईज एंगल (Anti Clockwise angle) म्हणतात. या कोनास ऋण मापणाने दर्शवितात. म्हणुण सत्याचे कोण - 45° आहे स्वेताने बनविलेला कोण OA हे घडयाळयाच्या काटयाच्या दिशेत फिरतो. त्या कोनांला क्लाक वाईज एंगल (Clockwise Angle) म्हणतात.त्यांना घन मापणांने दर्शवितात. स्वेताने बनलेला कोन 45°

## विचार चर्चा करा आणि लिहा .

बाजुच्या चित्रात ∠AOB आणि ∠AOC हे दिले आहेत कोणता कोन एंटीक्लाकवाईज आहे आणि कोणता कोण क्लाक वाईजआहे विचार करा आणि मित्रासोबत चर्चा करा .




## कृती करा

1. बांगडयाचा वापर करुन वर्तुळाकार कागद कापुन घ्या .
2. त्याला मध्यभागातुन बंद करा तुम्हाला अर्धवर्तुळ मिळेल.
3. पुन्हा एकदा अर्ध करा तुम्हाला एक चतुर्थांश भाग येईल .
4. दबलेला भाग 90° चा त्याच्या एका कोणात येईल त्याला 90° म्हणुन खुन करा ..
5. त्या चतुर्थ भागला पुन्हा एकदा अर्ध करा. तुम्हाला 45° चा कोण दिसेल.




6. आता त्याला उघडा. नविन रेषा पर्यंतचा कोण किती ? 45° कोण म्हणुन सुरवातिला रेषा आणि चलनरेषातिल तयार झालेला कोण किती आहे?

SCERT TELANGANA

7. 90° च्या दुसऱ्या बाजुस दुभागल्याचे मापन करा .

ते 90° + 45° = 135° असे राहु शकते .







8. 45° पर्यंत त्याला परत दुभागले असता त्याचे पुन्हा अर्धे करें सुरुवातिच्या रेषेच्या डाव्या हाजुला असलेला दुभाग 45° चा अर्धा होतो 22½°. 135° च्या डाव्या बाजुचा कोण 157½° होतो .

तुम्हाला कोनाचे मापन करन्यासाठी तयार असलेले उपकरन उपलब्ध आहे ते म्हणजे **कोण मापक** होय .

## 3.1 कोण मापन

वेळेवर तयार केलेले लंब कोण परिक्षेत या लंब कोणाचे मापन करण्यासाठी मदत होते परंतु हे निश्चीत अशी तुलना याने करता येत नाही. म्हणुन निश्चीतपणे कोणांचे मापन करण्यासाठी आपणास एका उपकरणाची गरज आहे त्याला **कोनमापक** असे म्हणतात. जर तुम्ही काळजी पुर्वक कोण मापकाकडे पाहिलात तर तुम्हाला असे दिसुन येईल कि तेथे दोन प्रकारचे मापन आहेत. लंब कोन दर्शविणारी रेषा माहित करा. त्याचे मापन 90° राहिल. हि रेषा आडव्या रेषेच्या एकदम लंब असते. दोन्ही बाजुंना दोन प्रकारचे कोण मोजन्यास मदत होते. एक **Clockwise Angle** आणि **Anti-clockwise Angle** या आतील स्केल पट्टी आणि बाहेरील स्केल पट्टी 0° ते 180°मापन असनारे दोन दिशेत असतात. याना 180° समान भाग केले जातात. प्रत्येक भागास (1°). म्हणतात हे भाग वक्र कोनापाशी असलेला आंतर 10°.आहे. दोन्ही बाजुंना शुन्य मधुन जानारी रेषा सुरुवातिच्या रेषेच्या मध्य बिंदुतुन जाते . आपन कोण मोजण्यासाठी कोण मापकास कसे वापरतो.



आता आपन शिकु या.

| Clockwise Angle CW | Steps | Anti-clockwise Angle |
|---|---|---|
|    | 1.कोणता लघु किंवा विशाल कोन आहे ते ओळखा . 2. कोन मापकाचा मध्य बिंदु कोणांच्या निर्देशांक वर ठेवा . 3. कोन मापकाच्या अनुकुल बनविण्यासाठी (निर्देशांक पासुन केंद्र बिंदुला न हलविता ) अशा प्रकारे ठेवा. |    |

SCERT TELANGANA




4. स्केल पट्टीकडे पहा या. ठीकाणी सुरुवातीची रेषा 0° दर्शविते

5. रेषा कोणाचे मापण माहीत करा. जेथे दुसरी बाजु स्केल पटीवर ∠AOB = 50°बनविते




| प्रकार | मापण |
|---|---|
| शुन्य कोण | $0^0$ |
| लंब कोण | $90^0$ |
| सरळ कोण | $180^0$ |
| पुण कोण | $360^0$ |
| लघु कोण | $0^0$ आणि $90^0$ मधील कोण |
| अधीक कोण | $90^0$ आणि $180^0$ मधील कोण |
| परीवर्तीत कोण | $180^0$ आणि $360^0$ मधील कोण |

.

## प्रयत्न करा



1. . कोणता कोन मोठा आहे ? मित्रा सोबत चर्चा करा.




कोनाचे मापण करुन तपासुन पहा. तुमचा अनुमान बरोबर आहे का ? कारणे द्या.

2. कोणता कोन लघुकोन आहे? माहीत करुन त्याचे मापण लिहा?




SCERT TELANGANA

3. कोणते विशाल कोन आहेत .




4. तुमच्या आवडीचे दोन लघु कोन आणि विशाल कोन काढा .

5. खालील कोनांना लघुकोन, विशाल, कोन,आणि सरळ कोनात विभागनी करा.

40°, 140°, 90°, 210°, 44°, 215°, 345°, 125°,
10°, 120°, 89°, 270°, 30°, 115°, 180°

## प्रयत्न करा - 5.2

1. चुक किंवा बरोबर लिहा

   i लंब कोणा पेक्षा लहान कोणाला लघु कोण म्हणतात .

   ii. लंब कोणाचे मापन 90° असते .

   iii. सरळ कोणाचे मापन 180° असते

   iv. 180° मापन पेक्षा अधिक असणाऱ्या कोणास परीवर्तीत कोण म्हणतात.

   v. पुर्ण कोणांचे मापन 360°.असते.

2. दिलेल्या चित्रात कोणते कोन लघु कोन आणि कोणते विशालकोन आहे .? त्याचे मोज मापन करुन अनुमाण लावून त्याचे मापण देखील लिहा.




3. या कोणाचे मापन किती आहे यातील सर्वात मोठा कोन कोणता आहे. सर्वात मोठ्या कोनापेक्षा मोठा कोन काढा.?




∠ABC = .......... ∠DEF = .......... ∠PQR = .........

4. घडयाळ्यात दिलेल्या वेळा नुसार लहान काटा आणि मोठा काट्यामधिल तयार झालेल्या कोणाचे प्रकार लिहा.

   i. सकाळी 9 वाजता .

   ii. सायंकाळी 6 वाजता

   iii. दुपारी 12 वाजता

   iv. दुपारी 4 वाजता

   v. रात्रिचे 8 वाजता

SCERT TELANGANA

5. कोणाचे मापन करुन जोड्या लावा. या सर्वाचे चित्र देखिल काढा .

| गट अ | गट ब |
|---|---|
| लघु कोण | 90° |
| लंब कोण | 270° |
| विशाल कोण | 45° |
| परीवर्तीत कोण | 180° |
| सरळ कोण | 150° |

## 5.4 छेदित रेषा,लंब रेषा आणि समांतर रेषा

### 5.4. छेदित रेषा

खालिल चित्राकडे पहा .







आपन पाहु शकतो कि रस्ते आणि काठी यांना रेषा व्दारे दर्शवितात. चित्रात काढलेल्या रेषा परस्पर दोन्ही छेदत आहेत. या रेषांना एक साधारण बिंदु आहे. दोन वेगवेगळ्या रेषांना किती साधारन बिंदु आहेत.?




**प्रयत्न करा**

1. एका प्रतळात दोन वेगवेगळ्या रेषा काढा. त्या रेषा एकापेक्षा अधिक बिंदुतुन छेदित असतात का.?
2. तिन साधारन बिंदु असलेल्या वेगवेगळ्या रेषा बद्दल विचार करा.तसेच दोन साधारन बिंदु असलेल्या रेषा बद्दल देखील विचार करा.?

दोन वेगवेगळ्या रेषा $l$ आणि $m$ परस्पर एक P बिंदु जवळ मिळतात. आपण म्हणतो कि $l$ आणि $m$ हे P जवळ छेदतात. हाच एक साधारन बिंदु आहे, ज्या ठिकाणी दोन रेषा मिळतात.म्हणुन जर दोन रेषानां एक साधारन बिंदु असेल तर त्यास खंडित रेषा म्हणतात.

**ज्या रेषांना साधारन बिंदु नसतो त्या रेषांबद्दल विचार करा त्या रेषांना आपन काय म्हणु शकतो .**

खंडित होणाऱ्या रेषा कोन बनवितात. खालिल खंडित रेषा पहा. त्या सर्व कोन तयार करतात खालील खंडित रेषांव्दारे तयार होणाऱ्या कोणांना ओळखा.



1.काही कोन विशाल कोन आणि काही लघु कोन आणि काही लंब कोण आहेत .

SCERT TELANGANA

## 2 लंब रेषा

चित्राच्या कोन बाजु मधील तयार होणाऱ्या रेषेचे निरिक्षन करा .



चित्रातिल रेषांची कल्पना करा .

ते काटकोन तयार करतात का.? परस्पर खंडित होतात का ?




**जर दोन रेषा परस्पर एका लंब कोनापासी खंडित होत असतील तर त्यांना लंब रेष असे म्हणतात .**

येथे *l*' रेषा '*m*' रेषाच्या लंब आहे $l \perp$ m. असे आपन लिहितो.

### विचार चर्चा करा आणि लिहा



1. जर $l \perp m$, तर $m \perp l$ असे आपन म्हणु शकतो का ?
2. एकात दिलेल्या रेषेला आपन किती लंब रेषा काढु शकतात ?
3. ईंग्रजीच्या कोणत्या अक्षराव्दारे लंब रुप दर्शवितात ?

### 5.4.3 समांतर रेषा

चित्राचे निरीक्षण करा








चित्रातील स्केल पट्टीची बाजू, रेल ची पट्री विद्युतची तार याची कल्पना करा .ते एकत्र मिळतात का?जर त्याची दिशा न बदलता त्यांना वाढविले. एका तळात जर दोन रेषा परस्पर एका बिंदुत खंडित होत नसतील तर त्यांना **समांतर रेषा** असे म्हणतात. येथे *l* आणि *m* समांतर रेषा आहेत त्याला आपन $l \parallel m$ असे वाचतो .




तुम्ही तुमच्या वर्गात समांतर रेषेचे आणखी काही उदाहरणे शोधु शकता का?

### प्रयत्न करा



खाली दिल्या प्रमाने दोन रेषा एका कागदावर काढा. त्या परसस्पर खंडित होतात का ? तुम्ही त्यांना समांतर रेषा म्हणु शकता का.?



समांतर रेषेची एक जोडी काढा. त्यातील तयार झालेला कोन किती आहे ? विचार करा व ते तुमच्या मित्रा सोबत चर्चा करा .

SCERT TELANGANA

## उदाहरण सग्रह- - 5.3

1. खालील दिलेल्या उदाहरणात कोणते समांतर रेषा, लंब रेषा किंवा या पैकी दोन्ही नाहीत ओळखा.

   i. खिडकीचे उभे गज .

   ii. रेल गाडीची पट्री

   iii. इंग्रजी बाराखडीतील V अक्षर

   iv. काळ्या फळ्याच्या विरुद्ध बाजु .

   v. दरवाज्याच्या लगतच्या बाजु .




2. एका कागदावर चौरसाचा संच काढुन त्यातील लांब बाजुंना खुन करा .

3. ABCD हे आयत आहे . $\overline{AC}$ आणि $\overline{BD}$ हे कर्ण आहेत. समांतर असलेल्या रेषा लंब रेषा आणि खंडित रेषा बाजुच्या चित्राला पाहून चिन्हाचा वापर करुन लिहा .

   a)समांतर रेषा b) लंब रेषा c) खंडित रेषा

## आपन काय चर्चा केली ?

1. आपन दोन रेषा खंडाना साधारन निरीक्षनाव्दारे तुलना करु शकतो. रेषाखंडांना खुन करुन आणि उपकरणाचा वापर करुन .
2. रेषा खंडाची तुलना करण्यासाठी आणि काढण्यासाठी स्केल पट्टी आणि दुभाजक या उपकरणाचा वापर करतो .
3. लांबी मोजन्याचे एकक (1 से.मी. *cm*.).आहेत.
4. 1 सेंटी.मीटर. = 10 मीली मीटर..
5. कोनमापणाचे एकक डिग्री आहे (1°). हे $\frac{1}{360}$ वा प्रदक्षीणाचा भाग आहे .
6. लंब कोनाच(काटकोनाचे) मापण 90° आहे. आणि सरळ क्षेत्राचे मापण 180° आहे .
7. लंब कोनापेक्षा कमी कोनाला लघु कोण असे म्हणतात .
8. लंब कोणापेक्षा जास्त आणि सरळ कोणापेक्षा कमी कोनाला विशाल कोन म्हणतात.
9. **सरळ कोनापेक्षा मोठा पण संपुर्ण कोनापेक्षा लहान असलेल्या कोनास परावर्तीत कोन म्हणतात.**
10. समान प्रतळामध्ये असलेल्या दोन वेगवेगळया रेषांना जर साधारन बिंदु असेल तर अशा रेषांना खंडित रेषा म्हणतात .
11. दोन खंडीत रेषामधील कोण 90° असेल तर त्या रेषांना लंब रेषा म्हणतात. त्या कोनाला लंब कोण म्हणतात .

SCERT TELANGANA

# पुर्णांक

## 6.1 परीचय

रफीकला त्याचे वडील प्रत्येक महीण्याला 100 रुपए खर्चासाठी देतात. ही रक्कम तो आईला देऊन जेव्हा गरज भासते तेव्हा त्यापैकी कांही रक्कम घेतो. आई रफीकला दीलेल्या आणि घेतलेल्याची नोदं ठेवते. रफीकने पहिल्या आठवड्यात 50 रु., दुसऱ्या आठवड्यात 20 रु., तिसऱ्या आठवड्यात 30 रु.,घेतले. शेवटच्या आठवड्यात 20 रुपए त्याला हवे होते. परंतु रफीकच्या आईने सांगीतले की तीने घेतलेले सर्व पैसे वापस दीले. रफी म्हणाला की तो दुसऱ्या महिण्याच्या खर्चाच्या पैशातुन नीयोजन करेल पण त्याला पैशाची गरज आहे. शेवटी आईने स्वीकारले आणि 20 रुपए दीले आणी खालील प्रकारे त्याची नोद के




**पैशाची नोंदणी**

दुसऱ्या महिण्याच्या पहिल्या दीवशी रफीकला 100 रु मिळले .त्याने ते आईला दीले.तर रफीचे कीती पैशे आईकडे जमा आहेत तुम्ही सागु शकाल का?

सांयकाळी त्याच्या काकाने 50 रुपए दीले.त्याने ते पैसे आईला दिले आणी मी पैशाची नोद ठेऊ काय? असे विचारले. रफीकचे त्याच्या आईकडे कीती रुपए आहेत हे तुम्ही सांगू शकाल काय? पुन्हा एकदा नोदणी कडे लक्ष द्या.




दुसऱ्या महीण्याची नोदणी

वरील नोदणीचा वापर करुन खालील प्रश्नाची उत्तर घा

1. प्रत्येक महीण्याला रफीकचे वडील त्याला खर्चा साठी किती पैसे देत होते?
2. रफीकने चार आठवड्यात किती पैसे खर्च केले?
3. चवथ्या आठवड्यात रफिकच्या आईने किती पैसे उधार घेतले ?
4. शेवटच्या आठवड्यात घेतलेल्या पैशाची नोंद तिने कशी केली ?
5. 20 रु.शुन्याच्या उजव्या बाजुस आणि 20 रु शुन्याच्या डाव्या बाजुस गेल्यावर त्यातील फरक काय होतो ?
6. जेव्हा रफीकने 100 रु आणि 50 रु शेवटच्या महीन्यात दिले तेव्हा तिने रेषेच्या कोणत्या बाजुला खुन केली?

SCERT TELANGANA

## 6.2 ऋण संख्याची कशी उत्पती हेते?

तुम्हाला समजले असेल की 20 रु शुन्याच्या दोन्ही बाजुला खुन केल्यास त्याचा अर्थ सारखा नाही शुन्याच्या डाव्या बाजुस असलेली संख्या ऋण आहेत आणि शुन्यापेशा कमी आहेत. शुन्याच्या उजव्या बाजुला असलेल्या संख्या धन असतात. त्या शुन्यापेशा मोठ्या असतात.

ज्या ठिकानी आपण नफा आणी तोटा भुतकाळ आणी भवीष्यकाळ कमी आणि जास्त तपमान अशा बरेचशा घटना आपल्या दैनंदीन जीवनात घडतात. दर्शवीण्यासाठी आपण वरील संख्या वापरतो. शुन्याच्या डाव्या बाजुच्या संख्यांना (शुन्यापेशा लहान) ऋणात्मक संख्या म्हणतात. यांना -1, -2, -3, ....., -10, -20, ... सोप्या पध्दतीने समजण्यासाठी असे दर्शी




आपल्या दैनंदीन जिवनात आपण ऋणात्मक संख्या खालील प्रमाणे वापरतो :

(i) 200 रु.व्यापारात तोटा झाला. यास (-200) असे दर्शवितात. 200 रु. नफ्याला +200 रु असे दर्शवितात.

(ii) शुन्याच्या वरचे तापमान धन आणि 0°c च्या खालच्या तपमानावरुण ऋण जसे 3°c खाली म्हणजे - 3°c आसते

### हे करा



मानसाने रु 50 आणि स्वेताने .20रु त्याच्या आईकडुण उधार घेतले. यास तुम्ही संख्या रेषेवर कशे दर्शवीता समजा त्याच्या वडीलाना. 100रु प्रत्येकी कीरकोळ खर्च करण्या साठी दिले कर्ज मुक्त केल्यावर केणापाशी अधीक पैसे राहतील

## 6.2 ऋण संख्याचे काही उपयोग

तळ स्थायीस शुन्य समजुन खालील प्रशनांना योग्य चीन्हाचा वापर करु या.

1. एक पक्षी 25 मीटर समुद पातळीच्या वर उंच उडत आहे. आणि एक मासा समुद पातळीच्या खाली 2 मीटर खोल आहे.




2. पर्वताच्या शिखरावर 500 मीटर उंच एक झेंडा उभा केला आहे. आणि दुसरा पाण्याच्या तळाच्या खाली 25 मीटर उचं एका पेंडालाच्या वर उभा केला आहे




3. दिल्लीचे एका थंड रात्री तपमाण 5°C .हेते आणि हिमाचल प्रदेशाच्या कुफ्री मध्ये 6°C शुन्याच्या खाली हेते.

SCERT TELANGANA

## विचार चर्चा करा करा आणि लिहा



आपल्या दैनूदिन जिवणात उपभोगात येणारे आणरवी काही नमुने धन आणि ऋण संरव्यावर लिहा. धन, शुन्य आणि ऋण संख्यावर एकत्र मिळुन पुर्णाक संरव्या म्हणतात. त्यांना Z ने दर्शविनात,

$$Z = \{....., -3, -2, -1, 0, 1, 2, 3, ....)$$

## हे प्रयत्न करा



करा आणि त्याला पुर्णाक संख्येचा उपयोग करुन लिहा.

### 6.4. संख्या रेषेवर पुर्णाकास दर्शविने

आता रफीकला समजले त्याची आई संख्यारेषावर पुर्णाकाना कशी दर्शविते.




शुन्याच्या उजव्याबाजुस असलेल्या संख्या धन संरव्या ( नैसर्गीक संरव्या ) आणि शुन्याच्या डाव्या बाजुस असलेल्या संख्या ऋण संरव्या असतात. यास तुम्ही सहमत आहात काय ? त्याचे कारण काय?

आता संख्यारेषेचा वापर करुन खालील चे उत्तर द्या.

1. शुन्याच्या सर्वात जवळ कोणता धन पुर्णाक आहे?
2. शुन्याच्या एका बाजुस किती ऋण संख्या आहेत ?
3. कोणती संख्या मोठी आहे (-2) किवां (-1)?
4. कोणती संख्या मोठी आह 3 किवां -5 ? कारण काय ?
5. कोणती पुर्णाक संख्या धन किवा ऋण नाही ?

## हे करा



-5, 4, -7, -8, -2, 9, 5, -6, 2.



## 6.1. प्रश्न संमुह

1. खालील विधानाना पुर्णाकाचे चिन्ह वापरुन दर्शवा.
   (i) एक विमान 3000 मीटर उंचीवर उडत आहे. ( )
   (ii) 10 मीटर पाण्याच्या पातळी खाली माशी आहे. ( )
   (iii) हेद्राबाद मध्ये 0°c. तपमाणाच्यावर 3.5.°c तपमाण आहे. ( )
   (iv) 0°c तपमाणावर पाणी बर्फ बनते. ( )

SCERT TELANGANA

(v) माऊंट शिखराचे जानेवारी महीण्याचे सरासरी तपमाण -36° C.आहे. ( )

(vi) पानडुबी समुद्र पातळीच्या 500 मिटर खाली आहे. ( )

(vii) दार्जीलींगचे जुलै महिण्याचे किमान सरासरी -19°C.तापमाण आहे. ( )

(viii) विशारवापटनम चे जानेवारी महिण्याचे किमान सरासरी तापमाण 18°C. आहे. ( )

2. कोणतेही पाच ऋण संख्या लिहा.

3. कोणत्याही पाच धन संख्या लिहा.

4. दिलेले पुर्णाक संख्या रेषेवर दर्शवा. -4, 3, 2, 0, -1, 5



5. चुक किवा बरोबर लिहा. जर विधान चुक असेल तर त्याला बरोबर करुन लिहा.

(i) -7 संख्या 6 च्या उजव्या बाजुस आहे. ( )

(ii) शुन्य हे धन संख्या आहे. ( )

(iii) 9 हे शुन्याच्या उजव्या बाजुस आहे . ( )

(iv) -1 पुर्णाक -2 आणि 0 मध्ये असते. ( )

**6.5 पुर्णांकाचा क्रम**

पवन आणि हरीश दोघे मित्र आहेत. त्याना पहाण्यात आले की त्याच्या विहिरीतील पाण्याची पातळी उन्हाळ्यात कमी होते. पावसाळ्यात वाढते. वीहिरीतील पायऱ्याने पातळी दाखविली जाते. त्यानी संख्याचा विचार करुन एक काचेच्या पात्राचा नमुणा तयार केला. त्याच्या पायऱ्या संख्याने दाखविल्या. एक पट्टी काचेच्या पात्रास चिपकविली. शुन्याच्या खाली असलेल्या संख्या -1, -2, -3 आणि शुन्यीच्या वरच्या संख्या 1, 2, 3, इत्यादीने दर्शविल्या. त्यांनी शुन्याला ज्या दिवशी पाहीले त्या दिवशीची पाण्याची पातळी गृहीत धरली.




त्यांनी हे पात्र पाण्याची पातळी काढण्यासाठी वापरले. विहिरीची पातळी जेव्हा खाली जात होती तेव्हा त्यांनी त्यात पाणी ओतले. जेव्हा पातळी वाढत होती तेव्हा पाणी काढले. पायरीच्या वर धन आणि खाली ऋण समजुन ते पातळीची नोंद करीत होते.

पुन्हा एकदा निरिक्षण करा, पुर्णाकाला संख्या रेषेवर कसे दर्शविले आहे.




आपणास माहीत आहे कि 4 > 2 आणि संख्यारेषेवर 4 हे 2 च्या उजव्या बाजुस आहे. त्याच प्रमाणे 2 > 0 आणि 2 हे शुन्याच्या उजव्या बाजुस आहे. कारण 0 हे -3 उजव्या बाजुस आहे.म्हणुन 0 > -3.

म्हणुन -3 < -2, -2 < -1, -1 < 0 आणि 0 < 1, 1 < 2, 2 < 3 इत्यादी.

SCERT TELANGANA

## हे करा



वरील माहीती वरुन दिलेली रिकामी जागा  < किवा > चिन्हाने भरा.

0 .......... -1   -3 .......... -2

5 .......... 6   -4 .......... 0



## प्रश्न संग्रह 6.2

1. खाली दिलेल्या रिकाम्या जागेत योग्य ते > किंवा < चिन्ह दोन पुर्णांकाच्या मध्ये लिहा.

(i) -1 .......... 0   (ii) -3 .......... -7

(iii) -10 .......... +10   (iv) 0 .......... -5

(v) -100 .......... 99   (vi) 0 .......... 100

2. रवालील पुर्णक संख्यांना चढत्या आणि उतरत्या क्रमात लिहा.

(i) -7, 5, -3   (ii) -1, 3, 0

(iii) 1, 3, -6   (iv) -5, -3, -1

3. चुक किवा बरोबर लिहा जे चुक आहेत त्याना बरोबर करा.

(i) शुन्य हे -3 च्या 3 उजवीकडे असते. (    )

(ii) एका संख्यारेषेवर -12 आणि +12 एकच पुर्णाक दर्शविते. (    )

(iii) प्रत्येक धन पूर्णाक शुन्यापेक्षा मोठा असतो. (    )

(iv) -5 < 8 (    )

(v) (-100) > (+100) (    )

(vi) -1 < -8 (    )

4. खाली दिलेल्या दोन पुर्णांका मधील सर्व संख्या लिहा. त्या.ना संख्या रेषेवर देखील दाखवा.:

(i) -1 आणि 1 (ii) -5 आणि 0 (iii) -6 आणि-8 (iv) 0 आणि -3

5 शिमला मध्ये नोंद केलेले तपमाण -4° आहे. कुफ्रीचे -6°c तर त्या दिवशी कोणत्या ठिकाणी जास्त थंडी होती. एका इमारीतीच्या तळ मजल्यावर राजेशचे दुकाण आहे. दुकाणाला वर जाण्यासाठी पायऱ्या आहेत. त्यांच्या पायऱ्याच्या ठिकाणी सामान ठेवले जात असे. प्रत्येक दिवशी त्यांची मुलगी हसीना, शाळेतून परत आल्या नंतर ती गच्चीवर खेळते. रात्रीच्या वेळी सामान जमविण्यास वडीलास मदत करते. चित्राचे निरीक्षण करुन पायऱ्यावर नोंद केलेल्या पुर्णाक संख्येच्या आधारे खालील प्रश्नाची उत्तरे लिहा:




SCERT TELANGANA

(I) दुकाना पासुन 7 पायऱ्या वर चढा.

(II) तळा मजल्या पासुन 3 पायऱ्या खाली उत्तरा.

(III) तळ मजल्या पासुन 5 पायऱ्या वर चढा आणि नंतर 3 पायऱ्या तेथुन पुन्हा वर चढा

(IV) तळ मजल्या पासुन 4 पायऱ्या वर, 3 पायऱ्या खाली उत्तरा .तेथुन 3 पायऱ्या वर खाली चला

(V) तळ मजल्या पासुन 5 पायऱ्या खाली उतरा. नंतर 10 पायऱ्या वर चढा.

(VI) तळ मजल्या पासुन 8 पायऱ्या वर चढा. नंतर 3 पायऱ्या, तेथुन 9 पायऱ्या खाली उत्तरा. तुमचे उत्तर मित्रा सोबत तपासुन चर्चा करा.




## 6.6 पूर्णांकाची बेरीज आणि वजाबाकी

**खेळः** थंड पेयाचे सारखे 10 झाकन घ्या.

झाकनांना उलटे-सुलटे करुन ठेवता येते. असे ग्रहीत धरा - वरचा भाग (+1) आणि खालचा भाग (-1) आहे. तुमच्या मित्राला एकाच वेळी सर्व 10 झाकनांना जोरात किरवुन फेकायला लावा. पडलेल्या सर्व 10 झाकन कोणत्या बाजुने पडले आहे एकदा पहा.ग्रहीत (+1) ची जोडी घ्या. (-1) च्या सर्व जोड्या काढुन टाका.  म्हणजे (+1) आणि (-1) बाकीचे झाकन मोजा. जर 4 जोड्या बनल्या. जर दोन झाकन उरले असतील तर +2 गुण मिळतील.उदाहरनार्थ झाकनाचे तोंड वर असेल तर.




= **+ 2**

जर तिन जोड्या तयार झाल्या आणि **w** टोप्या खाली तोंड करुन उरल्या तर गुण **-4**




= **- 4**

तुमच्या वहीत संख्या रेषेचे वापर करुन गुण नोंद करा. हा खेळ जो पर्यत तुमच्या पैकी एकास 10 गुण मिळत नाहीत चालुच ठेवु शकतो . जर मिळले तर तुम्ही जिंकलात.







**तूमची नोंद** **तुमच्या मित्राची नोंद**

जर तुमच्या मित्राने दोन टोप्या उलटया करुन ठेवल्या तर काय घडेल ?

संख्या रेषेवर ती डावी किंवा उजवी क़डे चालते. -4 पासुन 2 स्थान डावी क़डे चालते आणि -6 पासी पोहचते.म्हणजे (-4) + (-2) = -6.

तुम्ही दोन पुर्णाकाची बेरीज करा. जसे (+3) + (+1) = 4. तुम्ही दोन ऋण पुर्णांकाची बेरीज देखील करु शकता. त्याचे उत्तर 3 ने चिन्हात येईल (-3) + (-2) = -5.

SCERT TELANGANA

जेव्हा आपल्या कडे एक धनपुर्णांक आणि एक ऋण पुर्णाक संख्या असेल तर काय होते. चला आता झाकनाची मदत घेवु या. सुलट तोंड असलेल्या झाकनांना धन पुर्णांक आणि उलट तोंड असलेल्या झाकनांना ऋण पुर्णांक समजा. जोडीने झाकन काढुन टाका .म्हणजेच एक खाली तोंडं केलेली आणि एक वर तोंड केलेली कारण (+1) + (-1) = 0.

उरलेल्या टोप्या मोजा



(i) (-3) + (+2) = (-1) + [(-2) + (+2)]
= -1 + 0
= -1 

(ii) (+4) + (-2) = (+2) + [(+2) + (-2)]
= (+2) + 0
= +2 

आता तुम्हाला हा खेळ संख्या वाढवुन सोप्या पध्दतीने खेळता येतो.

**असे करा.**



खालीलची किंमत काढा

(i) -7 + 8 (ii) -3 + 5 (iii) -3 - 2 (iv) +7 - 10

### 6.6.1 संख्यारेषेवर पुर्णांकाची बेरीज

दोन पुर्णांकाला संख्यारेषेवर कसे मिळवू शकतो.चला पाहु या

1. 2 आणि 3 संख्यारेषेवर कसे मिळवावे.




संख्यारेषेवर 2 पर्यंत पोहचण्या साठी आपण 0 पासुन 2 पायऱ्या उजवी कडे वळु या.व 5 पर्यत पोहचण्यासाठी 0 पासुन 3 पायऱ्या उजवीकडे चालु या अशा प्रकारे 2 + 3 = 5 आपणास येते.

2.




संख्यारेषेवर -4 पासी पोहचण्यासाठी आपण शुन्य पासुन 4 पायरी डावी कडे चालली पाहीजे. नंतर - 7 जवळ पोहंचण्यासाठी 3 पायरी -3 च्या डाव्या बाजुस चालल पाहीजे आशा रितीने (-4) + (-3) = -7.

3. आपली इच्छा आहे की एका संख्या रेषेवर (+6) आणि (-2)ची बेरीज करायची आहे सर्व प्रथम आपण शुन्य पासुन 6 पायऱ्या उजवीकडे चालतो आणि 6 जवळ पोहचतो नंतर 6 च्या डाव्या बाजुस २ चालतो आणि 4 ला मिळतो.

SCERT TELANGANA




अशा प्रकारे (+6) + (-2) = 4.

4. त्याच प्रमाणे संख्या रेषेवर (-5) आणि (+3) पायऱ्या शुन्यापासुन डावीकडे -5 पर्यत पोहंचण्या साठी चाललो. नंतर त्या बिंदु पासुन 3 पायऱ्या उजवीकडे वळलो. तेव्हा आपण -2 बिंदु पासी पोहोंचलो. अशा प्रकारे (-5) + (+3) = -2




5. सुनीता 3 आणि -3 ची बेरीज करते. ती संख्यारेषेवर सुरुवातीला 0 पासुन +3 कडे वळते. नंतर +3 पासुन 3 बिंदु डावी कडे चालते शेवटी ती कुठे पोंहचेल?




वरील चित्रानुसार 3 + (-3) = 0

त्याच प्रमाने जर आपण 1आणि -1, 2 आणि -2, 3 आणि -3 ..... इत्यादीना मिळविले असता बेरीज शुन्ये येते. त्यांना परस्पर बेरीजेच्या व्यस्त म्हणतात. जर दोन वेगवेगळ्या संख्या मिळविल्या असता त्याची बेरीज 0 येत असेल तर त्यानां एकमेकाचे बेरीजेचे व्यस्त म्हणतात.

7 च्या बेरीजेच्या व्यस्त काय आहे.?

-8 च्या बेरीजेच्या व्यस्त काय आहे ?

**प्रयत्न करा.**



1. संख्या रेषेवर खालीलच्या किंमती माहीत करा

(i) (-3) + 5 (ii) (-5) + 3

तुम्ही स्वत:चे प्रश्न तयार करा आणि संख्या रेषेच्या वापर करुन सोडवा.

2. खालीलची उत्तरे काढा.:

(i) (+5) + (-5) (ii) (+6) + (-7) (iii) (-8) + (+2)

तुमच्या मित्राला अशा प्रकारचे पांच प्रश्न विचारा आणि त्यांना सोडवा.

SCERT TELANGANA

**खालीलचे निरिक्षन करा:**

| | | |
|---|---|---|
| 3 + 2 = 5 | 20 + 6 = 26 | 30 + 22 = 52 |
| 8 + 16 = 24 | 9 + 10 = 19 | 20 + 14 =34 |

आपणास हे दिसुन ते की दोन पुर्णाकाची बेरीज देखील धन संख्याच येते.

आता खालील निरिक्षण करा.

| | | |
|---|---|---|
| -4 + (-6) = -10 | -8 + (-12) = -20 | -3 + (-9) = -12 |

या पासुन तुम्ही काय शिकलात ? दोन ऋण पुर्णाकांची बेरीज नेहमी ऋण पुर्णांक येते.

जेव्हा एक पुर्णांक धन आणि दुसरा ऋण आहे तेव्हा काय होते ? चला हे पाहुया :

| | |
|---|---|
| 15 + (-17) = -2 | -23 + 4 = -9 |
| -11 + 16 = 5 | -12 + 12 = 0 |

वरील उदाहरणापासुन आपण एका निष्कर्शास येतो की जेव्हा दोन पुर्णाकाची बेरीज करतो. ज्या मध्ये एक धन आणि दोन ऋण आहेत. तेव्हा त्याची बेरीज धन,ऋण किंवां शुन्य येवू शकते..

**उदाहरण-1.** (-10) + (+14) + (-5) + (+8) ची बेरीज करा.

**सोडवा :** धन पुर्णाक आणि ऋण पुर्णांक एकत्र समूहामध्ये येतील आपण अशा प्रकारे मांडणी करु.

आपणास माहित आहे. (-10) + (+14) + (-5) + (+8)

= (-10) + (-5) + (+14) + (+8)

= -15 + 22 = 7.

**उदाहरण-2.** (-20), (-82), (-28) आणि (-14)

**सोडवा: :** (-20) + (-82) + (-28) + (-14)

= -144

**उदाहरण-3.** 25 + (-21) + (-20) + (+17) + (-1) ची बेरीज करा.

**सोडवा :** 25 + (-21) + (-20) + (+17) + (-1) = 25 + (+17) + (-21) + (-20) + (-1)

= 42 - 42 = 0



**प्रश्न संग्रह- 6.3**

1. संख्यारेषेचा वापर करुन खालील पुर्णाकाची बेरीज करा.

(i) 7 + (-6) (ii) (-8) + (-2) (iii) (-6) + (-5) + (+2)

(iv) (-8) + (-9) + (+17) (v) (-3) + (-8) + (-5) (vi) (-1) + 7 + (-3)

2. संख्या रेषेचा वापर न करता बेरीज करा.

(i) 10 + (-3) (ii) -10 + (+16) (iii) (-8) + (+8)

(iv) -215 + (+100) (v) (-110) + (-22) (vi) 17 + (-11)

3. बेरीज माहीत करा.

(i) 120 आणि -274 (ii) -68 आणि 28

(iii) -29, 38 आणि 190 (iv) -60, -100 आणि 300.

SCERT TELANGANA

4. **संक्षिप्त करा:**

(i) (-6) + (-10) + 5 + 17 (ii) 30 + (-30) + (-60) + (-18)

(iii) (-80) + (+40) + (-30) + (+6) (iv) 70 + (-18) + (-10) + (-17)

### 6.6.2 पुर्णांकाची वजाबाकी

5 आणि (-2) ला संख्या रेषेवर बेरीज करतांना आपण पाहीले आहे. आपण 5 पासुन सुरुवात करतो आणि नंतर 2 पायरी 5 च्या डावी कडे जातो.

आपण 3 पासी पोहचलो कारण आपणास 5 + (-2) = 3




अशा प्रकारे संख्या रेषेवर धन पुर्णांक बेरीज करण्या साठी आपणास उजवीकडे वळावे लागते आणि ऋण पुर्णांक मिळविण्या साठी डावी कडे जावे लोगते आपण हे देखील पाहील आहे की संख्या रेषेवर पुर्ण संख्या मिळविण्या साठी डावी कडे वळावे लागत.

उदाहरणात 5 - 2 = ? घ्या.

आपण 5 पासुन सुरु करुन दोन पायरी डावीकडे घेवुन 3 जवळ समाप्त होतो.

ऋण पुर्णांकची वजाबाकी चा अर्थ काय होतो

आता चला खालील उदाहलनाचे निरीक्षण करु या.

**उदाहरण** - **4.** -5 ला 6 मधुन वजा करा.

**सोडवा :** -5 ची 6 मधुन वजा करण्या साठी चला आता आपण 6 पासुन सुरु करु या आणि 5 पायरी उजवी कडे वळु या --5 साठी आपण डाव्या बाजुला वळलो असतो. पंरतू आपण विरुध्द दिशेत वळु या. उजवी कडे 5 ने चालल असता आपण 11 जवळ पोहंचतो.




आपल्याला माहित आहे की 6 - (-5) = 11

सामान्यता स्तभालेखचा उपयोग वारं वारतासोबत स्वतंत्र अवलोकनास दर्शविण्यासाठी होतो.स्तंभालेखात स्तंभ हे स्तंभाची लांबी वस्तुची वारंवारता दंर्शविते.

वरील स्तंभालेखावरुन आपणास आढळुन येते की जास्त जन हायस्कुलनंतर शीकलेले नाहीत आणि तसेच थोडेच जन पदविधर आहेत.हे सुध्दा दाखवत आहे.

**विचार करा,चर्चा करा आणि लिहा.**

कोणत्या रीतीने स्तंभालेख हा चित्रालेखापेक्षा चागला आहे.



**स्तंभालेखाची रचना**

कालोनीतील लोकांची वृत्ती खालील तक्त्यात दिली आहे.

| वृत्ती | शेतकरी | व्यापारी | खाजगी | सरकारी कर्मचारी | मजदुर |
|---|---|---|---|---|---|
| संख्या | 40 | 10 | 15 | 35 | 5 |

वरिल माहिती ऊभ्या स्तंभात दर्शविन्यासाठी खालिल पाय-या दिल्या आहेत.?

1.दोन लंब रेषा एक आडवी ($x$अक्षावर) आणि दुसरी ऊभी ( $y$ अक्ष)रेषा काढा.?

2. $y$ अक्षावर लोकांची संख्या आणि $x$ अक्षावर वृती लिहा?

3. योग्य मापाचा वापर $x$ अक्षावर समजा 1 से.मी. = 5 व्यक्ती




SCERT TELANGANA

व्यक्ती वारंवारतेला मापांनी भागुन स्तंभालेखाची ऊंची काढा?

| | | | |
|---|---|---|---|
| शेतकरी | 40 ÷ 5 = 8 | व्यापारी | 10 ÷ 5 = 2 |
| खाजगी कर्मचारी | 15 ÷ 5 = 3 | सरकारी कर्मचारी | 35 ÷ 5 = 7 |
| मजुर | 5 ÷ 5 = 1 | | |

(5) $x$ अक्षावर ऊंची माहित केलेले काही रुंदीचे आयातकार उभे स्तंभ काढा?अशा रितीने आपण वरील माहिती वरुन जेव्हा आडवे स्तंभाकृती काढतो ते खालील पायरी प्रमाने आहे.

(i) आलेखाच्या कागदावर एक आडवी ($x$-अक्षांस) आणि एक उभी ($y$-अक्षांस)दोन लंबरेषा काढा?

(ii) X अक्षांवर लोकांची संख्या आणि Yअक्षांवर वृती लीहा?

(iii) Y अक्षांवर योग्य माप 1 से.मी. = 5 व्यक्ती निवडा?

(iv) Y अक्षांवर योग्य माप 1 से.मी. = 5 व्यक्ती निवडा?

| | | | |
|---|---|---|---|
| शेतकरी | 40 ÷ 5 = 8 | व्यापारी | 10 ÷ 5= 2 |
| खाजगी कर्मचारी | 15 ÷ 5 = 3 | सरकारी कर्मचारी | 35 ÷ 5 = 7 |
| मजुर | 5 ÷ 5 = 1 | | |

(v) वरील माहित केलेल्या ऊंचीनुसार Yअक्षांसावर सारख्या रुंदिचे आयातकार आडवे स्तंभ काढा?




## प्रश्न संग्रह - 8.3

1. प्राण्याचा जिवणकाळ खाली दिलेला आहे

अस्वल - 40, वर्ष बैल- 28 वर्ष, उंठ- 50 वर्ष, कुत्रा- 22 वर्ष

मांजर- 25 वर्ष, गाढव - 45 वर्ष, बकरी - 15 वर्ष, घोडा- 10 वर्ष

गाय - 22 वर्ष, हत्ती- 70 वर्ष

2. या माहितीआडवा स्तंभालेख काढा?

वस्तु , घरभाडे , अन्न, शिक्षण , विधुत , परिवहण इतर



SCERT TELANGANA

| वस्तु | घरभाडे | अन्न | शिक्षण | विद्युत | परीवहन | इतर |
|---|---|---|---|---|---|---|
| खर्च रूपये (रु) | 3000 | 3400 | 800 | 400 | 600 | 1200 |

वरिल माहिती उभ्या स्तंभालेखात दर्शवा.

3. निरनिराळ्या वाहनाव्दारे हैदराबाद ते तिरुपतीचा प्रवासाचा वेळ खाली दिलेला आहे.

   कार-8 तास, बस -15तास, रेलवे - 12 तास, विमान - 1 तास. यास स्तंभालेखाच्या साहायाने दर्शवा?

4. 120शाळेच्या विद्यार्थावर केलेल्या पाहणी नुसार त्यांनी रिकाम्या वेळेत कोणते कार्य केले पाहिजे दिले आहेत.

| **निवडलेले कार्य** | खेळणे | कथा वाचन | टि.व्ही. पाहणे | संगित ऐकणे | चित्रकला |
|---|---|---|---|---|---|
| **एकुण विद्यार्थी** | 25 | 10 | 40 | 10 | 15 |

वरील सारणीचा स्तंभालेख काढा.?.

## प्रकल्प कार्य

1. वर्तमानपत्र, मासिके इत्यादितुन निरनिराळी स्तंभालेख गोळा करुन त्याचा एक अल्बम बनवा प्रत्येक स्तंभालेखाचे विवरण देन्याचा प्रयत्न करा ?
2. तुमच्या कॉलनीत फिरा, किती प्रकारचे घरे आहेत. त्याची नोंद करा म्हणजे कच्चे घर,कवेलुचे घर, सिमेंट कॉंक्रीटचे घर, बहुमजली ईमारत आहे का पहा यास स्तंभालेखाच्या साहायाने दर्शवा.

## आपण काय चर्चा केली ?

1. आपनास दिसुन आले की काही वस्तुबद्ल माहिती ही संख्याना एकत्रित गोळा केली असता माहिती मीळते?
2. माहितीस ताळयाच्या खुणेवरून तक्तयाकार पद्तिने मांडल्यास दिलेल्या माहितीची विशीष्ट माहिती मिळते.
3. चित्राच्या साह्याने माहितीस चित्रालेखात दर्शविने हे आपन शिकलो वस्तु किंवा वस्तुचाभाग, चित्रालेखाचे

   स्पष्टीकरणावरुन संबधित प्रश्न-उत्तरे देणे विशीष्ट वस्तुंच्या संख्येना चिन्हाच्या साहयाने लिहुन आपण चित्रालेख काढला. उदा- 

= 100 पुस्तके.
4. चित्रालेखाच्या साहयाने माहिती दर्शविणे याबद्ल आपण चर्चा केली स्तंभालेखात समान रुंदीचे उभे किंवा आडवे स्तंभ संमान अंतरावर असतात.प्रत्येक स्तंभाची लांबी ही त्या स्तंभाची वारंवारता दर्शविते.

पि.सी.महालनोबीस (भारत)
1893 - 1972
हे यांना भारतीय संख्या शास्त्राचे जनक म्हणतात.
त्यानी भारतीय सांख्यीक अनुसंधानाची संस्था कलकत्ता यथे काढली त्यांच्या जातीय पाहणी 'यास जागतीक पातळीवर मान्यता मीळाली'



SCERT TELANGANA

# बिजगणीताचा परीचय



## 9.1 परिचय

आतापर्यंत आपण संख्या आणि आकाराबद्दल शिकलो. त्याचा संबंध अंकगणीत आणि भुमितीशी होता. आता आपण गणिताच्या एका शाखेबद्दल शिकणार आहोत.यास बिजगणीत म्हणतात.

बिजगणीताची मुख्य वैशिष्टे -संख्यांना दर्शविण्यासाठी यात अक्षरे किंवा बाराखडीचा वापर होतो. अक्षराद्वारे विशिष्ट संख्या नसुन कोणतीही संख्या दर्शवु शकतो. माहीत नसणाऱ्या निर्णयाच्या पध्दतीला अनुसरुन आपण शक्तीमान अवजारे जे आपल्या जीवनातील प्रश्न सोडविते.

समजा दामिनी आणि कौशिक खेळत आहेत.

कौशिक : जर तु माझ्या सुचनेचे अनुसरुन करीत आहे तर मला अंतिम निकाल सांग तर मग मी तुला तुझे वय सांगीन.

दामिनी : परंतु तुला माझे वय ठाऊक आहे, यात काय नविन काय आहे ?

कौशिक : बरं, ठिक आहे. मला माहीत नसणाऱ्या एका व्यक्तीचे वय घे. मला सांगू नकोस. तरी पण मी तुला वय सांगेन.

दामिनी : बरं .तुझ्या सुचना काय आहेत ? ते तु कसे करतो ते मला पाहु दे.

कौशिक : प्रथम वयाला दुप्पट कर.

दामिनी : झाली.

कौशिक : आलेल्यामध्ये 5 मिळव. आता मला अंतिम निकाल सांगा.

दामिनी : ठीक आहे, ती संख्या '27' आहे.

कौशिक : तुझ्या मित्राचे वय 11 वर्षे आहेत.

दामिनीला आश्चर्य वाटले. आणि थोड्या वेळाने ती म्हणाली 'मला माहीत आहे ते वय तुने कसे माहीत केले'.

**तुम्हाला माहीत आहे ते कसे झाले ? तुम्ही सुद्धा प्रयत्न करा !!!**

## 9.2 नमुना-नियम बनविने



प्रविण आणि मौलीकाने खालील आकृतीत दाखविल्याप्रमाणे माणसाचे चेहरे तयार केले. त्यांनी काळ्या स्टीकर्सचा डोळ्यासाठी वापर केला मौलीकाने आकृतीत दाखविल्याप्रमाणे दोन काळे स्टीकर्स घेऊन माणसाचे चेहरे बनविले.

प्रविणने सुद्धा दोन काळे स्टीकर्स माणसाचे चेहरे तयार करण्यासाठी घेतले आणि मौलीकाने तयार केलेल्या चेहऱ्याच्या बाजुला ठेवले.

SCERT TELANGANA

परत मौलीकाने एक तयार केला



आणि प्रविणाने सुध्दा तयार केला.



काही वेळाने प्रविण सुध्दा शामील झाला, त्याने विचारले, " अशा प्रकारचे 8 आकार बनविण्यासाठी किती काळे स्टीकर्स लागतील"?, लगेच मौलीकाने चार आकृती काळ्या स्टीकर्स ची मोजणी केली. त्याच्या दुप्पट 16 लागतील असे सांगीतले.

"खुप" छान रहीम म्हणाला आणि त्यांना विचारला, "69 मानवी चेहरे बनविण्यासाठी किती काळे स्टीकर्स लागतील",आणि प्रविनाला वाटले की जेंव्हा चेहऱ्यांची संख्या जास्त असते तेंव्हा स्टीकर्स मोजण्याची ही पध्दत थोडी वेळ घालवणारी आहे. त्यांनी दुसरी पध्दत वापरण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यानी खालील सारणी बनविली.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| तयार झालेले एकुण मानवी चेहरे | 1 | 2 | 3 | . . . |
| लागणाऱ्या एकुण काळ्या स्टीकर्सची संख्या | 2 | 4 | 6 | . . |
| असेही दर्शविता येते | $2 \times 1$ | $2 \times 2$ | $2 \times 3$ | . . . |

तुम्ही तयार झालेले मानवी चेहरे आणि आवश्यक काळ्या स्टीकर्सची संख्या यामधील संबंधाची पाहणी केली का ?

मौलीका म्हणाली की तयार होणाऱ्या चेहऱ्यांची आणि आवश्यक काळ्या स्टीकर्समध्ये संबंध आहे .

**उदा.**एका चेहऱ्यासाठी 2 स्टीकर्स लागतील $2 \times 1$ किंवा $2 \times$ तयार होणारे चेहरे. चला जास्त चेहऱ्याबद्दल पाहु.

2 चेहऱ्यासाठी लागणारे स्टीकर्स 4 आहेत. $4 = 2 \times 2 = 2 \times$ तयार झालेले चेहरे

3 चेहऱ्यासाठी लागणारे स्टीकर्स $6 = 2 \times 3 = 2 \times$ तयार झालेले चेहरे

मौलीका म्हणाली की लागणाऱ्या काळ्या स्टीकर्सची संख्या ही तयार होणाऱ्या चेहऱ्यांच्या दुप्पट आहे. म्हणजे आवश्यक काळ्या स्टीकर्सची संख्या = मानवी चेहऱ्याची दुप्पट

आता 69 चेहऱ्यासाठी आपणास.

$2 \times 69 = 138$ काळे स्टीकर्स.

### 9.2.2 नमुना-2



त्रिकोणाची रचना करण्यासाठी 3 आगपेटीच्या काड्याची आवश्यकता आहे.

आपणास दोन त्रिकोण बनविण्यासाठी 6 आगपेटीच्या काड्याची आवश्यकता आहे.



SCERT TELANGANA

खालील तक्तयात आवश्यक आगपेटीच्या काड्याची संख्या आणि मापापासुन बनणारे त्रिकोण आहेत:

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण त्रिकोण तयार करणे | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | ... |
| एकुण लागणाऱ्या काड्ंयाची संख्या | 3 | 6 | 9 | 12 | 15 | 18 | ... |
| पाहणी (नमुना) | 3×1 | 3×2 | 3×3 | 3×4 | 3×5 | 3×6 | ... |

एकुण त्रिकोण तयार होण्यासाठी किती काड्याची आवश्यकता आहे. यासाठी नियम काय आहे ?

या नियमाप्रमाणे लागणाऱ्या एकुण काड्यांची संख्या = तयार होण्याऱ्या त्रिकोणाची तिप्पट.

### 9.2.3 नमुना-3

चौरस बनविण्यासाठी, 4 आगपेटीच्या काड्याची आवश्यकता आहे.



जर दोन चौरस बनवायचे असेल तर आपणास 8 काड्या पाहीजेत.



जर दोन चौरस बनवायचे असेल तर आपणास 12 आगपेटीच्या काड्याची आवश्यकता असते.



वरील माहीतीस आपण तक्त्यात दाखवु.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एकुण चौरस तयार करणे | 1 | 2 | 3 | ....... |
| एकुण लागणाऱ्या काड्ंयाची संख्या | 4 | 8 | 12 | ....... |
| पाहणी (नमुना) | 4×1 | 4×2 | 4×3 | ....... |

म्हणजे आवश्यक काड्यांची संख्या = तयार होण्याऱ्या चौरसाची चौपट.

### 9.3 चलराशी

चला नमुना-1ची सारणी घेवु

| | | | | |
|---|---|---|---|---|
| तयार होणारे एकुण मानवी चेहरे | 1 | 2 | 3 | ... |
| लागणाऱ्या स्टीकर्सची संख्या | 2 | 4 | 6 | ... |
| नमुना | 2×1 | 2×2 | 2×3 | ... |

वरील तक्तयात तयार होणाऱ्या एकुण मानवी चेहराची संख्या वाढल्यास त्यासाठी लागणाऱ्या स्टीकर्सची संख्या वाढत आहे,असे आढळुन आले की प्रत्येकात आवश्यक काळ्या स्टीकर्सची संख्या हे तयार होणाऱ्या एकुण मानवी चेहराच्या दुप्पट आहे.

SCERT TELANGANA

आपल्या सोईसाठी तयार होणाऱ्या मानवी चेहऱ्यास 'm' ने दर्शवु.

म्हणुन लागणाऱ्या काळ्या स्टीकर्सची संख्या = $2 \times m$

" $2 \times m$" च्या ऐवजी आपण "2m". लिहु शकतो.लक्षात घ्या. "2m" हे "$2 \times m$" च्या समान आहे,परंतु $2 + m$.च्या नाही.

$\therefore$ लागणाऱ्या काळ्या स्टीकर्सची संख्या = 2m.

जर आपणास एक मानवी बनवायचा असल्यास,m ची किंमत = 1. म्हणुन नियमानुसार आवश्यक काळ्या स्टीकर्सची संख्या आहे $2 \times 1 = 2$.

जर आपणास दोन मानवी चेहरे तयार करायचे असल्यास 'm' ची किंमत 2.येते. म्हणुन नियमानुसार आवश्यक काळ्या स्टीकर्सची संख्या आहे $2 \times 2 = 4$.

आता तुम्ही तीन चेहऱ्यासाठी किती स्टीकर्स पाहीजे याचा अंदाज लावु शकता ? स्पष्टपणे 6. वरील उदाहरणावरुन आवश्यक लागणाऱ्या स्टीकर्सची संख्या आणि चेहऱ्यांच्या संख्या यातील संबंध आपणास माहीत होतो.

आवश्यक स्टीकर्सची संख्या = $2\ m$

येथे $m$ चेहऱ्यांच्या संख्या आहे,आणि त्याची किंमत 1, 2, 3, 4, ..... घेवु शकतो.

येथे '$m$' हे चलराशीचे उदाहरण असुन '$m$' ची किंमत स्थीर नसुन ती वेगवेगळ्या किंमती होते,त्यानुसार लागणाऱ्या स्टीकर्सची संख्यासुद्धा बदलते.

आता नमुना-2 चा तक्ता घेवु

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तयार होणाऱ्या त्रिकोणाची संख्या | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | ....... |
| लागणाऱ्या आगपेटीच्या काड्यांची संख्या | 3 | 6 | 9 | 12 | 15 | 18 | ....... |
| पाहणी (नमुना) | 3×1 | 3×2 | 3×3 | 3×4 | 3×5 | 3×6 | ...... |

तुम्ही आता तयार होणाऱ्या त्रिकोणाच्या संख्येसाठी किती आगपेटीच्या काड्यांची आवश्यकता आहे याचा नियम बनवा ?

आवश्यकता असलेल्या काड्यांची संख्या = 3 y, येथे 'y' ही त्रिकोणाची संख्या होय .

येथ सुद्धा 'y' ही निरनिराळ्या किंमती घेतो. $y = 1, 2, .....$

म्हणजे 'y' ची किंमत बदलते म्हणुन 'y' हे चलराशीचे उदाहरण आहे.

नमुना -3 परत जा आणि एकुण चौरसांना लागणाऱ्या काड्यांच्या संख्येचा नियम तयार करा.चौरसाला $n$ ने आणि लागणाऱ्या काड्यांना $m$ दर्शवा.

**हे करा**



1. आता तुम्ही खाली नमुन्यासाठी लागणाऱ्या काड्यासाठी नियम लिहु शकता का ?
2. 'H' नमुन्यासाठी लागणाऱ्या काड्यासाठी नियम माहीत करा जो वारंवार येतो. 'L' वारंवार येणाऱ्यांसाठी तुम्ही नियम कसा बनवाल ?



SCERT TELANGANA

## 9.4 नमुना-4

आगपेटाच्या काड्याच्या सहाय्याने चौरसाचे नमुने तयार करा.



आकार -1 आकार -2 आकार -3 आकार - 4

चौरसाच्या एकुण संख्येला लागणाऱ्या आगपेटीच्या काड्यांची संख्या खाली दिलेली आहेत:

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| चौरसांची संख्या | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| आगपेटीच्या काड्यांची संख्या (m) | 4 | 7 | 10 | 13 | --- |
| नमुना | (3×1)+1 | (3×2)+1 | (3×3)+1 | (3×4)+1 | --- |

नियमानुसार

आगपेटीच्या काड्यांची संख्या = 3 × (चौरसांची संख्या) + 1

येथे s = चौरसांची संख्या

म्हणुन आगपेटीच्या काड्यांची संख्या = (3×S) + 1 = 3S + 1

येथे 's' हे अक्षर चलराशीचे उदाहरण आहे.

**हे करा**



आकाराच्या रेषेची मांडणी आगपेटीच्या काड्यांचा वापर करुन केलेली आहे .



आकार -1 आकार -2 आकार -3 आकार - 4

(i) अशा आकाराच्या विभागाला तयार करण्यासाठी किती काड्यांची गरज आहे,हे दाखविणारा नियम माहीत करा ?

(ii) आकार-12 च्या विभागाला तयार करण्यासाठी किती काड्यांची गरज आहे ?

आपण कोणतेही अक्षर उदा. m, n, p, s, x, y, z etc. इत्यादी.चलराशीसाठी वापरतो,चलराशीला स्थिर किंमत किंवा स्थिर अक्षर नसते.अक्षर कोणतेही राशी दर्शविते,वरिल उदाहरणात आपण m, y, s चा वापर आगपेटीच्या काड्यांच्या संख्येसाठी केला.

**उदाहरण :-*1.*** रामाजवळ असलेल्या पेन्सीलची संख्या रहीम जवळील पेन्सीलपेक्षा 3 ने अधिक (जास्त) आहेत,तर रहीमच्या तुलनेत रामाजवळ असलेल्या पेन्सीलची संख्या काढा ?

**सोडवणुक:** जर रहीम जवळ दोन पेन्सीली आहेत,तर रामाजवळ 2 + 3 = 5 पेन्सील.

जर रहीम जवळ 5 पेन्सीली आहेत,तर रामाजवळ 5 + 3 = 8 पेन्सील.

परंतु आपणास रहीम जवळील पेन्सीलची आपणास माहीत नाही.

परंतु आपणास माहीत आहे की रामा जवळील पेन्सीली = रहीम जवळील पेन्सील + 3

जर रहीम जवळील पेन्सीलला आपण 'n' ने दर्शविल्यास रामा जवळील पेन्सीलची संख्या n+3

येथे n = 1, 2, 3 ................म्हणुन 'n' ही चलराशी आहे.

SCERT TELANGANA

**उदाहरण-2.** हेमा आणि माधवी बहिणी आहेत.माधवी ही हेमापेक्षा 3 वर्षांनी लहान आहे,हेमा तुलनेत माधवीचे वय लिहा ?

**सोडवणुक:** दिल्याप्रमाणे माधवी ही हेमापेक्षा 3 वर्षांनी लहान आहे, जर हेमा ही 10 वर्षाची असेल तर माधवीचे वय 10-3 = 7 वर्ष.

जर हेमाचे वय 16 वर्ष असल्यास, माधवीचे वय 16-3= 13 वर्ष.

इथे आपणास हेमाचे खरे वय काय आहे,माहीत नाही.ते किती ही असु शकते.म्हणुन समजा हेमाचे वय 'p' वर्ष, असेल तर माधवाचे वय "p - 3" वर्ष.

इथे 'p' सुद्धा चलराशी होते,त्याची निरनिराळी किंमत जशी 1,2,3.........असु शकते.

जेंव्हा आपण 'p' ला 10 समजलो, 'p-3' म्हणजे 7 आणि 'p' ला 16 समजलो p-3 ही 13 होते.

## अभ्यास - 9.1

1. खालील आगपेटीच्या काड्याच्या नमुन्यासाठी किती आगपेटीच्या काड्याची आवश्यकता असते,याचा नियम माहीत करा.

   (i) 'T' अक्षराचा नमुना (ii) 'E' अक्षराचा नमुना

   (iii) 'Z' अक्षराचा नमुना

2. हॉलमधील एकुण पंख्याच्या संख्येला आवश्यक असणारी पाती (ब्लेड)ची संख्या (समजा $n$) मधील नियम माहीत करा ?



3. खाली दिलेल्या नमुन्याच्या आकारसाठी आवश्यक असलेल्या आगपेटीच्या काड्यांची संख्यासाठी नियम माहीत करा.

   (a)  ..........

   (b)  ..........

4. एका पेनची किंमत ₹ 7 आहे,तर 'n' पेन्सची किंमत काढण्यासाठी कोणता नियम आहे.

5. एका बॅगची किंमत ₹ 90 आहे,तर 'm' बॅगची किंमत माहीत करण्यासाठी कोणता नियम आहे?

6. q पुस्तकाची किंमत ₹ 23 आहे,हे पुस्तक विकत घेण्यासाठी उपयोगात येणारा नियम आहे,तर एका पुस्तकाची किंमत काढा ?

7. जॉन म्हणाला माझ्याजवळ गायत्रीपेक्षा दोन पुस्तके कमी आहेत, $x$ चा वापर करुन हा संबंध लिहा.

8. रेखा जवळ सुरेश जवळ असलेल्या पुस्तकाच्या दुप्पटीपेक्षा 3 ने अधिक पुस्तके आहेत.तर $y$. अक्षराचा वापर करुन हा संबंध लिहा.

9. शिक्षकाने प्रत्येक विद्यार्थ्यास 6 पेन्सीली वाटल्या,दिलेल्या मुलांच्या संख्येसाठी किती पेन्सीलची गरज आहे,हे माहीत करु शकता.( मुलांच्या संख्येसाठी 'z' वापरा).

10. खालील प्रत्येक तक्ता दिलेले संबंध दर्शविणारा आहे,पुर्ण करा.

| (i) | $x$ | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 9 | ........ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | $3x+2$ | 5 | ........ | ........ | ........ | ........ | ........ | 38 |

| (ii) | a | 1 | 3 | 6 | 7 | 9 | 8 | ........ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | $5a-1$ | 4 | ........ | ........ | ........ | ........ | ........ | 49 |

SCERT TELANGANA

11. खालील नमुन्यांचे निरीक्षण करा.




प्रत्येक आकारातील रेषाखंडाची संख्या मोजा.

(i) या आकारातील किती रेषाखंड हा 9 होतो ?

(ii) वरिल नमुन्यासाठी नियम लिहा.

## 9.5 पदावली सोबत चलराशी

मागील अंकगणितात आपण पदावली 5 + 4, 11 - 9 इत्यादी पाहीलेत.यासर्व संख्यांनी बनलेल्या आहेत.

खालील निरीक्षण करा.

राम म्हणाला की मी टोनीपेक्षा पाच मार्क जास्त मिळवीले.रामने मिळवीलेले माहीत करु शकता काय इथे आपणास टोनीचे मार्क माहीत नाही.

समजा टोनीने 45 मार्क मिळवीले,तर रामनी मिळवीलेले मार्क 45+5= 50

समजा टोनीने 56 मार्क मिळवीले,तर रामनी मिळवीलेले मार्क 56+5= 61

आता समजा टोनीने '$x$' मार्क मिळवीले,तर रामनी मिळवीलेले मार्क तुम्ही सांगु शकता का ?

रामनी मिळवीलेले मार्क $x$+5 होते.

या $x$+5 ला '$x$' चलराशीची पदावली म्हणतात.

आपण पाहीलेली पदावली अशाप्रकारे 2m, 3y, 4z, 2s+1, 3s+1, 8p, n+3, p-3 ही अगोदरच्या चर्चेत आहे,ही पदावली बेरीज,वजाबाकी,गुणाकार आणि भागाकार या चिन्हांचा वापर करुन बनली.उदाहरणात, 'p-3' ही पदावली 'p' चलराशीतुन 3 वजा केल्याने तयार झाली,आणि **'8 p'** ही पदावली 'p' चलराशी '8' नी गुणाकार केल्याने आली.

**आपणास माहीत आहे की,चलराशी या सर्व निरनिराळ्या किंमती घेते,त्या स्थिर किंमतीच्या नसतात,परंतु त्या संख्या आहेत.म्हणुन त्यासोबत बेरीज,वजाबाकी,गुणाकार आणि भागाकार ही क्रिया करु शकतो.**

आपल्या दैनंदीन जीवनात पदावलीचा वापर होतो.त्याची आठवण करु या:

| क्रम. संख्या | परिस्थीती | चलराशी | विधानावरुन पदावली |
|---|---|---|---|
| (i) | '$n$' ला 7 ने भागल्यास | | |
| (ii) | गीता जवळ असलेल्यापेक्षा ₹ 5 नी जास्त | गीता जवळ ₹ $y$ | $y + 5$ |
| (iii) | परिस्थीती ही चौरसाच्या बाजुच्या 4 पट | | |
| (iv) | पपईच्या किंमतीपेक्षा सफरचंदाची किंमत जास्त | | |
| (v) | रेनुची उंची लीलाच्या उंचीपेक्षा 3 फीट कमी | | |
| (vi) | माझे रन (धावा) तुझ्या धावाच्या $\frac{1}{3}$ पट आहे. | | |

SCERT TELANGANA

**उदाहरण-3.** खालील पदावलीचे विधान लिहा:

(i) $2p$ (ii) $7+x$

**सोडवणुक:** (i) राजु जवळ सिमाच्या दुप्पट पैसे आहेत.

(ii) माझ्याकडे 7 मार्बल दिलीपपेक्षा जास्त आहेत.

**उदाहरण-4.** मधुने वालाच्या बियानापेक्षा 5 ने जास्त भुईमुंगाचे बियाने लावली.तर त्याने किती भुईमुंगाचे बियाने लावली.
(वालाची एकुण बियाने 'm' घ्या)

**सोडवणुक:** समजा वालाच्या बियानाची संख्या = m

म्हणुन भुईमुंगाच्या बियानाची संख्या = 'm+ 5'

## अभ्यास - 9.2

1. खालील विधानाची पदावली लिहा

(i) q ला 5 ने गुणल्यास
(ii) y ला 4 ने भागल्यास
(iii) p आणि q च्या गुणाकाराचा एक चतुर्थांश
(iv) z च्या तिप्पटीत 5 मिळविल्यास
(v) '10' मध्ये 'n' च्या 9 वेळा मिळविल्यास
(vi) 'y' च्या दुप्पटीतुन 16 वजा केल्यास.
(vii) 'y' ला 10 ने गुणुन नंतर त्या गुणाकारात '' मिळविल्यास

2. खालील पदावलीची दोन विधाने लिहा.

(i) y - 11 (ii) $10a$ (iii) $\frac{x}{5}$

(iv) 3m + 11 (v) $2y - 5$

3. पीटर जवळ 'p' कांउटर आहेत.डेविड जवळ पीटर पेक्षा तीन पट आहे,यास पदावलीत लिहा.

4. सिता जवळ गीतापेक्षा 3 वह्या जास्त आहेत.सिताजवळ असलेल्या वह्यांची संख्या काढा ? गीताच्या वह्यांसाठी कोणतेही अक्षर वापरा.

5. सैनिक परेड मैदानात चालत होते. प्रत्येक रांगेत 5 सैनिक आहेत, दिलेल्या प्रत्येक रांगेसाठी, सैनिकांच्या संख्यासाठी नियम कोणता ? रांगेच्या संख्येसाठी '$n$' वापरा.

## 9.6 भुमितीतील नियम व महत्वमापन

### चौरसाची परिमीती

आपणास माहीत आहे की,बहुबुजीची परिमीती ही त्याच्या बाजुच्या लांबीची बेरिज आहे.

चौरसाला 4 बाजु असतात आणि त्या समान लांबीच्या असतात.

म्हणुन चौरसाची परिमीती = चौरसाच्या लांबीची बेरिज.

= 4 × बाजुंची लांबी.

अशाप्रकारे चौरसाच्या परिमीतीचा नियम मिळाला.चौरसाच्या लांबीला कोणतीही किंमत असते.त्याची किंमत स्थिर नसते,ही सुद्धा चलराशी असते.चलराशीचा वापर सामान्य नियम बनविन्यासाठी होतो,जो आठवण ठेवण्यासाठी सोपा असतो.आपण चौरसाच्या परिमीतीचा नियम लिहतो.समभुज त्रिकोणाच्या परिमीतीचा नियम काय होईल ?

SCERT TELANGANA

## हे प्रयत्न करा



1. आयताच्या परिमीतीचा सामान्य नियम माहीत करा.लांबी आणि रुंदीसाठी चलराशी '$l$' आणि 'b' चा वापर करा.
2. चौरसासे क्षेत्रफळ माहीत करण्यासाठी 's' या चलास चौरसाची बाजु समजुन सामान्य नियम माहीत करा.
3. समद्वीभुज त्रिकोणाची परिमीती काढण्यासाठी नियम काय आहे ?

## 9.7 अंकगणितातील नियम

खालील संख्यांच्या नमुन्यांचे निरीक्षण करा.

2, 4 , 6 , 8 , 10 , .. . . . . . . . . . . . . . . . .

वरिल नमुन्याचे 'n' वे पद माहीत करण्यासाठी त्यास आपण तक्तयात क्रमवार लिहतो.

| समसंख्या | 2 | 4 | 6 | 8 | 10 | 12 | 14 | 16 | 18 | 20 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नमुना | 2×1 | 2×2 | 2×3 | 2×4 | 2×5 | ..... | 2×7 | ..... | 2×9 | ..... |

तक्तयावरुन पहिली समसंख्या $2 \times 1$ आहे,दुसरी समसंख्या $2 \times 2$ आणि अशाप्रकारे वरिल तक्तयाता वापर करुन तक्तयातील रिकाम्या जागा भरु शकतो आणि 'n व्या' पदाचा नमुना माहीत करु शकतो.म्हणुन $2 \times n$ , '$2n$'.

## हे करा



1. खालील क्रमांचे 'n वे' पद काढा.
   (i) 3 , 6 , 9 , 12 , …………..
   (ii) 2 , 5 , 8 , 11 , …………...
   (iii) 1 , 8 , 27 , 64 , 125 …………...

## 9.8 साधी समीकरणे



मानवी चेहऱ्याचे स्मरण करा.

आपणास माहीत आहे की,आवश्यक असणाऱ्या काळ्या स्टीकर्सची संख्या नियमाने $2m$, आहे.जर $m$ ला मानवी चेहऱ्यांची एकुण संख्या घेतली आहे.

आपण दिलेल्या चेहऱ्यांच्या संख्येसाठी लागणारी आवश्यक स्टीकर्सची संख्या माहीत करु शकतो.दुसरा उपाय काय आहे? स्टीकर्सची एकुण संख्या दिली असता किती चेहरे तयार होतात.हे कसे काढु?

याचा अर्थ स्टीकर्सची संख्या 10 असता आपणास चेहऱ्यांची एकुण संख्या ($m$) काढावी लागते.

आपणास माहीत आहे की 10 स्टीकर्ससाठी $2m = 10$

येथे $m$ चलाद्वारे एक अट आपण पुर्ण केली पाहीजे.

SCERT TELANGANA

$m$ ची अट 2 पट 10 झाली पाहीजे ही अट पुर्ण झाली,हे एका समीकरणाचे उदाहरण आहे.

खालील तक्तयाचे निरीक्षण केल्यास आपल्या प्रश्नाचे उत्तर मिळेल.

| **$m$** | **$2m$** | **अट मान्य ? होय/नाही** |
|---|---|---|
| 2 | 4 | नाही |
| 3 | 6 | नाही |
| 4 | 8 | नाही |
| 5 | 10 | **होय** |
| 6 | 12 | नाही |
| 7 | 14 | नाही |

$2m = 10$ समीकरण फक्त जेंव्हा $m = 5$ मांडतो तेंव्हा अट पुर्ण मान्य होते.

### 9.8.1 समीकरणाची डावी हाताची (L.H.S) आणि उजवी हाताची (R.H.S) बाजु

जर आपण $2m = 10$ समीकरणाचे निरीक्षण केले असता आपणास माहीत होते की,समीकरणात बरोबर चिन्ह (=) दोन्ही बाजुमध्ये आहेत.समीकरणातील बरोबर चिन्हाच्या डाव्या पदावलीच्या किंमतीला डाव्या हाताची बाजु (LHS) आणि बरोबर चिन्हाच्या उजव्या पदावलीच्या किंमतीला उजव्या हाताची बाजु (RHS) असे म्हणतात. समीकरणात डाव्या हाताच्या बाजुची (LHS) किंमत ही उजव्या हाताच्या (RHS)च्या किंमतीच्या बरोबर असते.या अटीला तराजुच्या सहाय्याने तराजुच्या दोन्ही पारड्यात समान वजन ठेवुन तुलना केली जाते.




जर डाव्या हाताची बाजु (LHS) ही उजव्या हाताच्या बाजु (RHS) ला बरोबर नसेल तर आपणास समीकरण येत नाही.उदाहरणार्थ. $4 + 5$ एका बाजुला आणि 7 हे दुसऱ्या बाजुला लिहल्यास समीकरण होत नाही.त्याला आपण $4 + 5 \neq 7$ असे लिहतो. किंवा $4 + 5 > 7$ असे लिहतो. त्याचप्रमाणे $x + 5 > 6$, $y - 1 < 10$ ही समीकरणे नाहीत.

## हे करा



1. खालील साध्या समीकरणाची डाव्या हाताची बाजु (LHS) आणि उजव्या हाताची बाजु (RHS) लिहा:

   (i) $2x + 1 = 10$ (ii) $9 = y - 2$ (iii) $3p + 5 = 2p + 10$

2. कोणतीही दोन साधी समीकरणे लिहुन त्याची डाव्या हाताची बाजु (LHS) आणि उजव्या हाताची बाजु (RHS) लिहा:.

### 9.8.1 प्रयत्न आणि चुक पद्धतीने समीकरण सोडविणे (समीकरणाचे मुळ काढणे)

धड्याच्या सुरुवातीचे एक उदाहरण घेऊ या.आपण दामिनी आणि कौशिक यांच्या संभाषणाचे निरीक्षण केले.त्या संभाषणात दामिनी म्हणाली की अंतीम संख्या 27 आहे,आणि कौशिकने तिच्या मैत्रिणीचे वय 11 वर्ष सांगीतले.

त्याने वय कसे माहीत केले चला पाहु या.

समजा दामिनीच्या मैत्रिणीचे वय '$x$' वर्ष आहे. त्याची दुप्पट केल्यास आपणास '$2x$'. येते.त्यात 5 मिळविल्यास '$2x + 5$'.

होते.म्हणुन शेवटी निकाल '$2x + 5$'. येते.दामिनीने शेवटची संख्या 27 सांगीतली.

म्हणजे $2x + 5 = 27$

चला वरील समीकरण $2x + 5 = 27$ घेतल्यास '$x$' ने ती अट पुर्ण केली पाहीजे.

SCERT TELANGANA

येथे '$x$' कोणतीही किंमत घेऊ शकतो.जसे-- 1, 2, 3, ....

जर $x = 1$ तर $2x + 5 = 2 \times 1 + 5 = 7$

जर $x = 2$ तर $2x + 5 = 2 \times 2 + 5 = 9$

जर $x = 3$ तर $2x + 5 = 2 \times 3 + 5 = 11$ अशाप्रकारे

'$x$' च्या ऐवजी 1,2,3 .....त्यास "**प्रतिक्षेपण**". म्हणतात.

'$x$' चलाच्या प्रतिक्षेपणानंतर येणाऱ्या किंमतीच्या डाव्या हाताची बाजु (LHS) आणि उजव्या हाताच्या बाजुच्या **(RHS)** किंमतीचे निरीक्षण करुया.

| प्रतिक्षेपीत किंमत (x) | डाव्या हाताची बाजुची (LHS) किंमत (2x+5) | उजव्या हाताची बाजुची (RHS) किंमत 27 | **डाव्या हाताची आणि उजव्या हाताची बाजु समान आहे किंवा नाही** |
|---|---|---|---|
| 1 | $2 \times 1+5=7$ | 27 | समान नाही |
| 2 | $2 \times 2+5=9$ | 27 | समान नाही |
| 3 | $2 \times 3+5=11$ | 27 | समान नाही |
| 4 | $2 \times 4+5=13$ | 27 | समान नाही |
| 5 | $2 \times 5+5=15$ | 27 | समान नाही |
| 6 | $2 \times 6+5=17$ | 27 | समान नाही |
| 7 | $2 \times 7+5=19$ | 27 | समान नाही |
| 8 | $2 \times 8+5=21$ | 27 | समान नाही |
| 9 | $2 \times 9+5=23$ | 27 | समान नाही |
| 10 | $2 \times 10+5=25$ | 27 | समान नाही |
| 11 | $2 \times 11+5=27$ | 27 | समान आहे |
| 12 | $2 \times 12+5=29$ | 27 | समान नाही |

वरील तक्तयावरुन जेव्हा '$x = 11$' तेंव्हा दोन्ही LHS आणि RHS समान येते. म्हणुन $x = 11$ ला $2x + 5 = 27$ या समीकरणाचा एकल म्हणतात.समीकरणाचा एकल ही चलाची किंमत आहे.ज्यासाठी डा.हा.बा आणि उ.हा.बा समान असते.

**आपल्या जीवनातील प्रश्न ,कठिण प्रश्न आणि गंमतीदार प्रश्न सोडविण्यासाठी बिजगणित हे शक्तीमान औजार आहे.** दुसरे $3m = 15$ समीकरण घेऊ

खालील सारणीत 'm', च्या वेगवेगळ्या किंमती दाखविल्याप्रमाणे आहेत. LHS आणि RHS च्या किंमतीची तुलना करा.

| **प्रतिक्षेपीत किंमत** (m) | **डाव्या हाताची बाजुची** (LHS) **किंमत** (3m) | **उजव्या हाताची बाजुची** (RHS) **किंमत** **(15)** | **डाव्या हाताची आणि उजव्या हाताची बाजु समान आहे किंवा नाही** |
|---|---|---|---|
| 1 | $3 \times 1 = 2$ | 15 | समान नाही |
| 2 | $3 \times 2 = 6$ | 15 | समान नाही |
| 3 | $3 \times 3 = 9$ | 15 | समान नाही |
| 4 | $3 \times 4 = 12$ | 15 | समान नाही |
| 5 | $3 \times 5 = 15$ | 15 | समान आहे |
| 6 | $3 \times 6 = 18$ | 15 | समान नाही |

वरील तक्तयावरुन m=5 साठी दोन्ही LHS आणि RHS समान होते. म्हणुन m = 5 ला समीकरणाचा एकल म्हणतात.वरिल

SCERT TELANGANA

## हे करुन पहा



'$x$ - 4 = 2' या समीकरणाची सोडवणुक चुक पद्धतीद्वारे काढा.



## अभ्यास - 9.3

1. खालीलपैकी कोणती समीकरणे आहेत ते सांगा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (i) | $x - 3 = 7$ | (ii) | $l + 5 > 9$ | (iii) | $p - 4 < 10$ |
| (iv) | $5 + m = -6$ | (v) | $2s - 2 = 12$ | (vi) | $3x + 5 > 13$ |
| (vii) | $3x < 15$ | (viii) | $2x - 5 = 3$ | (ix) | $7y + 1 < 22$ |
| (x) | $-3z + 6 = 12$ | (xi) | $2x - 3y = 3$ | (xii) | $z^2 = 4$ |

2. खालील समीकरणाची LHS आणि RHS लिहा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (i) | $x-5 = 6$ | (ii) | $4y = 12$ | (iii) | $2z + 3 = 7$ |
| (iv) | $3p = 24$ | (v) | $4 = x - 2$ | (vi) | $2a - 3 = -5$ |

3. प्रयत्न आणि चुक पद्धतीचा वापर करुन खालील समीकरणे सोडवा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (i) | $x + 3 = 5$ | (ii) | $y - 2 = 7$ | (iii) | $a - 2 = 6$ |
| (iv) | $5 = 15$ | (v) | $6n = 30$ | (vi) | $3z = 27$ |

## आपण का चर्चा केली ?

1. आगपेटीच्या काड्याच्या सहाय्याने तयार होणाऱ्या आकाराच्या किंवा काही अक्षराच्या नमुन्याकडे पहा.एकरुप आकारच्या संख्येसाठी आवश्यक लागणाऱ्या आगपेटीच्या काड्यांची संख्यामधील सामान्य संबंध लिहणे हे आपण शिकलो.प्रत्येक वेळेस चलाची संख्या आकाराच्या रुपात पुनरावृत्त होते,त्यास आपण नियम लिहण्यासाठी इंग्रजी अक्षरात दर्शवितो.
2. चलाची किंमत वेगवेगळी असते.त्याची किंमत एकच राहत नाही.
3. a, b, m, n, p, q, x, y, z इत्यादी.चलाराशीला दर्शविण्यासाठी होतो.
4. कोणत्याही अनुभवी परिस्थितीचा संबंध दाखविण्यासाठी चल आपणास मदत करते.
5. जरी त्याची किंमत एकच नसेल तरी चलराशी ही संख्या आहे.अशा स्थिर संख्येच्या मुद्दयात आपण त्यासोबत क्रिया करु शकतो.
6. वेगवेगळ्या क्रिया वापरुन चलराशीची पदावली बनवु शकतो. $2m$, $3s+1$, $8p$, $x/3$ इत्यादी.
7. भुमीतीय सामान्य नियम आणि अंक गणीत हे सामान्य रुपाने व्यक्त करण्याची परवानगी चलराशी आपणास देते.
8. समीकरण चलराशी वरील एक अट आहे.असी अट चलाच्या किंमतीची मर्यादा दाखविते .
9. समीकरणास L.H.S. आणि R.H.S.अश्या दोन बाजु असतात.दोन्ही बाजुच्यामध्ये बरोबर हे चिन्ह असते.
10. समीकरणात एका विशिष्ट किंमतीसाठी L.H.S. ही R.H.S. ला समान असते.
11. समीकरण सोडविण्यासाठी आपण प्रयत्न आणि चुक चा वापर करतो.

SCERT TELANGANA

# परिमीती आणि क्षेत्रफळ

प्रकरण - 10

## 10.1 परिचय

आपण "प्राथमिक भुमितीय आकार", या धड्यात विविध आकाराबद्दल शिकलो.जेंव्हा आपण साध्या आकारा बद्दल बोलतो.तेंव्हा त्यांनी व्यापलेला प्रांत आणि मर्यादेचा विचार करतो.आपणास त्यांच्या आकाराची तुलना करण्यासाठी काही मापाची गरज आहे.चला ते पाहु या.

## 10.1 परिमीती

खालील परिस्थितीचा विचार करा:

1. एक मुलगा वृत्ताकार मार्गाने धावत आहे,त्याने A बिंदु पासुन धावायला सुरुवात केली,आणि A. बिंदु पाशी धावने संपविले.तर त्या मुलाने वृत्ताकरा मार्गाने पार केलेले अंतर त्या मार्गाची परिमीती होते.





2. एका माणसाने त्याच्या शेतास ताराने कुंपण करायेच ठरविले. त्यास आवश्यक असलेल्या तारेची लांबी माहीत करण्यासाठी त्या शेतांची बाजुंची मोजणी केली पाहीजे.यावरुन शेताची परिमीती येते.

बंद आकृतीच्या सिमेच्या लांबीला त्याची परिमीती म्हणतात. आपल्या रोजच्या जीवनात विविध प्रसंगात आपण परिमीतीचा वापर करतो.

### हे प्रयत्न करा



परिमीतीची आवश्यकता असणाऱ्या परिस्थितीची पाच उदाहरणे द्या.

आपण परिस्थिती दुसऱ्या रितीने पाहु.

खाली दिलेल्या आकृती कडे पाहा:




SCERT TELANGANA

तुम्ही तार किंवा दोरी घ्या.दोरीचे योग्य लांबीचे तुकडे करा. दोरीचे तुकडे बाजुवर ठेवा. जेंव्हा सर्व बाजु दोरीने झाकल्या जाईल. तेंव्हा दोरीला एकत्र करुन त्याची लांबी मोजा. दोरीची लांबी ही आकाराच्या भोवतालच्या अंतराला समान असते.

या लांबीला संवृत्त आकृतीची परिमीती म्हणतात.ही तारेची लांबी आकृती तयार करण्यासाठी वापरते.

**आपण म्हणु शकतो की,परिमीती म्हणजे जेंव्हा तुम्ही आकृतीच्या भोवताली जाता तेव्हा संवृत्त आकृतीच्या सिमेवरील कापलेले अंतर होय.**

## हे करा



खालील आकाराची परिमीती काय होईल ?

A बिंदुपासुन सुरु करा आणि प्रत्येक ठिकाणी जागा भरा.




(i) परिमीती = AB + .......... + .......... + ..........

= .......... + .......... + .......... + ..........

= .......... *m*




(ii) परिमीती = AB + .......... + ..........

+ .......... + .......... + ..........

= .......... + .......... + ..........

+ .......... + .......... + ..........

= .......... *m*

आपणास दिसुन येते की,संवृत्त आकृतीची परिमीती पुर्ण रेषा खंडांनी बनते.सर्व बाजुच्या लांबीची बेरीज काढा.

***उदाहरण-1.*** रितु 130 मी.लांब आणि 90मी.असलेल्या बगीच्यात गेली.तिने त्याच्या भोवताली पुर्ण एक फेरी मारली.तिने किती अंतर कापले ?




**सोडवणुक :** रितुने कापलेले एकुण अंतर:

ABCD बगीच्याची परिमीती = AB + BC + CD + DA

= 130 मी .+ 90 मी . + 130 मी . + 90 मी . = 440 मी ..

***उदाहरण-2.*** दिलेल्या आकाराची परिमीती काढा.




***सोडवणुक :*** IJ = DC = 3 मी . EF = HG = 2 मी .

AB = LK = 4 मी . FG = KJ = CB = 1 मी .

AL = BC + DE + FG + HI + JK

= 1 मी . + 2 मी . + 1 मी . + 2 मी . + 1 मी .

= 7 मी .

परिमीती = AB + BC + CD + DE + EF + FG + GH + HI + IJ + JK + KL + LA

= 4 मी . + 1 मी . + 3 मी . + 2 मी . + 2 मी . + 1 मी .

+ 2 मी . + 2 मी . + 3 मी . + 1 मी . + 4 मी . + 7 मी . = 32 मी .

SCERT TELANGANA

### हे प्रयत्न करा



खालील परिमीती माहीत करा:

1. टेबलाची परिमीती काढा त्याच्या बाजुची लांबी 30 सें.मी. 15 सें.मी. 30 सें.मी. आणि 15 सें.मी.अनुक्रमे आहेत.
2. तुमच्या पुस्तकाच्या कवरची लांबी मोजा परिमीती काय आहे ?
3. 100 मी.आणि 70 मी.असलेल्या एका आयताकार बागेचेला तार लावायचा आहे,तारेची किंमत ₹ 20 प्रती मीटर असल्यास एकुण तारेची किंमत माहीत करा ?

### 10.2.1 आयताची परिमीती




ABCD आयात घेऊ या ज्याची लांबी आणि रुंदी अनुक्रमे 15 सें.मी. आणि 10 सें.मी. आहे,तर त्याची परिमीती किती होईल ?

आयाताची परिमीती = चारही बाजुंच्या लांबीची बेरीज

= AB + BC + CD + DA

= AB + BC + AB + BC

= 2 × AB + 2 × BC

= 2 × (AB + BC)

= 2 × (15 सें.मी. + 10 सें.मी.)

= 2 × 25 सें.मी.

= 50 सें.मी.

> आपणास माहीत आहे की,आयताच्या विरुध्द बाजु समान असतात.
>
> म्हणुन AB = CD, AD = BC

आपणास दिसुन येते की




आयाताची परिमीती = लांबी + रुंदी + लांबी + रुंदी

आयाताची परिमीती = 2 × ( लांबी + रुंदी)

आयाताची परिमीती **P = 2 ($l$ + $b$)**

जिथे $l$ = लांबी, $b$ = रुंदी आणि p = आयात.

### हे प्रयत्न करा



खालील आयाताची परिमीती काढा.

| आयाताची लांबी | आयाताची रुंदी | परिमीती सर्व बाजुंची बेरीज | सुत्रानुसार परिमीती 2 × (लांबी + रुंदी) |
|---|---|---|---|
| 20 सें.मी. | 15 सें.मी. | = 20 सें.मी. + 15 सें.मी. + 20 सें.मी. + 15 सें.मी. = 70 सें.मी. | = 2×(20 + 15) = 2 × (35) = 70 सें.मी. |
| 0.7 *m.* | 0.3 मी. | | |
| 22 *cm.* | 18 मी. | | |
| 12.5 मी. | 7.5 मी. | | |

SCERT TELANGANA

**उदाहरण-3.** 36 मी.लांब आणि 24 मी.रुंद असलेल्या आयताकार शेताची परिमीती काढा.

**सोडवणूक :** शेताची लांबी $l = 36$ मी.

शेताची रुंदी $b = 24$ मी.

शेताची परिमीती $= 2(l + b)$

$= 2(36 + 24)$ मी.

$= 2 \times 60$ मी.

$= 120$ मी.

**उदाहरण-4.** आयताची रुंदी काढा ज्याची परिमीती 76 सें.मी.आहे आणि लांबी 26 सें.मी. आहे.

**सोडवणूक :** आयताची परिमीती P = 76 सें.मी.

आयताची लांबी $l$ = 26 सें.मी.

आयताची परिमीती = 2 (लांबी + रुंदी)

म्हणुन 76 = 2 (26 + रुंदी)

26 + रुंदी $= 76 \div 2 = 38$

रुंदी = 38 - 26 = 12 सें.मी.

आयताची रुंदी = 12 सें.मी.

**उदाहरण-5.** आयताकार शेताची लांबी आणि रुंदी अनुक्रमे 22.5 मी. आणि 14.5 मी. तर प्रति ₹ 6 मीटर प्रमाणे चारही बाजुंना कुंपण करण्याचा खर्च काढा.

**सोडवणूक :** शेताची लांबी $l = 22.5$ मी.

शेताची रुंदी $b = 14.5$ मी.

शेताची परिमीती (P) $= 2(l + b)$

$= 2(22.5 + 14.5)$ मी.

$= 2 \times 37$ मी.

$= 74$ मी.

कुंपणाचा खर्च प्रति ₹ 6 मीटर.

= ₹ $(6 \times 74)$

= ₹ 444

**उदाहरण-6.** 32 सें.मी. परिमीती असलेल्या समान मापनाचे किती आयात काढता येईल.

**सोडवणूक :** अर्धी परिमीती $= \frac{32}{2}$ सें.मी. = 16 सें.मी.

आता आपणास लांबी आणि रुंदीची बेरीज 16 सें.मी.असणाऱ्या आयाताची संख्या काढावी लागते.लक्षात ठेवा,बाजु धनापुर्णांक सें.मी.मध्ये आहेत.

सर्व शक्या असलेल्या लांबी आणि रुंदीच्या जोड्या.

(15, 1) (14, 2) (13, 3) (12, 4) (11, 5) (10, 6) (9, 7) (8, 8)

आठ आयात काढता येतात.

SCERT TELANGANA

## हे प्रयत्न करा



1. एका चौरसाकार चित्राच्या चौकटाची बाजु 0.75 मी.आहे,जर रंगाच्या कागदाची किंमत ₹ 20 प्रति मी.असल्यास चौकटीच्या भोवताली रंगीत कागद लावण्याचा खर्च काय येतो?
2. 44 सें.मी. लांबीची एक दोरी आहे.लांबी आणि रुंदी धनपुर्णांक असेल तर किती वेगवेगळी आयात दोरीच्या सहाय्याने बनविता येते ?
3. जर माझ्या जवळ 41 सें.मी. लांब दोरी आहे.त्या दोरीचा पुर्ण वापर करुन मी आयात तयार करु शकतो काय ? कारण द्या.

### 10.2.2 अनियमीत आकाराची परिमीती

बहुबाजु ही रेषाखंडांनी बनलेली एक साधी संवृत्त आकृती आहे. बहुबाजुला नियमीत बहुबाजु म्हणतात. जर त्याच्या सर्व बाजु आणि सर्व कोन समान असतात.

समभुज त्रिकोण हा नियमीत तिन बाजु असलेल्या बहुबाजू आहे.




चौरस हा नियमीत चार बाजु असलेल्या बहुबाजु आहे.चला चौरसाची परिमीती माहीत करण्याचा प्रयत्न करु.

चौरसाच्या बाजु समान असतात.

म्हणुन परिमीती = a + a + a + a

$= 4 \times a = 4a$

**चौरसाची परिमीती = 4 × बाजुंची लांबी (कोणत्याही)**




आता 4 सें.मी. बाजु असलेल्या समभुज त्रिकोणाकडे पहा ?

समभुज त्रिकोणाची परिमीती = (4 + 4 + 4) सें.मी.

= 3 × 4 सें.मी. = 12 सें.मी.

सामान्यता जर समभुज त्रिकोणाच्या बाजुस '$a$' ने दर्शविले तर परिमीती $3 \times a = 3a$.

आपण माहीत करतो की,

**समभुज त्रिकोणाची परिमीती = 3 × बाजुंची लांबी (कोणत्याही)**

SCERT TELANGANA

## हे प्रयत्न करा

1. खालील चौरसाची परिमीती काढा 1 सें.मी ग्रीडवरुन आकृत्या काढल्या.






2. नियमीत आकाराच्या तुमच्या सभोवती असलेल्या वस्तुंची परिमीती काढा.

## नियमीत आकार

भुमितीय आकाराच्या सर्व बाजु आणि सर्व कोन समान असल्यास,त्यास नियमीत आकार म्हणतात. चौरस आणि समभुज त्रिकोण ही नियमीत आकाराची उदाहरणे आहेत. 5-बाजु, 6-बाजु,त्या पेक्षा जास्त बाजु असलेल्या नियमीत आकृत्या असतात.त्यांची परिमीती त्यांच्या बाजुंची बेरीज होय.

सामान्याता आपण बघत असतो,

5-बाजु असलेल्या बहुभुजी (पंचभुजी) ची परिमीती = 5 × कोणत्याही बाजुची लांबी

6-बाजु असलेल्या बहुभुजी (षठभुजी) ची परिमीती = 6 × कोणत्याही बाजुची लांबी

6-बाजु असलेल्या बहुभुजी (अष्ठभुजी) ची परिमीती = 8 × कोणत्याही बाजुची लांबी

### हे करुन करा



8 सें.मी.बाजु असलेल्या नियमीत पंचभुजीची परिमीती काढा.

**उदाहरण-7.** 250 मी.बाजु असलेल्या चौरसाकार बगीच्याला ₹ 20 प्रति मीटरप्रमाणे कुंपण करण्याचा खर्च काढा

**सोडवणुक:** चौरसाकार बगीच्याची परिमीती = 4 × बाजुंची लांबी

= 4 × 250 मी. = 1000 मी.

बगीच्याच्या कुंपणाचा दर = ₹ 20 प्रती मीटर

बगीच्याच्या कुंपणाचा एकुण खर्च = ₹ 1000 × 20 = ₹ 20,000

**उदाहरण-8.** 54 सें.मी.परिमीती असलेल्या समभुज त्रिकोणाची बाजु माहीत करा.

**सोडवणुक :** समभुज त्रिकोणाची परिमीती = 3 × बाजुची लांबा

तर बाजुची लांबी $= \frac{\text{परिमीती}}{3} = \frac{54 \text{ सें.मी.}}{3} = 18$ सें.मी.

**उदाहरण- 9.** एक तारेचा तुकडा 24 सें.मी. लांबीचा आहे. प्रत्येक बाजुची लांबी किती.जर ताराचा उपयोग

(i) समभुज त्रिकोण ? (ii) चौरस ? (iii) अनियमीत षठभुजी?

**सोडवणुक :** (i) समभुज त्रिकोणास 3 समान बाजु असतात.म्हणुन एका बाजुची लांबी काढण्यासाठी तारेच्या लांबीस 3 ने भाग द्यावा लागतो. प्रत्येक बाजु $= \frac{24\ cm.}{3} = 8$ सें.मी.

(ii) चौरसाला 4 समान बाजु असतात,म्हणुन एका बाजुची लांबी काढण्यासाठी तारेच्या लांबीस 4 ने भाग द्यावा लागतो. प्रत्येक बाजु $= \frac{24\ cm.}{4} = 6$ सें.मी.

(iii) नियमीत षठभुजाला 6 बाजु असतात,म्हणुन एका बाजुची लांबी काढण्यासाठी तारेच्या लांबीस 6 ने भाग द्यावा लागतो.

षठभुजाची प्रत्येक बाजु $= \frac{24 cm.}{6} = 4$ सें.मी.

SCERT TELANGANA

## अभ्यासक्रम 10.1

1. खालील प्रत्येक आकाराची परिमीती काढा:




2. खालील प्रत्येक आकाराची परिमीती काढा:




1सें.मी.तारेची किंमत ₹ 15 दिली असता वरील प्रत्येक आकृतीच्या भोवताली तार गुंडाळल्यास किती खर्च येईल.

3. 24 सें.मी.लांब दोरीचे तुम्ही किती वेगवेगळे आयात बनवु शकता ? आणि त्या आयाताच्या बाजुची लांबी सें.मी.मध्ये काय होईल ?

4. फुलांचा बगीचा चौरसाकार असुन त्याची बाजु 3.5 मी.आहे. प्रत्येक बाजुस 4 पदरी कुंपण आहे. ₹ 15 प्रती मीटर प्रमाणे किती दोरी लागेल.

5. तारेचा तुकडा 60 सें.मी लांबीचा आहे. प्रत्येक बाजुची लांबी किती जर दोरी बनविण्यासाठी होतो:

(i) समभुज त्रिकोण

(ii) चौरस

(iii) नियमीत षटभुजी

(iv) नियमीत पंचभुजी

6. बंटी आणि बबली रोज सकाळी धावायला जात असे. बंटी 80 मी.बाजु असलेल्या चौरसाकार बगीचे भोवती फिरायची. बबली 90 मी.लांबी आणि 60 मी. रुंदी असलेल्या आयाताकार बगीचे भोवती फिरायची.जर दोघीजनी 3 फेऱ्या मारत असेल तर कोण जास्त अंतर कापतो आणि कितीने ?

7. आयाताची लांबी रुंदी पेक्षा दुप्पट आहे.जर त्याची परिमीती 48 सें.मी.आहे,तर आयाताचा विस्तार माहीत करा ?

8. त्रिकोणाच्या दोन बाजु 12 सें.मी. आणि 14 सें.मी. त्रिकोणाची परिमीती 36 सें.मी.आहे.तर आयाताचा विस्तार माहीत करा ?

9. खालील प्रत्येक आकाराची परिमीती काढा:

(i) 3 सें.मी., 4 सें.मी.आणि 5 सें.मी.बाजु असणारा त्रिकोण

(ii) 9 सें.मी.बाजु असणारा समभुज त्रिकोण

(iii) 8 सें.मी.दोन्ही समान बाजु आणि तिसरी बाजु 6 सें.मी.असणारा समद्वाभुज त्रिकोण.

SCERT TELANGANA

## 10.3 **क्षेत्रफळ**

खालील दिलेल्या संवृत्त आकृतीकडे पहा. त्या सर्वाचा काही सपाट पृष्ठभाग व्यापलेला आहे. कोणत्याने जास्त जागा व्यापली ते सांगु शकता काय ? त्यावर (✓) मारा:




संवृत्त आकृतीने व्यापलेल्या पृष्ठभागास क्षेत्रफळ असे म्हणतात.

वरील जोडीच्या आकृतीत कोणत्या आकृतीचे क्षेत्रफळ जास्त आहे. हे सांगु शकतो पण हे नेहमी शक्य आहे का ?




आता बाजुच्या आकृतीकडे पहा.

कोणत्या आकृतीचे क्षेत्रफळ जास्त आहे ? हे सांगणे सोपे नाही. चला आलेख कागदाचा वापर करु.

आकार (ii) घ्या आणि त्यास आलेखाच्या कागदावर ठेवा.जेथे प्रत्येक चौरस 1 सें.मी. × 1 सें.मी. असतो.




आकृतीची बाहेरील रेषा मारा.आम्ही तुमच्यासाठी एक तयार केली.

आकृतीने जागा व्यापलेले चौरस पहा. त्यापैकी काही पुर्ण झाकलेले आहेत. काही अर्धे,काही अर्ध्यापेक्षा कमी,काही अर्ध्यापेक्षा,जास्त पुर्णपणे झाकलेले चौरस आकृती (iii) मध्ये दाखविले आहे.




आपणास माहीत आहे की क्षेत्रफळ म्हणजे आकारानी झाकलेल्या सें.मी. चौरसाची एकुण संख्या.

परंतु येथे एक प्रश्न दिसत आहे. तुम्ही मोजलेल्या क्षेत्रफळात चौरस पुर्णपणे बसत नाही. काही पुर्णपणे बसतात तर काही कमी प्रमाणात तर काही जास्त प्रमाणात या प्रश्नाला सांप्रदाय स्विकारुन सोडविता येते.

- क्षेत्रफळाचा भाग हा चौरसाच्या अर्ध्यापेक्षा कमी असल्यास सोडुन द्या.
- जर चौरसाच्या अर्ध्यापेक्षा जास्त भाग असल्यास त्या एक चौरस मोजा.
- जर अर्ध्या चौरस नक्कीच असेल तर त्यास ½ चौरस एकक असे मोजा.
- पुर्ण चौरसाच्या क्षेत्रफळास 1 चौरस एकक घ्या.जर तो कागद सेंटीमीटरमध्ये असल्यास पुर्ण चौरसाचे क्षेत्रफळ हे चौरस सेंटीमीटर होते.

अशा रुढी (परंपरा) ने येणाऱ्या क्षेत्रफळाची माहीती पक्की मिळते.आणि अपुर्ण माहीतीस वगळता येते.

SCERT TELANGANA

आकृती (iii) मधील चौरस मोजुन खालील तक्ता भरा.

| | **झाकलेले क्षेत्रफळ** | **चौरसांची संख्या** | **अंदाजे क्षेत्रफळ (चौ.एकक)** |
|---|---|---|---|
| (i) | पुर्ण भरलेले चौरस | 11 | 11 |
| (ii) | अर्धे भरलेले चौरस | 2 | $2 \times \frac{1}{2}$ |
| (iii) | अर्ध्यापेक्षा जास्त भरलेले चौरस | 8 | 8 |
| (iv) | अर्ध्यापेक्षा कमी भरलेले चौरस | 3 | 0 |

आपण कोणत्याही दोन आकाराची तुलना आलेख कागदावरील बाहेरील रेषेने चौरसाची व्यापलेली संख्या मोजुन करता येते.

एकुण जागा $= 11 + 2 \times \frac{1}{2} + 8$

$= 20$ चौ.एकक

## हे प्रयत्न करा



चौरसाची संख्या मोजुन खालील आकृतीचे क्षेत्रफळ काढा.




## हे करा



1. आलेखाच्या कागदावर, पानाचा आकार, पुष्पदळ आणि अशाप्रकारचे दुसरे आकार काढुन त्यांचे क्षेत्रफळ काढा.
2. आलेख कागदावर रेखाचित्र काढा. चौरसाची संख्या मोजुन त्याचा उपयोग त्या प्रांताचा अंदाजे क्षेत्रफळ माहीत करण्यासाठी करा.

### 10.3.1 आयताचे क्षेत्रफळ




चौरस कागदावरुन 7 सें.मी.लांबी आणि 4 सें.मी.रुंदी असलेल्या आयताचे क्षेत्रफळ सांगु शकतो.

1 सें.मी. × 1 सें.मी.चौरस मापाचा आयात पुर्णपणे 28 चौरस व्यापतो.

∴ आयताचे क्षेत्रफळ = 28 चौ.सें.मी.

SCERT TELANGANA

आपणा, दिसुन येते की  प्रत्येक रांगेत 7 चौरस आहेत.अशा 4 रांगा आहेत.

यास आपण 7 × 4 चौ.सें.मी.असे लिहतो. (लांबी × रुंदी) = 28 चौ.सें.मी.




| क्र.सं. | लांबी | रुंदी | क्षेत्रफळ (एकुण चौरसांची संख्या) | लांबी × रुंदी |
|---|---|---|---|---|
| 1. | 3 | 4 | 12 | 12 |
| 2. | | | | |
| | | | | |

3.वरील चर्चा करा आणि निकालारुन

**आयताचे क्षेत्रफळ = लांबी × रुंदी**

आलेखाच्या कागदाचा वापर न करता,आपण आपण आयताचे क्षेत्रफळ माहीत करु शकतो.उदा.जर आयताची लांबी 6 सें.मी.आणि रुंदी 4 सें.मी.आहे,तर

आयताचे क्षेत्रफळ = लांबी × रुंदी

= 6 सें.मी. × 4 सें.मी .= 24 चौ.सें.मी.

## हे प्रयत्न करा



1.सारख्या परिमीतीचे दोन वेगवेगळे आयात काढा.त्याच्या क्षेत्रफळाची तुलना करा.

ते समान आहेत का ? सारख्या परिमीतीचे दोन वेगवेगळे चौरस काढु शकता काय ?

## हे करा



1. क्षेत्रफळ काढा:

(i) तुमच्या वर्गातील फरशीचे. (ii) तुमच्या घरातील दरवाजाचे

(iii) तुमच्या वर्गातील फळ्याचे

### 10.3.2 चौरसाचे क्षेत्रफळ

4 सें.मी.बाजु असणारा चौरस घेऊ या.आपण त्यास सें.मी.च्या आलेख कागदावर ठेवले असता आपणास काय आढळुन येते ?

तो 16 चौरस कापतो




चौरसाचे क्षेत्रफळ = 4 × 4 चौ.सें.मी. = 16 चौ.सें.मी.

प्रत्येक रांगेत चार चौरस आहेत.चार रांगा आहेत.

SCERT TELANGANA

म्हणुन क्षेत्रफळ $= 4 \times 4$ चौ.सें.मी.

आपणास ठाऊक आहे की, चौरस हा आयाता सारखाच आहे.ज्यात एक विशेष अट आहे की,लांबी आणि रुंदी

## हे प्रयत्न करा



चौरसाच्या एका बाजुची लांबी दिलेली आहे.आलेखाच्या कागदाचा वापर करुन त्याचे क्षेत्रफळ का

(i) 4 सें.मी. (ii) 6 सें.मी. (iii) 2 सें.मी. (iv)

नियमाचा वापर करुन क्षेत्रफळ काढा आणि त्याची तुलना करा.

**चौरसाचे क्षेत्रफळ = लांबी × रुंदी**

$=$ (बाजु)$^2$

उत्तर मिळतं-जुळतं आहे.

***उदाहरण-10.*** 144 सें.मी.लांब आणि 100 सें.मी.रुंद जागेवर बसविण्यासाठी 12 सें.मी.आणि 5 सें.मी.मापाच्या किती टाईल्स (tile) ची आवश्यकता आहे.

***सोडवणुक :*** जागेची लांबी $= 144$ सें.मी.

जागेची रुंदी $= 100$ सें.मी.

जागेचे क्षेत्रफळ $= 144$ सें.मी. $\times$ 100 सें.मी.

$= 14,400$ चौ.सें.मी.

1 टाईलची लांबी $= 12$ सें.मी.

1 टाईलची रुंदी $=$ सें.मी.

1 टाईलचे क्षेत्रफळ $= 12$ सें.मी. $\times$ 5 सें.मी.

$= 60$ चौ.सें.मी.

$\therefore$ आवश्यक टाईल्सची संख्या $= \dfrac{\text{जागेचे क्षेत्रफळ}}{\text{1 टाईलचे क्षेत्रफळ}} = \dfrac{14400}{60}$

$= 240$ टाईल

***उदाहरण-11.*** आयाताची आणि चौरसाची परिमीती सारखी आहे जर आयाताची लांबी आणि रुंदी अनुक्रमे 35 सें.मी. आणि 25 सें.मी.असल्यास कोणत्या आकृतीचे क्षेत्रफळ जास्त आहे.आणि किती जास्त आहे.

***सोडवणुक :*** आयाताची परिमीती $= 2$ (लांबी × रुंदी)

$= 2(35 + 25) = 2 \times 60 = 120$ सें.मी.

$\therefore$ चौरसाची परिमीती $= 120$ सें.मी.

आता चौरसाची बाजु $= \dfrac{120}{4} = 30$ सें.मी.

$\therefore$ चौरसाच क्षेत्रफळ $=$ (बाजु)$^2 = (30)^2 = 900$ चौ.सें.मी.

आयाताचे क्षेत्रफळ $=$ लांबी × रुंदी

$= 35 \times 25 = 875$ चौ.सें.मी.

अशा प्रकारे चौरसाचे क्षेत्रफळ जास्त आहे ते (900 - 875) चौ.सें.मी. $= 25$ चौ.सें.मी.

SCERT TELANGANA

**उदाहरण-12.** आयाताचे क्षेत्रफळ काढा त्याची लांबी 4 मी. आणि रुंदी 68 सें.मी. आहे. क्षेत्रफळ चौ.सें.मी मध्ये काढा.

**सोडवणुक :** आयाताची रुंदी = 68 सें.मी.

आयाताची लांबी = 4 मी. = 400 सें.मी.

आयाताचे क्षेत्रफळ = लांबी × रुंदी

= 400 × 68 चौ.सें.मी.

= 27, 200 चौ.सें.मी.

**उदाहरण-13.** आयाताकार बगीच्याचे क्षेत्रफळ 40 मीटर असुन लांबी 1120 चौ.सें.मी. आहे,तर बगीच्याची रुंदी काढा ?

**सोडवणुक :** आयाताचे क्षेत्रफळ = 1,120 चौ.सें.मी.

आयताची रुंदी = 40 मी.

आयाताचे क्षेत्रफळ = लांबी × रुंदी

म्हणुन रुंदी = $\frac{\text{क्षेत्रफळ}}{\text{लांबी}} = \frac{1120}{40}$ = 28 मी.

**उदाहरण-14.** 5 मी.लांब आणि 4 मी.रुंद जमिनीच्या तुकड्यात 1मी.बाजु असलेल्या पाच फ्लावर बेड्ससाठी जागा खोदली,तर उरलेल्या जमिनीच्या तुकड्याचे क्षेत्रफळ काय आहे ?

**सोडवणुक :** जमिनीच्या तुकड्याचे क्षेत्रफळ = लांबी × रुंदी

= 5 × 4 चौ.सें.मी.

= 20 चौ.सें.मी.

1 चौरसाकार फ्लावर बेडचे क्षेत्रफळ = 1 चौ.सें.मी.

म्हणुन 5 चौरसाकार फ्लावर बेडचे क्षेत्रफळ = 5 चौ.सें.मी.

उरलेली जागा = 20 - 5 = 15 चौ.सें.मी.

## अभ्यासक्रम 10.2

1. खालील दिलेल्या बाजुवरुन आयाताचे क्षेत्रफळ काढा:

(i) 50 सें.मी.आणि 20 सें.मी.

(ii) 65 मी. आणि 45 मी.

(iii) 25 सें.मी. आणि 16 सें.मी.

(iv) 7 कि.मी. आणि 19 कि.मी.

2. खालील दिलेल्या बाजुवरुन चौरसाचे क्षेत्रफळ काढा:

(i) 26 मी. (ii) 17 कि.मी.

(iii) 52 सें.मी. (iv) 8 सें.मी.

3. आयाताकार चौकटीचे क्षेत्रफळ 1,125 चौ.सें.मी. आहे,जर रुंदी 25 सें.मी.तर त्याची लांबी किती ?

SCERT TELANGANA

4. आयताकार शेताची लांबी 60 मी.आहे.आणि रुंदी लांबीच्या अर्धी आहे. तरशेताचे क्षेत्रफळ काढा.

5. एका चौरसाच्या कागदावरील परिमीती 40 सें.मी.आहे त्याच्या बाजुची लांबी काय आहे ? चौरसाच्या कागदाचे क्षेत्रफळ सुद्धा माहीत करा ?

6. आयताकार प्लॉटचे क्षेत्रफळ 2400 चौरस मिटर आहे, आणि त्याची लांबी त्याच्या रुंदीच्या $1\frac{1}{2}$ पट आहे तर त्याची परिमीती किती ?

7. खोलीची लांबी आणि रुंदी अनुक्रमे 6 मी.आणि 4 मी. आहे. खोलीची पुर्ण फरशी झाकण्यासाठी किती चौरस मिटरची सतरंजी पाहीजे ? जर सतरंजीची किंमत ₹ 240 चौरस सेंटी मीटर आहे तर फरशीला झाकण्यासाठी लागणाऱ्या सतरंजीची एकुण किंमत काय होईल ?

8. दोन्ही शेताची परिमीती समान आहे,एक 72 मी.बाजुचा चौरस आहे,आणि दुसरा 80 मी. लांबीचा आणि 60 मी. रुंदी असलेला आयात आहे. कोणत्या प्लॉट (जागे) चे क्षेत्रफळ अधिक आहे आणि कितीने जास्त आहे ?

9. चौरसाचे क्षेत्रफळ 49 चौ.सें.मी.आहे,आयताची आणि चौरसाची परिमीती सारखी आहे.जर आयताची लांबी 9.3 सें.मी.असल्यास त्याची रुंदी काय आहे ? कोणाचे क्षेत्रफळ जास्त आहे हे सुध्दा माहीत करा ?

10. राहुलचे स्वताचे आयताकार शेत 400 मी.लांब 200 मी.रुंदी आहे,त्याचा मित्र रामुचे स्वताचे चौरसाकार शेत 300 मी.लांबीचे आहे. ₹150 प्रति मीटर प्रमाणे दोन्ही शेतांच्या कुंपणाचा खर्च काढा,जर10 चौ.सें.मी. क्षेत्रफळात एक झाड लावल्या. कोणत्याच्या शेतात जास्त झाड लावु शकतो ? किती जास्त झाड लावु शकतो ?

11. आयताकार फर्शीची लांबी 20 मी.आहे,ती रुंदीपेक्षा जास्त आहे,जर फर्शीची परिमीत 280 मी.असल्यास त्याची लांबी किती ?

12. एक आयताकार जमिनीचा तुकडा 240 मी.गुणीला 200 मी.आहे,कुंपणाचा खर्च ₹30. प्रती मीटर आहे.पुर्ण शेतास कुंपण घालण्यासाठी किती खर्च येईल ?

13. चौरसाकार शेताची बाजु 120 मी.आहे,गवताचे लॉन बनविण्याचा खर्च ₹35 प्रति चौ.मी. आहे.पुर्ण शेताचे लॉन बनविण्याचे असल्यास किती खर्च येतो ?

14. आयाताचे क्षेत्रफळ काय होते,जेव्हा

(i) त्याची लांबी आणि रुंदी दुप्पट असल्यास ?

(ii) त्याची लांबी दुप्पट आणि रुंदी तिप्पट असल्यास ?

15. चौरसाचे क्षेत्रफळ काय होईल,जेव्हा त्याची बाजु:

(i) दुप्पट (ii) अर्धे

SCERT TELANGANA

## आपण काय चर्चा केली ?

1. परिमीती म्हणजे सिमेवरील वापरलेले अंतर ज्यामुळे संवृत्त आकृती बनते,जेव्हा तुम्ही सभोवताली जाता.

2. (i) आयताची परिमीती = 2 × (लांबी + रुंदी)
   (ii) चौरसाची परिमीती = 4 × बाजुची लांबी
   (iii) समभुज त्रिकोणाची परिमीती = 3 × कोणत्याही बाजुची लांबी

3. (i) ज्या आकृतीत पुर्ण बाजु आणि कोन समान असतात,त्यास नियमीत संवृत्त आकृती म्हणतात
   (ii) नियमीत आकृतीची परिमीती ही बाजुची,संख्येची त्याच्या प्रत्येक बाजुच्या आकाराच्या वेळा असते.

4. आकृतीचे क्षेत्रफळ माहीत करण्यासाठी खालील रुढी (रिती) असतात.

5. क्षेत्रफळाचा तो भाग जो अर्ध्या चौरसाने बनलेला आहे,तो सोडुन देणे:
   (i) जर अर्ध्यापेक्षा जास्त चौरस जलोन असल्यास त्यास एक चौरस मोजणे.
   (ii) जर क्वचित अर्धापेक्षा जास्त चौरस भरत असेल तर त्याचे क्षेत्रफळ एक चौरस एकक घेणे.
   (iii) जर क्वचित अर्धापेक्षा जास्त चौरस भरत असेल तर त्याचे क्षेत्रफळ $\frac{1}{2}$ चौरस एकक घेणे.

6. (i) आयाताचे क्षेत्रफळ = लांबी × रुंदी
   (ii) चौरसाचे क्षेत्रफळ = बाजु × बाजु
   (iii) चौरसाचे क्षेत्रफळ हे दुसऱ्या कोणत्याही मापनाच्या ज्याची परिमीती समान आहे.जास्त असते.




SCERT TELANGANA

# गुणोत्तर आणि प्रमाण

## 11.1 परीचय

आपल्या दैनेदीन जिवनात आपण राशिची तुलना वेगवेगळ्या पद्धतीने करतो. कोणता भाजीपाला ताजा दिसतो.कोणता महाग आहे,कोणता योग्य दरात आहे.इत्यादची तुलना आपण करतो;चला काहि उदाहरण घेवु या ..

सत्या आणि मधुकर दररोज शाळेत जान्यापुर्वी दुध पित होते. सत्या एक कपात 2 चमचे साखर मिळवत होता.मधुकर त्याच दुधात 1 एक चमचा साखर मिळवत होता.कोणते दुध जास्त गोड आहे. दुधाची चव न घेता सांगु शकतो का ?




शारदाने 2 कप दुधात 3 चमचे साखर टाकली. या तिन्ही मध्ये दुधाच्या गोड पनाची तुलना कशी कराल.?खालील परिस्थीती पहा.




सिरिज जवळ 8 वह्या आहेत आणि रवि जवळ16 वह्या आहे वह्याची तुलना करण्यासाठी,रविला त्यातील फरक माहित करुन तुलना करतो आणि भागाकार करुन त्याची तुलना करतो. एक राशि दुसऱ्या राशीपेक्षा किती मोठी किंवा किती लहान याची तुलना वजाबाकीने आणि भागाकाराने करता येते. उदाहरणे द्या जेथे आपण राशिचि तुलना वजाबाकीने आणि भागाकाराने करतो.जर आपन मुंगी आणि नाकतोडा याची तुलना केली,लांबीतील फरक तुलना दर्शवत नाही.नाकतोड्याची लांबी जवळ जवळ 4 ते 5 सें.मि.ही खुप मोठी आहे. त्या तुलनेत मुंगीची लांबी खुप कमी आहे. फक्त मीली मीटर मधे असते. लांबीतील फरक फक्त 4 सेंटी मिटर असते. तो फरक स्वत खुप मोठा फरक दिसत नाही जर आपण प्रयत्न किती .मुंग्या एका मागे एक ठेवल्या आसता नाकतोड्याच्या लांबीला मिळते जुळते तेव्हा तुलना थोडी चांगली वाटते तेव्हा आपण सांगु शकतो कि 15



SCERT TELANGANA

ते 20 मुंग्या एकत्र केल्या असता नाकतोड्याच्या लांबी एवढे होते.

दुसरे उदाहरण घ्या

एका कारची किमंत 2,50,000 रुपये आणि मोटार सायकलची किमंत 50,000 रुपये आहे. किमंती मधील फरकास घेवुन आपन किमंतीची तुलना केली असता फरक 2,00,000 रुपये आहे. फरकातील वाढ समजन्यासाठी याची आपणास मदत होत नाही. जर आपन भागाकाराने तुलना केल्यास $\frac{2,50,000}{50,000} = \frac{5}{1}$ रुपये म्हणजे प्रत्येक कारच्या किमंतीमध्ये 5 मोटार सायकली विकत घेवु शकतो. अशा प्रकारे तुलनाकरण्यापेक्षा चांगले आहे .

**चला अजुन एक उदाहरण घेवु या.**

लता 3 वर्षाची आहे आणि करीम 18 वर्षाचा आहे. आपन म्हणु शकतो कि करीम लता पेक्षा 15 वर्षाने मोठा आहे. रहिम 65 वर्षाचा आणि रेषमा 50 वर्षाची तुलना करा. दोन्ही घटनेत वयामधील फरक 15 वर्षाचा आहे स्पष्टपणे कितीही असु द्या. लता आणि करीम मधिल फरक वेगळया प्रकारचा आहे. हे आपन चांगल्या प्रकारे सांगु शकतो कि करीम हा लता पेक्षा सहा पट मोठा आहे. अशा प्रकारच्या तुलनेत आपण वस्तुची तुलना भागाकाराने करतो. त्याला गुणोत्तर असे म्हणतात. या धड्यात आपन गुणोत्तराबद्दल तपशिलपणे शिकणार आहोत. दुसरं उदाहरण जेथे अशा प्रकारची तुलना नकाशा तयार करण्यासाठी वापरतो. नकाशाकडे पहा.




नकाशात दाखविलेली ठिकाने त्यांच्या वास्तविक अंतरानी नकाशात दाखविलेले अंतर याची तुलना आपनास नकाशाच्या मापावरुन होते. उदा. जर गल्ली किंवा बाजारासाठी माप 1 से.मी. बरोबर शंभर मीटर घेतल्यास आपनास माहित होते कि नकाशातील अंतर वास्तविक आंतराचे दहा हजार आहे दुसऱ्या शब्दात वास्तविक अंतर नकाशातील अंतराच्या 10,000 पट आहे. जर आपण नकाशतील अंतराची वास्तविक अतराशी तुलना केल्यास आपन म्हणतो कि नकाशातिल अंतराची 5 सें मि.हे 500 मिटर दर्शविते. फरकाने तुलना केल्यास आपनास माहित होते कि वास्तविक अंतर 499 मिटर 95 से. मी.शब्दात जे नकाशा वरील अंतरापेक्षा जास्त आहे विधानाची तुलना केली असता वास्तविकअंतर हे नकाशाच्या 10,000 पट हे विधान जास्त कळवीत नाही.

पहिल्या उदाहरणात सिरीच्या पुस्तकाचे रविच्या पुस्तकाशी गुणोत्तर 16/8 = 2/1 = 2 : 1

आपन त्यास दोनास एक असे वाचता.

राशीच्या पुस्तकाचे गुणोत्तर विचारले असता उतर- 8/16 = 1/2 = 1 : 2 येते

SCERT TELANGANA

## प्रयत्न करा



उदाहरणाचे निरीक्षण करा

रिकाम्या जागा भरा



| क्रम संख्या | पहिली राशी | दुसरी राशी | तुलणा केलेले विधाण | गुणोत्तर टोपली | क्रम बदलुन तुलन | गुणोत्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 सफरचंद | 6 सफरचंद | पहिली टोपली दुसरी टोपलीतील सफरचंदाच्या एकतृतीअंश आहे. ` | 1 : 3 | दुसरी टोपली पहिली टोपलीतील सफरचंदाच्या एकतृतीअंशआहे | 3 : 1 |
| 2 | 500g तांबे | 1000g लोखंड | | | | |
| 3 | किमत T-शर्ट ₹200 | किमत कोट ₹1000 | | | | |

### 11.2 राशीची तुलना दुसऱ्या एककाने करने

झाडाची उंची 13 मी. आहे आणि त्याचे चीत्र पुस्तकात 26 से.मी.लांबीचे आहे. आपन म्हणु शकतो की चित्रातील झाडाची उंची तिच्या वास्तविक उंचीच्या दुप्पट आहे ?

स्पष्टपणे नाही आपनास माहित आहे की झाडाची वास्तविक चित्राच्या उंची पेक्षा जास्तमोठी आहे.

झाडाची उंची 13 मीटर आहे म्हणजे 1300 से.मी. आणि चित्रातील झाडाची उंची फक्त 26 से.मी..आहे.

आता उंची मधील गुणोत्तर 1300 / 26 = 50 : 1

म्हणुन आपन म्हणु शकतो की झाडाची वास्तवीक उंची ही 50 पट आहे.

आपण जेव्हा दोन राशीची तुलना करतो तेव्हा त्या एकाच एककात असल्या पाहिजे.

सामाण्यत a आणी b या दोन राशीचे रुणोत्तर **a : b** असे लिहितात. त्यास आपण **a** ला **b** आहे असे वाचतो. **a** आणी **b** यास दोन राशींच्या गुणोत्तराची पदे म्हणतात. पहिली राशी 'a' ला प्रथम पद किंवा 'b'द्वितीय पद किवा उत्तरपद राशी म्हणतात.

**उदाहरण** .रफी जवळ 16 लाल आणि रंगाच्या 4 नीळ्या काचेच्या गोळ्या आहेत. लाल आणी नीळ्या रंगाच्या गोळ्याचे गुणोत्तर काढा?

**सोडवणुक:**लाल गोळ्या **:** नीळ्या गोळ्या = 4 : 1

लाल गोळ्याची संख्या नीळ्या गोळ्याच्या 4 या पट आहे

SCERT TELANGANA

## प्रशन संग्रह - 11.1

1. खालिल तक्ता पुर्ण करा

| क्रमसंख्या | पहिली राशी | दुसरी राशी | गुणोत्तर |
|---|---|---|---|
| (i) |  |  | 3 : 5 |
| (ii) |  |  | |
| (iii) |  |  | |
| (iv) |  |  | |
| (v) |  |  | |

2. तुलना करा :



(i) निळ्या रंगाचे चौरसाची संख्या लाल रंगाच्या चौरसाच्या संख्याच्या ________ पट आहे.

(ii) लाल रंगाच्या चौरसाची संख्या निळ्या रंगाच्या चौरसाच्या संख्येचे गुणोत्तर________आहे.

(iii) निळ्या रंगाच्या चौरसाच्या संख्येचा लाल रंगाच्या चौरसाच्या संख्येशी गुणोत्तर काढा? 4 खालिल सोडवा

(i) एका दुधवाल्याने 1 एक लिटर दुधात 2 50 मि.ली. पाणी मिसळले तर पाण्याशी दुधाचे गुणोत्तर काढा?

(ii) सत्याच्या आईने 4 किलो दाळ आणि 50 ग्राम तीखट घेतली तर तीखट आणि दाळीच्या वज़नाचेगुणोत्तर काढा?

(iii) राणीला घरापासुन शाळेत जायला 30 मिनीटे लागतात. ईस्माईल तेच अंतर ½ तासात पार पाढते. राणी ने घेतलेला वेळेचे ईस्माईल ने घेतलेलावेळेशी गुणोत्तर काढा?.

### 11.3 वेगवेगळ्या संदर्भात गुणोत्तर

स्लोक 6 व्या वर्गात आहे. तिच्या जवळ 50 रुपये आहेत. महेश सुद्धा त्याच वर्गात आहे. त्याच्या जवळ100 रुपये आहे. गावातींल पैसे संचयीका मध्ये बचत करण्याचे ठरविले. त्याची शाळेमध्ये बचत योजना आहे. त्यांची रक्कम जमा केल्यानंतर त्याला कळूण आले कि त्यांच्या वर्गातील एकुन विद्यार्थीनी बचत केलेले रक्कम 2000 बचत रुपये आहे त्यांनी एकमेकाशी तुलना केली असता स्लोकचे बचत आणि

एकुन बचत महेशच्या बचतीशी गुणोत्तर = 50:100

स्लोकाची बचत आणी एकुन बचतीशी गुणोत्तर = 50:2000,

महेश बचत आणि एकुण बचतीशी गुणोत्तर = 100: 2000

SCERT TELANGANA

चौरसाकृती रेषेचा कागद घ्या. फासा (dice) फेका आणि फास्यावरिल संखेची नोद घ्या. नोंदलेल्या संख्येनुसार चौरसांना आवडत्या रंगाने भरा. तुमच्या मित्राला फासा फेकण्यास सांगा. आणि चौरसाला दुसऱ्या रंगाने भरा .

1. तुम्ही रंग भरलेल्या चौरसांना संख्येचे तुमच्या मित्रांनी भरलेल्या चौरसांच्या संख्येशी गुणोत्तर काढा.?______________
2. तुम्ही रंग भरलेल्या चौरसांचे तुम्ही रंग भरलेल्या एकुण चौरसांशी गुणोत्तर काढा.?_______________
3. तुमच्या मित्रांनी भरलेल्या चौरसांचे रंग भरलेल्या एकुण चौरसांशी गुणोत्तर काढा.? ____________________.
4. तुम्ही इतर दुसरे गुणोत्तर या कृतीत माहित करु शकता ? विचार करा आणि तुमच्या मित्राशी चर्चा करा. ? .आणि दिलेल्या आकृति वरुन गुणोत्तर काढा.?



### प्रयत्न करा

(i) गडद केलेल्या भागाचे गडद न केलेल्या भागाशी
(ii) गडद केलेल्या भागाचे एकुण भागाशी
(iii) गडद केलेल्या भागाचे एकुण भागाशी





## 11.4 निरनिराळ्या स्थितीत सारखे गुणोत्तर

खालील घेवु या.

- खोलीचि लांबी 30 आणि त्याची रुंदी 20 मिटर आहे म्हणुन खोलीच्या लांबीचे खोलीच्या रुंदीशी गुणोत्तर $= \frac{30}{20} = \frac{3}{2}$ सारखे आहे 3 : 2
- विहार यात्रेला 24 मुली आणि 16 मुले जात आहेत. मुलींच्या संख्येचे मुलांच्या संख्येशी गुणोत्तर $= \frac{24}{16} = \frac{3}{2}$ म्हणजे 3 : 2

दोन्ही उदा- गुणोत्तर 3 : 2.आहे.

- 30 : 20 आणि 24 : 16, गुणोत्तरास संक्षिप्त रुपात 3 : 2. येईल अशी नोंद करा. ही समान गुणोत्तर आहे.

3 : 2 गुणोत्तर असणाऱ्या दुसऱ्या उदाहरणाचा विचार करु शकता का.?

अशा परिस्थीतला लिहिने हास्यास्पद आहे. जे निश्चीत गुणोत्तर वाढवितात. उदाहरणात 2 : 3. येणारी अशी स्थीती लिहा. आम्ही दोन दिली तुम्ही अजुन 3 उदाहरणे लिहा.

- दोन टेबलाच्या रुंदी आणि लांबीचे गुणोत्तर 2 : 3.
- गुणोत्तराशीना जवळ 2 कंच्या आणि तिची मैत्रिन शबनम जवळ 3 आहेत.

SCERT TELANGANA

**उदाहरण-2.**गणिताच्या वर्गात 16 मुलं आणि 20 मुली आहेत. मुलांच्या संख्येचा मुलाच्या संख्येशी गुणोत्तरकाढुन त्यास संक्षिप्त रुपात लिहा.

**सोडवणुक :** मुलांच्या आणि मुलिंच्या संख्यचे गुणोत्तर = 16: 20

$$= \frac{16}{20} = \frac{2\times2\times2\times2}{2\times2\times5} = \frac{4}{5}$$

**संक्षिप्त रुप 4 : 5 आहे.**

गुणोत्तरास संक्षिप्त रुप किंवा सुक्ष्मरुप म्हणतात. जेव्हा त्यास आपण पुर्ण संख्येच्या रुपात लिहीतो. आणि त्याच्या शिवाय कोणताही सामान्य अवयव राहत नाही.

## प्रयत्न करा.



1. खालील सारणी पुर्ण करा.

| गुणोत्तर | 1:2 | 2:3 | 5:7 | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 वेळा | 1:2 | | | | |
| 2 वेळा | | 4:6 | | | |
| 3 वेळा | | | 15:21 | | |
| 4 वेळा | | | | 12:16 | |
| 5 वेळा | | | | | 20:25 |

2. खालिल सारणी पुर्ण करा.

हे पहिले भरा

1 रुपया = .... पैसे

1000ग्र. = .........कि.ग्र.

1 तास = ...........मिनीटे

100सें.मी.. = .......मी.

1 ..मिनीट = .......सेकंद

10 मि.मी.. = ......सें.मि.

| क्रम सं | पहिलीराशि | दुसरिराशि | गुणोत्तर | संक्षिप्त गुणोत्तर |
|---|---|---|---|---|
| 1. | 20 पैसे | 1 रुपया 1 | | |
| 2. | 800 ग्र. | 1 .कि.ग्र. | | |
| 3 | 1 .तास. | 30 मिनीटे | | |
| 4. | 2 मी. | 125 सें.मी.. | | |
| 5. | 3 .मिनीटे | 45 सेकंद. | | |
| 6. | 30 मि.मी... | 1 .सें.मि. | | |

**आठवण ठेवा.**

गुणोत्तर हे दोन राशीची एकाच एककात केलेली तुलना आहे

3.खालील आकृतीतील गडद केलेल्या भागाचे गडद न केलेल्या भागाशी गुणोत्तर संक्षिप्त रुपात व्यक्त करा.



(i)



(ii)



(iii)

SCERT TELANGANA



(iv)



(v)



(vi)

## प्रश्न संग्रह - 11.2

1. खालिल गुणोत्तरास त्याच्या संक्षिप्त रुपात लिहा.

   (i) 2:3 (ii) 16:20 (iii) 5:6

   (iv) 20:60 (v) 8:15 (vi) 19 : 2

2. एका पिशवीत 20 कि.ग्रा.तांदुळ आणि दुसऱ्या पिशवीत 60 कि.ग्रा.गहु आहेतं तर तांदळाचे गव्हाशी गुणोत्तर काढा. तांदळाचे एकुण वजनाशी गुणोत्तर काढा.?

3. समजा एका वर्गात 32 विद्यार्थी आहेत. त्या पैकी 12 मुली आहेत तर.

   (i) मुलांच्या संख्येचा मुलीच्या संख्येशी गुणोत्तर काढा

   (ii) मुलांच्या संख्येचा एकुण विद्यार्थ्याशी गुणोत्तर काढा.

   (iii) मुलीच्या संख्येचा एकुण विद्यार्थ्याशी गुणोत्तर काढा.

4. चार बाजु असलेली संवृत आकृती काढुन त्यास काही समान भागात विभाजन करा.आकृतीस कोणत्याही रंगाने असे गडद करा कि गडद केलेल्या भागाचे गडद न केलेल्या भागाशी गुणोत्तर 1:3 आले पाहिजे .अजुन दोन आकृत्या वेगवेगळ्या आकृत्या काढुण असे करुन पहा.

5 इमरानने 2 लीटर तेल आणि विजयने **500** मी.ली. तेल आणले. इमरानने आणलेल्या तेलाच्या राशीचेविजयने आणलेल्या तेलाशी गुणोत्तर काढा .

6 अब्राहमचे वजन 20 कि.ग्रा. आहे आणि त्याच्या वडिलाचे वजन कि.ग्र.आहे.तर अब्राहम आणि त्याच्या वडिलाच्या वजनाचे गुणोत्तर काढा संक्षिप्त रुपात व्यक्त करा.

7 रामु त्याच्या पैशाचा 2/5भाग कथेच्या पुस्तकावर खर्च करतो. खर्च केलेल्या पैशाच्या सुरवातीला त्याच्या जवळ असलेल्या पैशाच गुणोत्तर काढा.?

### 11.5 दिलेल्या गुणोत्तरात दिलेल्या राशिंचा भागाकार.

**उदाहरण -3.**श्रद्धाच्या दिलेल्या वाढदिवसाला तिच्या वडिलाने एक पुष्पगुच्छ आणला. त्यात सर्व 18 फुलं होती. जर लाल फुलांचे पिवळया फुलांशी गुणोत्तर 1 : 2 असेल तर त्यांची संख्या काढा ?.

**सोडवणुक :** लाल फुलांचे पिवळया फुलांशी गुणोत्तर = 1: 2

एकुण भाग = 1+2 = 3 भाग

एकुण फुलांची संख्या = 18 फुलें

3 भाग = 18 फुलें

प्रत्येक भाग = 18/3=6 फुलें

Rलाल फुलांचे = 1 भाग= 1 × 6 फुलें= 6 फुलें

पिवळी फुले = 2 भाग = 2 × 6 फुलें = 12 फुलें.

SCERT TELANGANA

**उदाहरण - *4*.**एका सोनाराने 7:2 या गुणोत्तरात सोने आणि तांबे दागिने बनविन्यासाठी मिसळले जर दागिन्याचे वजन 45 ग्राम भरल्यास त्याातील सोन्याचे आणि तांब्याचे वजन काढा

**सोडवणुक :**सोने आणि तांब्याचे गुणोत्तर = 7: 2

गुणोत्तराच्या पदांचि बेरिज = 7+2 = 9

9 भागाचे वजन = 45 ग्राम.

प्रत्येक भागांचे वजन = 45 ÷ 9 = 5 ग्राम

सोन्याचे वजन ग्राम = 7 भाग × 5 ग्राम.. = 35 ग्राम.

तांब्याचे वजन = 2 भाग × 5 ग्राम. = 10ग्राम.

**उदाहरण -*5*.** AB रेषा खंडाला पाच समान भागात विभागले आहे.




(i) रेषाखंड AB ला X कोणत्या गुणोत्तरात विभागतो .?

(ii.) जर AB रेषाखंडाची लांबी 15 असल्यास रेषाखंड AX आणि XB.चि लांबी काढा.?

**सोडवणुक:**

(i) X हा AB ला 3:2 गुणोत्तरात विभागतो .

(ii) एकुन भाग = 3 + 2 = 5 भाग

AB रेषाखंडाचि लांबी = 15 सें.मी.

5 भागाचि लांबी = 15 सें.मी.

प्रत्येक भागाची लांबी = $\frac{15}{5}$ = 3 सें.मी.

रेषाखंड AX चि लांबी = 3 भाग = 3 x 3 सें.मी.. = 9 सें.मी.

रेषाखंड XB चि लांबी = 2 भाग = 2 x 3 सें.मी.. = 6 सें.मी.

**प्रयत्नकरा**



काळया आणि पांढऱ्या टाईल्सचा उपयोग 2:5 या गुणोत्तरात करुन चौरसाकार टाईल्सचा नमुना तयार करा. इथे पुष्कळ शक्य पद्धती आहे.

**उदाहरण -*6*.**हरी आणि तेजाने लॉटरी जिंकली त्यांने ते 5:3.गुणोत्तरात वाटणी करण्यासाठी तयार झाले. जर तेजाला 150, रुपये मिळाल्यास हरीला किती रुपये मिळतीले ? आणि एकुण रक्कम माहित करा.

**सोडवणुक:** तेजाच्या रक्कमेचा हरीच्या रक्कमेशी गुणोत्तर = 5 : 3

तेजाचे भाग 3 आहेत जर 3 भाग = 150

1 भाग = $\frac{150}{3}$ = 50

आणि 5 भाग = 50 × 5 = 250

हरिला 250 रुपये मिळतील आणि एकुण रक्कम = 250 + 150 = 400 रुपये

**प्रशन सग्रह - 11.3**

1. 25 कंच्या असलेली पिशवी राहुल आणि किरणने 2: 3 गुणोत्तरात वाटल्या तर -

(i) किरनला किती कंच्या मिळतील. (ii) राहुलला किती कंच्या मिळतील.

2 X बिंदु AB ला 3 : 4 गुणोत्तरात विभागतो AX आणि XB चि लांबी काढा .

3. गिता आणि लक्ष्मीने खेळात 1050 रुपये जिंकले त्याने ति रक्कम 3:4. गुणोत्तरात वाटन्यास तयारझाले प्रत्येक व्यक्तीला किती मिळतील ?

SCERT TELANGANA

4. सत्या आणि विष्णु मध्ये 3600 रुपये 3:5.गुणोत्तरात विभागणी करा

5. दोन संख्या 5:6. गुणोत्तरात आहे जर दोन संख्याचि बेरिज 132आहे तर त्या दोन संख्या माहित करा

6 अंदाजे गुणोत्तर काढा ज्यात X हा AB ला विभागतो आणि तुमच्या अंदाजाच्या मापनाव्दारे तपासनी करुन घ्या.




7. एका कर्मचाऱ्यांचे उत्पन्न आणि बचत 11:2. गुणोत्तरात आहे .जर त्याचा खर्च 5346 रुपये असेल तर त्याचे उत्पन आणि बचत माहित करा .

## 11.6 प्रमाण

खालील आकृत्या बघा. तुम्हाला त्याच्या आकारात काही बदल दिसतो का?






(i) (ii) (iii)

तुम्हाला आकृतीत काय फरक दिसला? (i) आणि (ii) वेगवेगळया असुन त्याचा आकार बदललेला आहे. आकृती (iii) (i) दोन्हीही मोठ्या आहेत परंतु वेगळ्या नाहीत त्याचे कारण कि त्याचे परिमान बदललेले आहे परंतु आकार नाही .

चला या तिन्ही घटनेतील लांबी आणि रुंदीचे गुणोत्तर पाहु या .

खऱ्या आकृतीच्या लांबी आणि रुंदीचे गुणोत्तर = 3:2

आकृती (i)च्या लांबी आणि रुंदीचे गुणोत्तर = 6 : 2 चे संक्षिप्त रुप 3 : 1 आहे.

आकृती (ii) च्या लांबी आणि रुंदीचे गुणोत्तर = 4 : 3 चे संक्षिप्त रुप 4 : 3 आहे.

आकृती (iii) लांबि आणि रुंदिचे गुणोत्तर = 6 : 4 संक्षिप्त रुप 3:2 आहे.

(iii) जे खऱ्या आकृतिच्या गुणोत्तरास समान आहे आपन सांगु शकतो कि आकृती

(iii) हि खऱ्या आकृतीच्या प्रमानात आहे म्हणुन त्याचे गुणोत्तर समान आहे. या गुणोत्तराच्या समानतेस प्रमान म्हणतात.

सामान्यता जर **'a'** आणि **'b'** गुणोत्तरासमान असल्यास आपन त्यास प्रमान आहे असे म्हणतो. यास आपन **'c'** आणि **'d'**, चे गुणोत्तर असे म्हणतो. यास आपण **a : b : : c : d**.गुणअसे दर्शवितो.

**दुसरे उदाहरण घेवु**

भाविका जवळ 28 कंच्या आणि विमलाजवळ180 फुले आहेत त्या दोघीने परस्पर कंच्या व फुले समान वाटुन घेतले असता भाविकाला 14 कंच्या आणि विमलाला 90 फुले मिळाली.. परंतु विमला खुष नाही. तिला वाटते कि तिने भाविकाला जास्त फुले दिली आणि भाविकाने दिलेल्या कंच्या कमी आहेत .

तुम्हाला काय वाटते ?

हा प्रश्न सोडविन्यासाठी विमलाची आई पुजा कडे गेल्या. पुजाने स्पष्ट केले कि 28 कंच्या पैकी भाविकाने 14 विमलाला दिल्या .

SCERT TELANGANA

म्हणुन गुणोत्तरात 14 : 28 = 1 : 2 आहे.

तसेच 180 फुलापैकी विमलाने 90 फुले भाविकाला दिली

म्हणुन गुणोत्तर 90 : 180 = 1 : 2.

दोन्ही गुणोत्तर समान असल्यामुळे वाटणी बरोबर आहे .तुम्ही पुजाशी सहमत आहात का ?

**उदाहरण -7.**राजु आणि भारतने त्याचे मिळुन 20 पेनसिल आनल्या राजुने 12 रुपये आणि भारतने 18. रुपये दिले. त्या पेनसिल दोघात वाटल्या आहेत .

**सोडवनुक:** (i) भारत म्हणाला प्रत्येकी 10 पेनसिल (ii) राजु म्हणाला भारतला 12 पेनसिल आणि त्याला 8 पेनसिल कोणाचे बरोबर आहे ? तुमचे उत्तर सांगा .

राजु आणि भारतने दिलेली रक्कम = 12:18

= 12 ÷ 6 : 18 ÷ 6

= 2 : 3

भारत नुसार पेन्सीलचे गुणोत्तर = 10 : 10

= 10 ÷ 10 : 10 ÷ 10

= 1 : 1

त्यानी काढलेल्या रक्कमेच्या प्रमाणात पेन्सीलची वाटणी समान नाही.

राजु नुसार पेन्सीलचे गुणोत्तर = 8 : 12

= 8 ÷ 4 : 12 ÷ 4 [ म.सा.वि. = 4 ]

= 2 : 3

सोप्या वाटणीसाठी एकुन पेन्सीलच्या संखेचें गुणोत्तर आणि त्यानी काढलेल्या रक्कमेचे गुणोत्तर समान असले पाहिजे. म्हणुन राजुचे बरोबर आहे आणि राजुला. 8 पेन्सील मिळाल्या पाहिजे. भारतला 12 पेन्सील मिळाल्या पाहिजे.

## प्रयत्न करा

दिलेल्या चौरसाकार रेषेच्या कागदावर 5 चौरसा पैकी 3 लाल रंगाच्या आणि 2 चौरस हिरव्या रंगाचे दिले आहे .

जर 10 चौरस दिले असता त्यापैकी किती लाल रंगाचे आणि किती हिरव्या रंगाचे आणि ते आकृतिच्या प्रमानात असले पाहिजे.



**एक-मान पद्धत**

**खालिल घेवु**

रवि 3.कि.ग्राम टंमाटे विकत घेण्यासाठी गेला. एक दुकानदाराने त्यास. 5 कि.ग्राम्र. टंमाट्याची किमंत 40 रुपये सांगितली दुसऱ्या दुकानदाराने 6 कि.ग्राम. टंमाट्याची किमंत 42 रुपये सांगितली. रवि काय करिल?

त्याला पहिल्या दुकानदाराकडुन घ्यायला पाहिजे का दुसऱ्या दुकानदाराकडुन. प्रत्येक घटनेत तो 3 कि.ग्र.साठी किती पैसे देतो?

SCERT TELANGANA

श्रीदेवीने मदत केली. ती म्हणाली प्रत्येक दुकानाच्या एक कि.ग्र.टंमाटयाची किमंत माहित करा आणी त्याची तुलना कर.

पहिल्या दुकानातिल 1 कि.ग्राम टंमाटयाचि किमंत रु . 40/5 = रु .8 प्रति कि.ग्राम

दुसऱ्या दुकानात 1 कि.ग्राम टंमाट्याची किमंत 42/6 = रु 7 प्रति कि.ग्राम

तिने रविला दुसऱ्या दुकानदाराकुन टंमाटे विकत घयायचा सल्ला दिला जर दुसऱ्या दुकानापेक्षा टंमाटेखराबनसेल तर तुम्ही तिच्याशी सहमत आहे का ?

1 कि.ग्राम टंमाट्याची किमंत 7. रु आहे

तर 3 कि.ग्राम टंमाटयाचि किमंत = $7 \times 3$ रु

= 21.रु

ज्या पद्धतीत आपण पहिल्यांदा एका एककाची किंमत माहीत करतो. नंतर आवश्यक एककाच्या संख्येची किंमत माहित करतो. यास एकसंख्या पद्धत किंवा एकमाण पद्धती असेही म्हणतात

**उदाहरण -8.** जर 12 पेनसिलची किंमत 24रु. आहे. तर 10 पेनसिलची किंमत माहित करा ?

**सोडवनुक:** प्रथम आपनास एका पेनसिलची किंमत काढण्यासाठी 24 रु.ला 12.रु ने भाग दयावा लागतो .

12 पेन्सीलची किंमत = रु 24

एका पेन्सीलची किंमत = $24 \div 12$ = रु 2

10 पेन्सीलची किंमत = $2 \times 10$ = रु 20

10 पेनसिलची किंमत रु 20.आहे.

**उदाहरण -9.** 6 बॉटल रसाची किंमत 210 रु. आहे तर 4 बॉटल रसाची किंमत काय होइल?

**सोडवनुक:** 6 बॉटल रसाची किंमत 210 रु. आहे.

1बॉटल रसाची किंमत = $210 \div 6$ = रु 35

1बॉटल रसाची किंमत रु. 35 आहे.

4 बॉटल रसाची किंमत काढन्यासाठि 1 बॉटल रसाच्या किंमतिला 4 नि गुणाकार करावा लागते

1बॉटल रसाची किंमत 35 रु.

4 बॉटल रसाची किंमत = $4 \times 35$ = रु. 140

4 बॉटल रसाची किंमत 140 रु. आहे

## प्रश्न संग्रह - 11.4

1. जर तीन सफरचंदाची किमंत 45 रु. आहे. तर पाच सफरचंदाची किंमत किती होइल ?
2. लक्ष्मीने 56 रुपयात 7 पुस्तके आणली. तर तिला फक्त 3 पुस्तकाची किती किंमत द्यावी लागेल ?
3. 4 जनांना भाजी -पुलावचे जेवन बनवायला तिला 300 ग्राम तांदुळ पाहिजे. तर सारखा पुलाव 7 जनासाठी बनवायचा असल्यास किती तांदुळ लागतील ?
4. 16 खुर्च्याची किंमत 3600 रुपये आहे. 4500 रुपयात किती खुर्च्या खरेदी करता येतील?

SCERT TELANGANA

5. स्थिर गतिने धावणारी रेल्वे 2 तासात.90 किमी अंतर पार करते त्याच गतिने 540 किमी. अंतर कापण्यासाठी रेल्वेला किती वेळ लागेल.?

6. कुमारचे 3महिन्याचे उत्पन्न 15000रुपये आहे जर त्याने तेवढीच रक्कम एका महिन्यात कमविली तर -

(i) 5 महिन्यात तो किती कमावेल.

(ii) किती महिन्यात तो 95000 रुपये कमावेल ?

7. 7 मीटर कापडाची किंमत 294 रुपये आहे तर 5 मीटर कापडाची किंमत काढा ?

8. एका शेतकऱ्याजवळ मेंढ्या आणि गायी 8 : 3 गुणोत्तरात आहेत.

(i) शेतकऱ्याजवळ किती मेंढ्या असलीत जर त्याच्या जवळ 180 गायी आहेत ?

(ii) शेतकऱ्याजवळ असलेल्या एकुन प्राण्याचे त्याच्या जवळ असलेल्या एकुन गायीशी गुणोत्तर

9. 3, 5, 15, 9 प्रमाणात आहे का? आपण त्याचा क्रम बदलल्यास आपण प्रमाणित जोड्याचा? विचार करु शकते का ? शक्य तेवढ्या प्रमाणात असलेली विधाने वरिल उदाहारनासाठी लिहा ?

10. मागील 30 दिवसात तापमान 15 डिग्री सेल्सीयसने खाली आले. तापमान खाली येण्याचा दर सारखा असतांना समोरील 10 दिवसात किती तापमान खाली येइल ?

11. खालील रिकाम्या जागा भरा.:

$$\frac{15}{18} = \frac{\square}{6} = \frac{10}{\square} = \frac{\square}{30}$$

12. (i) हॉलची रुंदी आणि लांबीचे गुणोत्तर 2: 5.आहे. खालील तक्ता पुर्ण करा, ज्यामध्ये हॉलची काही शक्य तेवढ्या रुंदी आणि लांबी दिलेली आहे .

| | | | |
|---|---|---|---|
| हॉलची रुंदी ( मीटरमध्ये ) | 10 | ? | 40 |
| हॉलची लांबी (मिटरमध्ये ) | 25 | 50 | ? |

(ii) हॉल तुमच्या वर्गाच्या खोलीच्या लांबी आणि रुंदीचे गुणोत्तर काढा .

13. गीता एका महिन्यात 12000 रुपये कमावते. व त्या पैकी ती 3000 रुपये बचत करते. तर गुणोत्तर काढा ?

(i) खर्चाचे बचतशी (ii) बचतचे उत्पनाशी (iii) खर्चाचे उत्पनाशी.

14. एका कार्यालयात 45 व्यक्ती काम करीत आहेत. स्त्रीयांची संख्या 25 आहेत आणि उरलेले पुरुष आहेत तर त्याचे गुणोत्तर काढा .

(i) स्त्रीयांच्या संख्येचे पुरुषांच्या संख्येशी

(ii) पुरुषांच्या संख्येचे स्त्रीयांच्या संख्येशी .

15. एका मिठाईच्या पिशवीत पिवळी आणि हिरवी मिठाई आहे. प्रत्येक 2 पिवळ्या मिठाईसाठी तेथे 6 हिरवी मिठाई आहे. वरिल माहितीवरुन ही सारणी पुर्ण करा .

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पिवळी मिठाई | | 4 | 6 | | |
| हिरवी मिठाई | 6 | 12 | | 24 | |
| एकुन मिठाई | 8 | | 24 | | 40 |

SCERT TELANGANA

आता खालील प्रश्नाची उत्तरे द्या.

(i) हिरव्या आणि पिवळ्या मिठाईचे गुणोत्तर काढा ?

(ii) जर तुझ्याजवळ 8 मिठाई आहे. तर तुझ्याकडे किती हिरवी मिठाई असेल ?

(iii) जर मध्यम आकाराच्या पिशवीत 32 मिठाई असेल तर पिवळी मिठाई होईल ?

(iv) मोठ्या आकाराच्या पिशवीत 40 मिठाई आहेत तर हिरवी मिठाई किती होईल.?

(v) मिठाईच्या वाटीत 16 पिवळया मिठाई आहेत त्या वाटीत एकुन किती मिठाई आहेत ?

16. एका शाळेच्या पाहनी वरुन असे आढळुन आले कि प्रत्येक 4 मुलीसाठी तेथे 5 मुले आहेत. खालिल तक्ता भरा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मुली | 4 | 8 | | | |
| मुले | | | 15 | 20 | |
| एकुन | | | | | 45 |

आता खालील प्रश्नाची उत्तरे द्या.

(i) मुलीचे आणि मुलांचे गुणोत्तर काय आहे ?

(ii) 27 मुलांच्या वर्गात किती मुली असेल ?

(iii) वर्गात 54 मुलं आहेत तर किती मुली आहेत ?

(iv) जर एका वर्षात 20 मुली भरती झाल्या तर किती मुले भरती होणार ?

## आपण काय चर्चा केली ?

1. गुणोत्तर समान एककाच्या राशीची क्रंमवार तुलना होय

2. **a'** आणि **'b'** या दोन राशीचे गुणोत्तर खालील पैकी कोणत्याही रुपात दर्शविता येते

   (i) संज्ञेच्या रुपात a : b (ii) आपुर्णांकाच्या रुपात $\frac{a}{b}$ (iii) शब्दाच्या रुपात a' शि b ला

3 'a' आणि 'b' दोन राशिंना गुणोत्तराची पदे म्हणतात पहिली राशी **'a'**ला पहिले पद किंवा पुर्वपद आणि दुसरी राशी **'b'**ला दुसरे पद किंवा उत्तरपद म्हणतात **.**

4. गुणोत्तर हे संक्षिप्त रुपात किंवा लहान पदात असते. जेव्हा आपण त्यास पुर्ण संख्येच्या रुपात लिहतो ज्याला 1शिवाय कोणताही सामान्य अवयव नसतो.

5. गुणोत्तराच्या समानतेस प्रमाण म्हणतात.

6. ज्या पध्दतीत आपण पहिल्यांदा एका एककाची किंमत काढतो आणि नंतर आवश्यक एककाच्या संख्येची किंमत माहित करतो त्यास एकमान संख्या पध्दत म्हणतात .



# सममिती

## 12.1 परिचय




शिरीषा कपडे घालत होती.तिच्या लक्षात आले की T-शर्ट वर काही मनोहर अक्षरात लिहीलेल आहे. T-शर्टवर लिहीलेल्या "THE WOW FACTOR", या तिन शब्दापैकी फक्त "WOW" हा शब्द आरशात सारखा दिसत होता. नतंर तिने काही सारखे जुने अक्षरमालाचे कार्ड घेतले आणि तिने कोणते अक्षर आरश्यात सारखे दिसते का याची तपासणी केली.

सिरीषाने आरश्याशी खेळणे सुरु केले तिने आरश्यात समोर काही निरनिराळी अक्षरे समोर ठेवुन त्याचे परावर्तन पाहीले.



### हे करुन पहा



प्रत्येक अक्षराचे आरशातील प्रतिबिंबात जोड्या लावा.

| | अक्षरमाला | प्रतिबिंब |
|---|---|---|
| (i) | B | ь |
| (ii) | L | 8 |
| (iii) | N | M |
| (iv) | M | И |
| (v) | P | T |
| (vi) | T | ⅃ |

अशा प्रकारच्या अजुन अक्षरमालेची आणि शब्दांची ज्याचे आरशातील प्रतिबिंब सारखे आहे या बददल विचार कराल का ?

SCERT TELANGANA

## प्रयत्न करा



1. टिंबानी काढलेल्या रेषेसमोर आरसा ठेवुन त्यांचे प्रतिबिंब काढा

(i)  (ii)  (iii) 

तुम्हाला काही बदल दिसतो का ?

प्रतिबिंब कोन आणि दिलेल्या आकृतीतील कोन समान आहेत का ?

परावर्तन होत असताना तुम्ही पाहीले असाल कि परावर्तन सम्मीतीच्या उभ्या अक्षावर, डाव्या हाताकडील कोन हा उजव्या हाताकडे व उजव्या हाताकडील कोन हा डाव्या हाताकडील प्रतिमेत दिसतो. त्याचप्रमाणे परावर्तन सम्मीतीच्या आडव्या अक्षावर वरचे खाली आणि खालचे वर दिसते.

## 12.2 रेषा सममिती

खालील आकृत्या पहा .तुम्हास काय दिसुन येते.

  

वरिल आकृती सुंदर आणि सम्मीती आहेत. जर दिलेल्या टिंबाच्या रेषेवरुन आकृतीत दिलेल्या एक भाग अचुक पणे एकमेकावर येतो. यालाच रेषा सम्मीती म्हणतात

## हे करा

खाली दिलेल्या आकृत्यावरुन कोणती सम्मीत आकृती आहे ती



मोहीतने टिंबाच्या रेषेवर आरसा ठेवला आकृती ही प्रतिमेने पूर्ण होते कीवा नाही हे त्याने माहित केले मोहीत ने केलेले बरोबरे आहे का तुम्हाला काय वाटते



SCERT TELANGANA

आपण प्रत्येक आकृतीची सम्मीती रेषा काढु शकतो का ?

खालील आकृतीचे निरीक्षण करा

(i) **M** (ii) **G** (iii) 

आपणास दिसुन येते की पहिली आणि तिसरी आकृती सम्मीती आहे. पहिल्या आकृती मध्ये सम्मीतीची रेषा उभी व मधात आहे. आणि तिसऱ्या पक्षाच्या आकृतीत सम्मीत रेषा आडवी आहे

**ज्या रेषेवर आपण आकृतीची घडी केल्यास त्या आकृतीचे दोन भाग पडुन एकमेकास तंतोतंत मीळतात त्यास सम्मीत रेषा असे म्हणतात.जी उभी किंवा आडवी किवा तिरकस असते**

**बाराखडी सोबत खेळ**




इंग्रजी अक्षर A हे आकृतीच्या कागदावर लिहा.त्यावर उभी टींबाची रेषा मधातुन काढा त्यास त्या टिंबाच्या रेषेपासुन घडी करा. दोन्ही भाग एकमेकास तंतोतंत जुळतात. टिंबाची रेषा आहे आणि बाराखडीला उभी सम्मीती असते




याच प्रमाणे B च्या संदर्भात सम्मीत रेषेची तपासणी करा इथे आपण बघतो की बाराखडीला आडवी सम्मीत रेषा असते.

## प्रयत्न करा



इंग्रजी बाराखडी A पासुन Z पर्यंत लिहा आणि माहीत करा की त्या पैकी कोणत्या अक्षरात

(i) उभी सममित रेषा

(ii) आडवी सममित रेषा

(iii) सममित रेषा नाही

## हे करुन पहा





SCERT TELANGANA

## प्रयत्न करा



सम्मीत रेषा असणाऱ्या कोणत्याही पाच वस्तुची आकृती काढा .

सम्मीत नसणाऱ्या  कोणत्याही पाच वस्तुची आकृती काढा

## कृती



एका कागदाचा तुकडा घ्या. त्यास अर्ध्यातुन घडी करुन उघडा. त्यावर शाईचे काही थेंब टाकुन घडी करा. दोन्ही अर्धेभाग एकत्र दाबा आणि घडी उघडा. तुम्हाला सम्मीत आकार दिसेल. त्या आकृतीसाठी सम्मीत रेषा काढा. अशा प्रकारे वेगवेगळी सम्मीत आकृती वेगवेगळ्या रंगात काढा.

## शाई -दोरीचा नमुना

कागदास अर्ध्यातुन घडी करुन उघडा. लहाण आकाराची वेगवेगळ्या रंगात किवा पेंट मध्ये बुडवीलेले दोरी अर्ध्या भागत ठेवा. आता दोन्ही भाग एकत्र दाबुन उघडा. तुम्हास आलेल्या आकृतीचा अभ्यास करा ती सम्मीत आहे का सम्मीती रेषा ओळखा.







## प्रश्न सग्रह - 12.1

1. खालील आकृत्या सम्मीत आहे किंवा नाही तपासुन पहा. सम्मीत रेषा काढा.



SCERT TELANGANA

2. प्रत्येक आकृती साठी शक्य तेवढ्या सम्मीती रेषा काढा



3. आकृती $\ell$ ही सम्मीत रेषा आहे.
समिती करण्या साठी आकृती पुर्ण करा.




4. टिंबाच्या सम्मीत रेषेवरुन आकृत्या पुर्ण करा .



**खेळ**

खाली तिन वेगवेगळे आकार दिले आहेत.

या तीन आकृतीवर मीनाक्षी आणि राहुल ने वेगवेगळ्या सम्मीत आकृत्या तयार करण्यासाठी प्रत्यन केला.



आकार     सम्मीत आकार     सम्मीत आकार

बाजुच्या तीन आकारावर गिरवून सम्मीती आकार बनवा. तुमच्या जोड्या करुन तपासणी करा. कोण जास्त सम्मीत आकार तयार करते बघा?

SCERT TELANGANA

## 12.3 पतंग

**पतंग**

तुमच्या गणितीय पेटीत दोन गुण्या असतात. त्या पैकी कोनाची मांपे 30º, 60º, 90º असतात



आशाप्रकारची दोन गुण्या घ्या त्यास बाजु बाजुला ठेवाल्यास पतंगाचा आकार तयार होतो.

या आकारस किती सममित रेषा आहे.?

काही आकारस एकापेक्षा जास्त सम मीत रोषा असतात याचा तुम्ही विचार केला का ?

**चौरस**

आयताकार कागद (पोस्ट कार्ड सारखा ) घ्या त्यास लांबीनुसार अशी घडी करुरा कि एक भाग बरोबर दुसऱ्या भागावर अला पाहीजे अशी घडी सम्मीत रेषा होते का? त्यास उघडा आणि पंरतु रुंदीनुसार त्याची घडी करा या दुसऱ्या घडीला सुद्धा सम मीत रेषा असते का ? कारण?



या दोन्ही घड्यात सम मीत रेषा आहेत हे तुम्ही माहीत करु शकता का ? चौरसाचा कागदाचा तुकडा घ्या .त्यास असी उभी घडी करा की त्यांचे कडा एकमेकावर आले पाहीजे घडी उगडा आणि तुम्हाला दिसुन येते की घडीमुळे तयार झालेली दोम्ही भाग एकरुप असतात त्या कागदाच्या मधातील घडी वरुन सम्मीतरेषातयार होईल अशा वेगवेगळया कोनावरुन कागदाच्या घड्या कारायचा प्रत्यन करा

शक्य तो किती घड्या बनतात?

चौरसाला चार सममीत रेषा असतात



चौरसाकार कागद | उभी घडी | आडवी घडी | तिरकस घडी | दुसरी तिरकस घडी | खुल्या आशा दिसणाऱ्या घड्या

समभुज आणि समद्वीभुज त्रिकोण घ्या या प्रत्येक आकृतीला किती सम मीत रेषा आसतात?

**सममित्तीच्या साहाय्याने कागद कापणे.**

तुम्ही गणतंत्र दिन आणि प्रजासत्ताक दिवसी तुमचा वर्ग रंगीत कागदाने विविध आकारात कसा सजविता हा आकार कसा कापतात तुम्हास माहीत आहे का ?चौरस पेपर घ्या आणि त्याची मधातुन उभी घडी करा आकृतीत दाखविल्या प्रमाणे आकार तयार करुन कागदास त्याच्या कडेवरुन कापा. आणि त्यास उघडुन पहा त्यात एक सममीत रेषा असते

SCERT TELANGANA



चौरसाकार कागद घेवून त्यास मधोमध उभी आणि आडवी घडी करा. त्या घडीवर चांगला आकार (designs) काढा. आणि आकृतीत दाखविल्या प्रमाणे त्यांच्या कडेवरुन कागद कापा. नंतर उघडा आणि सम्मीतीच्या आकार पहा. यास दोन सम्मीत रेषा असतात.



एक चौरस कागद घेऊन त्यास उभ्या-आडव्या आणि तीरकस रितीने घडी करा. आकृतीत दाखविल्या प्रमाणे त्या घडीवर चांगले नमुने काढून त्याच्या कडे पासुन त्यास कापा त्यावरुन चार रेषांची सम्मीती दिसते. अशा प्रकारचे अजुन नमुने तयार करा.



### विचार करा आणि चर्चा करा आणि लिहा



1. जर कागदाची चार वेळा घडी केली असता कागद कापल्या नंतर किती सम्मीती रेषा बनतात.
2. कागदाची घडी कुपुन चार सारख्या आकृती बाजु-बाजुला कापा किती घड्याची आवश्यकता असते.

### सममित आकृती कशी काढाल.




(i) चला बाजुला दिलेल्या आकृतीला दाखविल्या प्रमाणे आकृती काढणे सुरु करु या.




(ii) आपणास ती पुर्ण करायला पाहीजे कारण आपणास दोन रेषा सम्मीतीची आकृती येते

(iii) $\ell$.रेषेत वक्ररेषा अशारीतीने काढा कि ती आगोदरच्या रेषेची प्रतिममा असली पाहीजे




(iv) सम मीती रेषेमध्ये वक्ररेषा अशाप्रकारे काढा कि ती अगोदरच्या रेंषेचे प्रतिमा असली पाहीजे. दोन सम्मीती रेषा असणाऱ्या काही आकृत्या काढण्याचा प्रयत्न करा. सहा सम्मीत रेषा असणाऱ्या आकृतीचा विचार करा.

SCERT TELANGANA

## प्रश्न संग्रह - 12.2

1. दोन सम्मीत रेषा असलेल्या कोणत्याही पाच मानव निर्मित वस्तु लिहा.
2. दोन कीवा त्या पेक्षा जास्त सम्मीत रेषा असणारी कोणत्याही पाच नैसर्गीक वस्तु लिहा.
3. खालील आकारातील सम्मीत रेषांची संख्या काढा.

(i) 

(ii) 

(iii) 

(iv) 

(v) 

(vi) 

4. शक्य असलेल्या सम्मीत रेषा काढा.

(i) 

समभुज त्रिकोण

(ii) 

समद्विभुज त्रिकोण

(iii) 

विषमभुज त्रिकोण

(iv) समचर्तुभुज 

(v) षटकोण 

(vi) वर्तुळ 

SCERT TELANGANA

5. वरिल प्रश्नावरुन खालील तक्ता पुर्ण करा.

| आकार | एकुन सम मीती रेषा |
|---|---|
| समभुज त्रिकोण | |
| समद्वीभुज त्रिकोण | |
| विषमभुज त्रिकोण | |
| समलंब त्रिकोण | |
| षटभुज त्रिकोण | |
| वर्तुळ | |

6. काही  केलेले कागद आणि नमुने काढलेले आहेत. प्रत्येक संदर्भात रफ आकृत्या त्या नमुने कापल्या नंतर दिसतात.


कागदाची उभी घडी केलेली आहे


कागदाची उभी आणि आडवी केलेली आहे

**वर्गाचे प्रकल्प कार्य ( 8 जनांचा गट पाहुन तुम्ही करु शकता)**

आलेखाचा कागदावर उभी रेषा काढा. (आकृतीत दाखविल्या प्रमाणे ) उभ्या सम्मीती अक्षाची एका बाजुच्या एका चौरसात रंग भरा नंतर विध्यार्थ्यांना सम्मीत पहिला चौरस कोणता हे माहित करण्यास सांगुन त्यात रंग भरा. असे केल्या नंतर ति दुसरा कोणताही चौरस निवडुन त्यात  रंग भरन्यास नंतरच्या विद्यार्थ्यांना असे करावयास सांगा



SCERT TELANGANA

**घरचे प्रकल्प**

वातावरणातील सम्मीती आकृत्या गोळा करुन त्याचे एक पुस्तक बनवा. रांगोळीचे नमुने सुध्दा गोळा करा आणि तुमच्या पुस्तकात ठेवा. नमुन्यातील सम्मीत भाग आणि सम्मीत रेषेची जागा दाखवण्याचा प्रयत्न करा. इथे काही उदाहरणे आहेत.





## आपण काय चर्चा केली ?

1. जी रेषा काढल्याने आकृतीचे दोन समान भाग पडतात अशा आकृतीस सम्मीत रेषा आहे असे म्हणतात. या रेषेला सम्मीती रेषा म्हणतात.
2. काही आकृतीस सम्मीती रेषा नसते. एकच सम्मीत रेषा, दोन सम्मीत रेषा, अनेक सम्मीती रेषा असतात. इथे काही उदाहरने आहेत.

| सम्मीती रेषेची संख्या | उदाहरण |
|---|---|
| सम्मीती रेषा नसते. | विषमभज त्रिकोण |
| फक्त एकच सम्मीती रेषा असते | समद्विभुज त्रिकोण |
| दोन सम्मीती रेषा असतात | आयत |
| तिन सम्मीती रेषा असतात | समभुज त्रिकोन |
| अनंत सम मीती रेषा असतात | वर्तुळ |

3. सम मीती रेषेचे आरशाच्या परावर्तनाशी जवळचा संबंध आहे जेव्हा आरशाच्या परावर्तनाचा विचार करतो तेव्हा आपणास लक्षात घेतले पाहिजे. डावी ↔उजवीत बदलते.
4. सम मीती चे आपल्या रोजच्या जिवनात पुष्कळदा वापर होतो जसा कला,कोरीव काम,कापड,नमुने बनवीने,भूमीतीय रचना,रागोळी इत्यादी होते .



# प्रत्यक्ष भूमिती

धडा - 13

## 13,1 परिचय

खालील आकारांची पेन्सीलच्या साहाय्याने तुमच्या वहीत आकृती काढा

ते सारखेच दिसतात का? त्यांच्या बाजु आणि कोनाची मापे कोनमापकाच्या साहयाने काढा.

खाली तुम्ही काढलेली त्यांची मापे अचुक नाहीत त्यांची अचुक माहीती काढण्यासठी आपल्यास त्यांची अचुक मापे काढावी लागेल ? त्या साठी आपणास उपकरणाची गरज आहे. आपण अशा आकृतीची रचना करणे शिकणार आहोत या धड्यात कर्कटक,कंपास कोनमापक ई. चा वापर इथे करणार आहेत. ही आपली उपकरने (औजार) आहेत. हे सर्व कंपास बॉक्सचे भाग आहेत. चला आपण कंपास बॉक्स पाहु या.

कंपास बॉक्समध्ये काय असतात ? मोजमाप पट्टी(स्केल),कंपास आणि कोनमापक,र्ककटक,गुण्या.ईत्याद मोजमाप पट्टीचा वापर रेषेंची लांबी मोजन्यासाठी,आणि डिवायडरचा वापर समान रेषाखंड किवा रेषेवर बिंदू काढण्या साठी होतो.









**Divider** (दुभाजक ) **Protractror** (कोनमापक) **Compass**

## 13,1 रेषाखंड

एका कागदावर A आणि B हे दोन बिंदु घ्या.सरळ रस्ता




A पासुन B ला रेषा AB म्हणतात. $\overline{AB}$ ने दर्शवतात.

A आणि B बिंदुमधील अंतरात AB. ची लांबी असते जी आपण मोजु शकतो.

### 13.2.1 दिलेल्या लांबीचा रेषाखंड काढणे

दिलेल्या लांबीचा रेषाखंड आपण दोन प्रकारे काढु शकतो.

SCERT TELANGANA

**1.** मोजमाप पट्टीचा वापर करुन :समजा आपणास 7.8 से.मी. लांबीचा रेशाखंड काढायचा आहे.




आपन अशा प्रकरे काढु शकतो

7 से. मी. च्या चिन्हा नतंर 8 भागच्या समोर दुसरा बिंदु काढा त्यास B नाव द्या मोजमाप पट्टीच्या साहाय्याने A आणि B ला जोडा B हा 7.8 से.मी चा येणारा रेषाखंड आहे

**2.** **कंपासचा वापर करुन :**

समजा आपणास 5.3 सेमी चा रेषाखंड काढायचा आहे

**रचनेच्या पायऱ्या :**




**पायरी -1**: रेषा काढा रेषेवर A बिंदु दर्शवा

**पायरी -2**: कपासाचे एक टोक मोजमाप पट्टीच्या शुन्य चिन्हावर ठेवा कंपासाला अशारीतीने उघडा की तो मोजमाप पट्टी ला 5.3 से. मी. वर स्पर्श केला पाहिजे

**पायरी -3** रेषे बिंदु वर टोक ठेवुन *l* रेषेला कापणारा एक चाप काढा रेषा जेथे कापते त्या ठिकाणी एक बिंदु B हे नाव द्या




**पायरी -4 :** l, रेषेवर आपणास आवश्यक लांबीचा AB रेषाखंड मिळतो.



## प्रश्न संग्रह 13.1

1. मोजमापपट्टी आणि कंपासच्या सहाय्याने 6.9 लांबीचा रेषाखंड काढा
2. मोजमाप पट्टी (स्केल ) वापर करुन 4.3 से.मी. रेषाखंड काढा
3. 6 से.मी. MN रेषाखंड काढा त्यावर कोणता ही बिंदु 0 काढा MO ,NO आणि MN मोजा तुम्हाला काय काढळले
4. 12 से,मी लांबीचा $\overline{AB}$ रेषाखंड काढा $\overline{AB}$ रेषाखंडावर C बिंदु असा दर्शवा कि $\overline{AC}$ = 5.6 से,मी. $\overline{CB}$ लांबी काय होईल $\overline{CB}$ ची लांबी मोजा
5. AB = 12 से मी दिले असता




(i) वरिल आकृतीवरुन खालील रेषाखडाची लांबी मोजा

(a) $\overline{CD}$ (b) $\overline{DB}$ (c) $\overline{EA}$ (d) $\overline{AD}$

6. $\overline{AB}$ = 3.8 -से मी $\overline{MN}$ $\overline{MN}$ ची रचना कंपासाने आशी करा कि ही रेषा तिप्पट असला पाहिजे मोजमाप पट्टीचा वापर तपासुन पहा. $\overline{AB}$.

SCERT TELANGANA

## 13.3 वर्तुळाची रचना

इथे दाखविलेल्या चक्राकडे पहा. त्याच्या सिमेवरील प्रत्येक बिंदु हा केद्रबिंदु पासुन समान अंतरावर आहे. अशा प्रकारच्या इतर वस्तु विषयी विचार करा. त्यांची 5 उदाहरने द्या. अशा आकाराची वस्तु आणि आकृती कशी काढाल?



आपण या साठी बांगड्या, वाटीचा वरचा भाग, ताट आणि ईतर वस्तुचा वापर करतो. या एका विशीष्ठ प्रकारच्या मापानी बनलल्या आहेत. दिलेल्या त्रिजेवरुन कर्कटाच्या साहयाने आपण वर्तुळ काढू शकतो. वर्तुळाची रचना करण्यासाठी खालील पायऱ्याचा वापर आपण करतो.



**रचनेच्या पायऱ्या**

**पायरी -1** आवशाक त्रिजेवरुन कर्कटक उघडा समजा उदाहरणात 3.7

**पायरी -2** पेन्सीलीच्या साहाय्याने बिंदुची खूण करा. दोन केद्रबिंदु आहेत त्यास O ने दर्शवा.

**पायरी -3** कर्कटकाचे टोक O बिंदुवर ठेवा.

**पायरी -4** तिचा धातुचा बिंदु न फीरविता, पेन्सीलीला हळु-हळु तिच्या सुरुवातीच्या बिदुवर येई पर्यंत फीरवा.

### प्रयत्न करा



एकाच त्रिजेची दोन वर्तुळे अशी काढा की

(i) वर्तुळ दोन बिंदुवर छेदतील

(i) एकमेकास एकाच बिंदुवर स्पर्श करतील



(i) (ii)



### प्रश्न संग्रह 13.2

1. 4 से.मी. त्रिजेचे एक केद्रबिंदु असणाऱ्या वर्तुळाची रचना करा.
2. 10 से.मी व्यास आणि M केद्रबिंदु असणाऱ्या वर्तुळाची रचना करा.
3. 2 से.मी. 3 से.मी. आणि 4 से.मी. त्रिज्या असणारे आणि P एकच केंद्र बिंदु असणाऱ्या चार वर्तुळांची रचना करा
4. कोणतेही एक वर्तुळ काढुन त्यावर तिन बिंदु A, B आणि C असे अंकीत करा की.
   (i) A वर्तुळावर असला पाहीजे.
   (ii) B वर्तुळावर असला पाहीजे.
   (iii) C वर्तुळावर बाहेर असला पाहीजे.

**कृती**

तुमच्या ईच्छेनुसार त्रिज्या असणारे वर्तुळ तुमच्या वहीत काढा त्यावर एक बिंदु काढा. त्या बिंदुवर कंपास (कर्कटक) ठेवुन एक वर्तुळ त्रिज्याने बदलतात. ते दोन बिंदुवर परिघास कापतो. दोन्ही बाजुस हीच क्रिया पुन्हा करा. तुम्हाला आकृतीत दाखवील्या प्रमाणे एक सुंदर आकृती तयार होते. तुम्हाला आवडेल तो रंग त्यात भरा.





SCERT TELANGANA

## 13.4 लंबरेषा




आपणास माहित आहे कि दोन रेषा (किरण किवा रेषाखंड) लंब रेषे होतात) जेव्हा त्या अशा रीतीने छेदतात कि त्यामुळे त्याच्यातील काट कोन तयार होतो.

*l* आणि *m* रेषा लंब आहेत.



तुमच्या वहीच्या कागदा मध्ये दोन रेषा एकत्र मिळतात आणि काटकोन तयार होतो अशा प्रकारचे दुसऱ्या वस्तु मध्ये रेषा लंबाहून रेषेत मीळतात

### 1. दिलेल्या रेषेच्या बिंदुवर लंब

**कृती**

एक कागद घेवुन त्यावर *l* रेषा काढा त्या रेषेवर P बिंदु काढा आता आपण P बिंदपासुन रेषेवर लंब काढु आपण P बिंदुवरुन साधी घडी केली असता घडीच्या दोन्ही बाजु एकमेकावर येतात.

जेव्हा आपण घडी उघडतो तेव्हा क्रिज *l* ला लंब होते




**हे करा**



ती लंब आहे किवा नाही हे तुम्ही कसे तपासुन बघाल ? नोंद घ्या कि ती P बिंदुतुन गेली पाहीजे

### 13.4.1 दिलेल्या रेशाखंडाचे लंबदुभाजक तयार करणे

**रचनेच्या पायऱ्या**

**पायरी -1:** रेषाखंड काढा




**पायरी -2:** $\overline{AB}$ रेषाखंडाच्या अर्ध्यापेक्षा जास्त अंतर त्रिज्या घेउन कंपासाला तयार ठेवा




**पायरी -3:** केंद्रबिंदु समजुन रेशाखंडाच्या खाली आणि वर चाप काढा




**पायरी -4:** सारख्या त्रिजेच्या B ला केंद्रबिंदु घेउन रेषाखंडाच्या खाली आणि वर दोन चाप काढा चचे अगोदरच्या चापास कापतील त्या चापाच्या छेदन बिंदुला M आणि N नावे द्या

**पायरी -5:** Mआणि N बिंदुला जोडा तेव्हा *l* ही रेषा ABची आवशक लंब दुभाजक होते *l* रेषा AB रेषेला येथे छेदते




SCERT TELANGANA

**दुसऱ्या पध्दतिचे निरीक्षण करा:**




## हे करुन पहा



दोन्ही रचनेत $\overline{AP}$ आणि $\overline{BP}$ ची लांबी मोजा ते समान आहेत का ?

## विचार आणि चर्चा करुन लिहा



**पायरी -1:** मधील लंब दुभाजक जर त्रिजेची लांबी ही - $\overline{AB}$ च्या लांबी रेषा कमी घतली असता काय होते

**2. बिंदुवर त्याच्या वर नसणारा त्या रेषेचा लंब**

रचने मधील पायऱ्या

**पायरी -2:** रेशा काढा आणि *l* बिंदु A जो त्याच्यावर नाही




**पायरी -3:** A केद्रबिंदु वरुन दिलेल्या रेषेवरुन **M** आणि N बिंदुवर छेदणारा एक चापकर्ण काढा




**पायरी -4:** त्याच त्रिजेच्या ***M*** आणि ***N*** केद्रंबिंदुशी दोन चापकर्ण जे **B** बिंदुवर रेषेच्या दोन्ही बाजुला काढा







**पायरी -5:** A आणि B बिंदु जोडा AB हा दिलेल्या रेषेचा लंब होतो




SCERT TELANGANA



1. PQ = 5.8 से.मी. चा रेषाखंड काढा आणि लंब दुभाजक कंपास आणि ( ruler ) चा वापर करुन काढा.
2. रविने 8.6 से.मी, चा एक रेषाखंड काढला. त्याने AB चा दुभाजक C वर काढला तर AC आणि - BC ची लांबी काढा.
3. (ruler) आणि कंपासच्या साहायाने AB = 6.4काढा त्यांच्या मध्यबिंदु काढा.



## 13.5 कोनमापकाच्या साहयाने कोनांची रचना करणे.

चला $\angle PQR = 40°$.ची रचना करु

**रचनेच्या पायऱ्या**

पायरी -1 कोणत्यातही लांबीचे QR किरण काढा




पायरी -२ कोणमापकाचा केंद्रबिंदु Q ठेवुन रेषा $\overline{QR}$ ला समांतर ठेवा




पायरी 3 40°. बिंदुवर खुण करा

पायरी 4 QP.ला जोडा $\angle RPQ$ हा येणारा कोन आहे.




## 13.6 माहित नसलेल्या आकाराच्या कोनाच्या नकलेची रचना

समजा एककोन (ज्याची माप आपणास माहीत नाही) दिला आहे तो कोन आपणास रचना करायचा आहे.

समजा मापे माहीत नसणारा $\angle A$दिला आहे




**पायरी -1:** *l* रेषा काढुन त्यावर P बिंदु निवडा







**पायरी -2:** आता कपासाचे डोक A वर ठेवुन AC आणि AB ला कापणारे एक चापकर्ण काढा




**पायरी -3:**अशा प्रकारची P बिंदुवरुन *l* ला Q. वर कापणारी दुसरे चापकर्ण काढा.




**पायरी -4:** $\overline{BC}$ ला त्रिच्या समजुम तुमचा कंपास ठेवा.




**पायरी -5:**कंपासचे ठोक Q वर ठेवुन येणारी चापकर्णास R. वर कापणारे दुसरे चापकर्ण काढा

SCERT TELANGANA




**पायरी -6:** PR ला जोडा या वरुन ∠RPQ.येते त्याची मापणे ∠CAB. ला समान असते म्हणजे

## 13.7 दिलेल्या कोनाचे कोनदुभाजकाची रचना

I कागद घ्या आणि त्यावर O बिंदुचे चिन्ह लिहा O बिंदु पासुम $\overline{OA}$ आणि $\overline{OB}$ अशी दोम किरम काढा तुम्हाल - ∠AOB मीळस O बिंदुवर कागदाची आशी घडीकार कि किरण -$\overline{OA}$ आणि $\overline{OB}$ तंतोतंत मीळले पाहीजे समजा $\overline{OB}$ ला कागदाची क्रिज समजल्यास ती आपणास घडी उघडल्यानंतर मिळते




ही साठी सम्मीत रेषा होते

$\overline{OC}$ आणि ∠AOB.मोजा ते समान आहेत का $\overline{OC}$ सम्मीत रेषेला ∠AOBचे कोन दुभाजक म्हणतात

समजा ∠MON.दिलेल्या आहे

**रचनेच्या पायऱ्या :**

**पायरी -1** आणि MONला ON ला P आणि Q बिंदुवर कापणारी O बिंदुवरुन एक योग्य त्रिजेच्या चापकर्ण कढा







**पायरी-2** PQ,बिंदुच्या अंतराच्या अध्यापेक्षा थोडी जास्त त्रिज्या घेउन P केंद्रबिंदु वरुन दिलेल्या कोनाच्या आतुन एक चापकर्ण काढा

**पायरी -3** Q केंद्रबिंदुच्या आणि त्रिजा न बदलता (पायरी -2 प्रमाणे)∠MON च्या आतील भागात दुसरा चापकर्ण काढा







**पायरी- 4:** $\overline{OZ}$ किरण काढा तर $\overline{OZ}$ हे ∠MON.चे येणारे कोन दुभाजक आहे.

निरिक्षण करा ∠MOZ = ∠ZON.

समजा दोन्ही चापकर्ण Z वर छेदत आहे.

## प्रश्न संग्रह 13.4

1. .कोनमापकाच्या साहाय्याने खालील कोनाची रचना करा.

(i) ∠ABC = 65°  (ii) ∠PQR = 136°

(iii) ∠Y= 45°  (iv) ∠O = 172°

2. खालिल कोन तुमच्या वहीत लिहुन त्याचे कोन दुभाजक काढा



### 13.8 विशेष मापाच्या कोनांची तयारी

एका विशीष्ट आकाराच्या (मापाच्या ) कोनांची रचना करण्यासाठी काही चुक पध्दती आहेत. ज्या मध्ये कोनमापकाचा वापर होत नाही कोनत्याही कोनाची रचना कोनमापकाच्या साहाय्याने करणे तुम्ही शिकलात. कोनांची तयारी आपण फक्त कंपासाचा वापर करुन कोनाची रचना करणे शिकणार आहोत.

#### 13.8.1 कोन 60° रचने

**पायरी -1:** *l* रेषा काढुन त्या वर O बिंदुची खुण करा










**पायरी -2 :** *l* रेषा A बिदुंवर कापतील अशा रितीने योग्य त्रिकोन O बिंदुवर कंपासाचे एक टोक ठेवुन चापकर्ण काढा.

**पायरी -3 :** सारखी त्रिज्या पायरी 2 प्रमणे घेऊन A बिंदुवर कपंसाचे एक ठोक ठेवुन O. बिंदुतुन जाणारा एक चापकर्ण काढा




**पायरी- 4 :** दोन्ही टापकर्णास B बिंदुवर घेऊ या. OB ला जोडा. आपणास ∠BOA ज्याचा माप 60° आहे तो कोन मीळतो.

#### 13.8.2 120° कोनाची रचना

120° चा कोन हा 60°.ची दुप्पट आहे म्हणुन त्याची रचना खालील प्रमाने केली जाते.

**पायरी -1:** किरण OA काढा




**पायरी -2:** O. बिंदुवर कंपासाचे एक टोक ठेवा O. बिंदुला केंद्रबिंदु समजुन योग्य त्रिज्या घेऊन OA ला M. छेदणारा एक चापकर्ण काढा




SCERT TELANGANA

**पायरी 3:** M ला केंद्रबिंदु समजुन त्रिज्या न बदलता (पायरी प्रमाणे ) चापकाढा जी पहिल्या चापास P येथे कापतो




**पायरी - 4:** P ला केंद्रबिंदु घेवुन त्रिज्या न बदलता (पायरी 2 प्रमाणे ) चाप छेदतो काढा जो पहिल्या चापेला Q. छेदतो.




**पायरी - 5:** OQ.जोडा ∠AOQ होणारा कोन आहे.

## हे करुन पहा



**13.8.3** 30°180°, 240°, 300° कोनाची रचना करा.

**रचनेच्या पायऱ्या**

वरिल प्रमाणे 60° चा कोन काढा. ज्यास ∠AOR. नाव द्या.

आकृतीती दाखविल्या प्रमाणे प्रत्येकी 30° कोनाचे दुभाजक काढा.




### 13.8.4 90° कोनाची रचना

खालील आकृतीकडे पहा.




∠AOP = 60°, ∠POQ = 60°आणि

∠AOQ = 120°

आपण 90°.चा कोन काढला पाहिजे.

आपण माहित आहे की 90° = 60° + 30° आणि

सुध्दा 90° = 120° - 30°




म्हणुन आपणास ∠POQ चे कोन दुभाजक काढायला पाहीजे.

प्रत्येकी 30°.

∠BOP = 30° आणि ∠AOB = 90°

दुसऱ्या पध्दतिने 90° चा कोन काढण्याचा विचार करा.

## हे करुन पहा



कंपासाच्या साहयाने 45° चा कोन काढा



## प्रश्न संग्रह 13.5

1. ∠ABC = 60°. ची रचना कोनमापका न वापरता करा.

2.कोनमापक आणि कंपासाच्या मदतीन 120° चा कोन काढा

SCERT TELANGANA

3. मोजमाप पट्टी आणि कंपासच्या साह्याने खालील कोनांची रचना करा व रचनेच्या पायऱ्या लिहा.

(i) 75° (ii) 15° (iii.) 1

4. कोनमापकाच्या साहय्याने प्रश्न 1 मध्ये दिलेले कोन काढा.

5. ∠ABC = 50° काढा आणि कोनमापकाचा वापर न करता ∠XYZ समान ∠ABC ला काढा.

6. ∠DEF = 60°. ची रचना कर कोनमापकाच्या साहय्याने प्रत्येक कोन अर्धा मापचा कोन दुभाजक काढा.

## आपण काय चर्चा केली

या धड्यात भुमीतीस आकृती काढण्याच्या पध्दती दिल्या आहेत

1. आपन खालील भुमीतीय अवजाराचा वापर आकाराची रचना करण्यासाठी करतो

(i) मोजमाप पट्टी (ii) कंपास

(iii) डिवाईडर (iv) गुण्या (v) कोनमापक

2. मोजमापपट्टी आणि कपांसाच्या मदतीने खालील रचना करु शकतो:

(i) वर्तळ,जेव्हा त्याच्या त्रिजेची लांबी माहीत असते.

(ii) रेषाखंडावर त्याची लांबी दिली तर-

(iii) रेषाखंडाची नक्कल (प्रत)

(iv) जो रेषेचा बिंदुपासुन लंब जातो.

(a) रेषेवर असतो (b) रेषेवर नसतो

(v) दिलेल्या लांबीच्या रेषेचे लंबदूभाजक काढा.

(vi) दिलेल्या मापाचा कोन

(vii) कोनाची नक्कल (प्रत)

(viii) दिलेल्या कोनाचे दूभाजक

(ix) काही विशीष्ठ मापाचे कोन जसे-

(a) 90° (b) 45° (c) 60° (d0 30° (e) 120° (f) 135°

**वक्ररेषेचा खेळ (गंमत)**

काटकोणावर दोन्ही बाजुला 1 से. मी. अंतरावर 10 बिंदु चिन्हांकीत करा त्याना 1 ते 10 असे संख्या द्या. 1 ते 10 जोड्या, 2 ते 9, 3 ते 8 ...... अशा प्रकारे मिळवा.कि त्याची बेरीज आकृतीत दाखविल्या प्रमाणे 11 आली पाहिजे शेवटी वक्र रेषा येते.या उपकरणाचा वापर करुन काही चित्रे बनवा.




SCERT TELANGANA

# 2D आणि 3D आकारास समजणे

## 14.1 प्रस्तावना

खाली काही वस्तुंचे चित्र दिलेले आहे.




ह्या वस्तुंच्या आकाराचे काळजीपुर्वक अभ्यास करा.खालील तक्त्या मध्ये त्याच्या आकारानुसार त्याचे वर्गीकरण करा.

**तक्ता - 14.1**

| **आकार** | **वस्तु** |
|---|---|
| आगपेटी सारखे | |
| चेंडु सारखे | |
| लाकडाच्या ओंढ्या सारखे | |
| फासा सारखे | |
| शंकु सारखे | |

## 14.2 3D-आकार

आपण त्रिकोण,चौरस,आयात इत्यादी.बाबत पुर्वीच्या वर्गात शिकलेले आहेत.हे सर्व आकार लांबी आणि रुंदी असे दोन मापनाचे आहेत.म्हणुन त्यांना 2D आकाराचे किंवा दोन-मोजमाप आकाराचे म्हणतात.

वरील सर्व भरीव वस्तु सारखे,ज्यामध्ये लांबी,रुंदी आणि उंची किंवा खोली आहे.अश्या सर्वांना तीन-मोजमाप आकाराचे किंवा 3D आकाराचे म्हणतात.

SCERT TELANGANA

### 14.2.1 **घनाभ**




बंद आगपेटीचे आकार हे घनाचे एक उदाहरण आहे.आगपेटीच्या वरच्या बाजुला तुमच्या हाताने स्पर्श करा. हा पृष्ठभाग म्हणजे आगपेटीच्या बाजु होय. आगपेटीला किती बाजु आहेत ?

बाजुचे (पृष्ठभागा)चे बाजु हे कडा आहेत. आगपेटीला किती कडा आहेत ? कडेचे कोपरे हे आगपेटीचे शिरोबिंदु आहेत. आगपेटीला किती शिरोबिंदु आहेत ?

आता एक खोड रब्बर घ्या. ज्याचे आकार आगपेटीच्या आकारासारखे असते. त्याच्या बाजुला,कडेला आणि शिरोबिंदुला तुमच्या हाताने स्पर्श करा.

आगपेटीला जेवढे बाजु,कडा आणि शिरोबिंदु आहेत,तेवढ्याच खोड रब्बर आहेत का ? सारखीच संख्या आहे, असे लक्षात येईल.

आगपेटी,खोड रब्बर इत्यादी,घनाभच्या आकारात असलेल्या वस्तुंना 6 बाजु, 12 कडा, 8 शिरोबिंदु असतात.

### 14.2.2 **घन**



फासा हे घनाचे एक उदा.आहे.एक फासा घ्या,त्याच्या बाजु,कडा शिरोबिंदु माहीत करा आणि त्यांना मोजा.फासामध्ये किती बाजु,कडा आणि शिरोबिंदु आहेत ?

तुम्हाला असे समजते की,घनाभासारखे फासामध्ये 6 बाजु, 12 कडा, 8 शिरोबिंदु आहेत. तर घन आणि घनाभामध्ये काय फरक आहे ? तुम्हाला असे माहीत होते की,घनामधीन लांबी,रुंदी आणि उंची सारखी असते. पण ते घनाभामध्ये वेगवेगळे असतात.तर तुम्ही खोड रब्बर आणि फासामधील लांबी,रुंदी आणि उंचीचे मापण करुन पडताळा करा.

**हे प्रयत्न करा**

1. (i) घनाच्या बाजुचे आकार कसे असते ?
   (ii) घनाभाच्या बाजुचे आकार कसे असते ?
2. रमेश काही पेट्या गोळा करुन त्याच्या खोलीत ठेवल्या.त्याचे चित्र बाजुला दाखविलेले आहे.तर त्यामध्ये किती घन आहेत.



3. प्रत्येकी 2 सें.मी.च्या घनाने अजीत एक घनाभा बनविले.जे घनाभा बनलेले आहे त्याची लांबी,रुंदी आणि उंची किती आहे ?



### 14.2.3 **दंडगोल**

वस्तु जसे- लाकडाचा ओंढा,पाईपचा तुकडा, ट्युब-लाईट हे सर्व दंडगोलाच्या आकारात आहेत. एक मोनबत्ती घ्या. आकृती 1 मध्ये दाखविल्याप्रमाणे वरुन त्याचा एक काप घ्या. आकृती.2 मध्ये दाखविल्याप्रमाणे त्याला तुम्ही लोटु शकता का ?


आकृती.1

SCERT TELANGANA




आता मेणबत्तीला उभे करा. आता लोटु शकता का ?




ज्या पृष्ठभागाने मेणबत्ती लोटल्या गेली. त्याला वक्र पृष्ठभाग म्हणतात. असा पृष्ठभाग ज्याच्याने मेणबत्ती लोटल्या जात नाही पण त्याच्या वर्तुळाकार पायावर उभे ठेवु शकतो.आता मेणबत्तीची उंची आणि जाडी किती आहे ? आकृतीत दाखविलेल्या दंडगोलाची उंची आणि आणि जाडी पाहा.

### 14.2.4 **शंकु**

